
नश्वर
अभिजीत पैठणपगारे

# नश्वर

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# नश्वर

(महाकादंबरी)

लेखक

अभिजीत नंदकिशोर पैठणपगारे

लेखकाची ओळख-

**अभिजीत नंदकिशोर पैठणपगारे**

नाव-  अभिजीत नंदकिशोर पैठणपगारे,

रा. औरंगाबाद,

शिक्षण-एम. बी. बी. एस. नायर मेडिकल कॉलेज, मुंबई

ब्लॉग- abhiabhikhayalayahai.wordpress.com

ई-मेल-abhijeet23896@gmail.co

मो-9552454038

फेसबुक-https://www. facebook. com/abhijeet. Paithanpagare

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : ३ जुलै २०२०**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

* अभिजीत पैठणपगारे *

Name: Abhijeet Paithanpagare

Occupation - MBBS. Intern at Nair hosp., Mumbai



ही होती एक ओळख, ही माहिती देहाची. उपजिवीकेने डॉक्टर, पण जीविका म्हणाल तर वाचक. लहान असताना शिवाजी महाराज यांच्याबद्दल वाचायचो, त्यांनतर त्यात बाबासाहेब आंबेडकर, सावरकर, भगतसिंह, टिळक यांची भर पडली... नकळत हा ऐतिहासिक वाचनाचा कल कधी साहसी आणि काल्पनिक कथांकडे वळला कळलच नाही, व. पू. यांच्या philosophy ने तर जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन च बदलून टाकला ... अर्थात आयुष्यात वेगवेगळ्या काळात वेगवेगळे विषय आवडत असल्याने आता वयाच्या या पायरीवर खिचडी बनली आहे, त्याचा

फायदा हा झालं की सद्या तरी कुठलही पुस्तकं वाचताना त्याच्या अनेक पैलूंची चव कळून येते, अशातच लिहायला सुद्धा लागलो, अनेक कथा लिहिल्या आहेत ज्या प्रतीलीपी वर प्रकाशित झाल्या आहेत, शिवाय 'ई साहित्य' वर सुद्धा या आधी 'अशीही एक लव स्टोरी' हे प्रकाशित झालं आहे.

भविष्यात sci fi, medical science यात असणाऱ्या विविध संकल्पना घेऊन काल्पनिक आणि साहसी कथा लिहायच्या आहेत, एक वेगळं विश्व सकरायच आहे ज्यात तुम्ही आला तर तिथेच रमाल


पण यासाठी वाचकांचा पाठिंबा पाहिजे आहे, असच प्रेम राहू द्या, आणि प्रतिक्रिया नक्की कळवा आणि follow करा

FB https://m.me/abhijeet.paithanpagare

Email - abhijeet23896@gmail.com

अभिजीत पैठणपगारे यांचे गाजलेले पुस्तक

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/lovestory_abhijeet_paithanpagare.pdf



मनोगत



खरं तर लहान असतानाच ऐतिहासिक आणि साहसी कथा यांची फार आवड होती, शिवाय जापानी अनिमे चा खूप मोठा फॅन, पण कधी वाटल नव्हत की स्वतः अशी एखादी दीर्घ कथा लिहू शकेन, नश्वर हे पुस्तक लिहिण्यासाठी बराच अभ्यास आणि विचार करावा लागला, multilayer कथा असल्याने अनेक पैलू लक्षात घ्यावे लागले, तुम्हाला हे पुस्तक वाचताना सर्व गोष्टी अगदीच डोळ्यासमोर घडत आहेत असं वाटेल, शिवाय ज्यांना महाराष्ट्र चा भूगोल माहिती असेल त्यांना यात खुपचं रस येईल, कथा जरी पूर्णतः काल्पनिक असली तरी यात अनेक खऱ्या प्रदेशांचा उल्लेख आहे...

आता कथे बद्दल सांगायचं झालं तर ही आहे तब्बल ७व्या ते ८ व्या शतकातील म्हणजे प्राचीन काळच, त्यावेळी ही महाराष्ट्र

भूमी दंडकारण्य नावाने ओळखली जात, त्याची राजधानी प्रतिष्ठान म्हणजेच सध्याचे पैठण, याच दंडकारण्यात असणार अजून एक महत्वाचं नगर म्हणेजच ' मलुक ', पूर्ण कथा याच मलुक मधे फिरते, असं नगर खरंच अस्तित्वात होत पण नेमके कुठे याबद्दल इतिहास साशंक आहे, पण मी तरी या नगराला सह्याद्रीच्या पायथ्याशी ग्राह्य धरलं आहे

यात मी कामवासनेला खरं खलनायक धरलं आहे, खरं तर कामवासनेवर आधारित दैत्य तयार केलाय, पण कुठेही अश्लीलता न दाखवता एका प्रौढ धारणेवर कथा मांडण्याचा पुरेपूर प्रयत्न केला आहे

सध्या तरी या कथेचा पूर्वार्ध मांडला आहे तरी उत्तरार्ध लवकरच येईल आणि तुम्हाला कथा फार आवडेल ही अपेक्षा करतो... शिवाय हे सगळ ई साहित्य शिवाय कधीच शक्य झालं नसत, त्यांनीच माझ या आधीचे ' अशीही एक लवस्टोरी ' हे पुस्तक प्रकाशित केलं त्यामुळेच पुढे लिहिण्याच motivation मिळालं, अपेक्षा करतो की वाचक वर्गाचा पाठिंबा असाच राहील

धन्यवाद

-अभिजीत पैठणपगारे

# नश्वर

## *मलूक नगरी आणि श्राप*

ती अमावस्येच्या रात्र होती, आसपासचा संपूर्ण प्रदेश शांत होता.. मागे दिमाखदार सह्याद्री, अजस्त्र असं त्याचं ते रूप आणि त्याच्याच पायथ्याशी वसलेली मलुकनगरी पूर्णतः निद्रा अवस्थेत होती, कधीकाळी संपूर्ण भारतवर्षात प्रसिद्ध असलेल हे शहर आता मात्र तेव्हढं संपन्न नव्हतं राहीलं. या शहराची विशेष ओळख असलेलं एक मंदिर मात्र दिमाखात उभं होतं. हो पण मंदिर मात्र कशाचं हे मात्र देव जाणे.

त्या रात्री चांदणं नसताना सुद्धा 'तो' नदी पार करून मंदिराकडेच निघाला, मंदिराची पायरी लागताच त्याच्या चेहऱ्यावर आसुरी भाव प्रकट झाले होते. हळूहळू तो एकेक पायरी चढत होता, 13 पायऱ्या चढल्यानंतर मंदिराचं प्रवेशद्वार लागलं,

प्रवेशद्वार म्हणाल ना तर कलेचा तो एक अतिउत्तम असा नमुना होता. फारच रेखीव नक्षीकाम त्यावर केलेलं होतं, दोन सुंदर स्त्रियांचं अत्यन्त मादक असं रूप त्यावर साकारलं गेलं होतं, त्यातून गुलाबपाण्याचा सुगन्ध सुद्धा दरवळत होता. कदाचित दररोज याची याप्रकारे निगा राखली जात असणार.

'त्याने' त्या नक्षीकामाकडे बघण्यात जास्त वेळ न दवडता आतमधे प्रवेश केला, आणि कलेचा खरा नमुना मात्र आता दिसला होता. एका स्त्रीचा पुतळा गाभाऱ्याच्या एकदम पुढ्यात निर्माण केला गेलेला... त्या स्त्रीचा चेहरा म्हणाल तर इतका सुंदररित्या कोरला गेला होता कि ते प्रथम बघणारा पुरता घायाळ झाला पाहिजे. पण एक जरा विचित्र होतं. तो पुतळा पायापासून ते मानेपर्यंत भगव्या वस्त्राने झाकला गेलेला होता. 'त्याने' पुतळ्याकडे बघून स्मित हास्य केलं आणि ते वस्त्र बाजूला करण्यासाठी हळुवार हात

पुढे केला. पूर्णपणे मखमलीने बनलेल्या त्या कापडाला स्पर्श करताच मागून एक व्यक्ती ओरडली,

"थांब, खूप मोठं पाप करत आहेस, माहिती आहे ना त्या कोण आहेत ते?"

एक वृद्ध गृहस्थ होते ते, कदाचित तो आज येणार याची पूर्वकल्पना त्यांना असावी.

"तुम्ही आज यामध्ये नाही पडला तर बरं होईल"

"तू हे चुकीचं करतो आहेस मूर्ख माणसा. तुझ्या या कृत्याचे पाप तुझ्यासह सर्वांना फेडावे लागतील, मी जिवन्त असेपर्यंत तुला असं करता येणार नाही"

तो छद्मि हसला आणि म्हणाला,

"जर तुमची जिवन्त राहण्याची इच्छाच नाहीये तर त्याला मी काय करणार?", एव्हढं बोलून त्याने त्याची तलवार काढली आणि त्या वृद्ध माणसावर

सपासप वार केले आणि आपलं राहिलेलं काम पूर्ण करण्यासाठी वळला. त्याने त्याचे हात पुतळ्याकडे वळवले आणि खसकन ते वस्त्र ओढलं, ते वस्त्र ओढताच त्याच्या नजरेसमोर संपूर्ण पुतळा दिसत होता, असं वाटत होतं जणु जिवन्त स्त्री च समोर आहे, विलक्षण ते सौंदर्य, बघणाऱ्याचे डोळेच दिपून जावेत एव्हढं तेज, पण एक विक्षिप्त गोष्ट होती ती म्हणजे तो पुतळा पूर्णतः नग्नावस्थेत होता, कदाचित याच गोष्टीमुळे पायापासून ते मानेपर्यंत तो झाकलेला असावा. त्याने पुतळ्यावर एकवार नजर फिरवली, आणि तलवार उचलून पुतळ्यावर वार करायला सुरुवात केली, पण तो पुतळा तुटायच नाव घेत नव्हता, कुठेतरी चुकून टिच पडली तर ती सुद्धा लगेच भरून



निघत होती. जवळ जवळ अर्धा तास प्रयत्न करून सुद्धा यश येत नसल्याने तो पुरता गोंधळला, तळपायाची आग मस्तकात गेली, आणि अचानक त्याला काहीतरी आठवलं, त्याने त्याच्या सोबत आणलेल्या पिशवीत हात घातला आणि एक वस्तू बाहेर काढली, तेव्हढ्या अंधारात सुद्धा विलक्षण चकाकणाऱ्या त्या धातुकडे बघून तो जोरजोरात हसू लागला आणि त्या वस्तूने त्याने एकाएकी त्या पुतळ्यावर वार केला आणि चर चर आवाज करत एक भेग पडली, आणि ती भेग बघून तो राक्षसी हसू लागला, नकळत त्याने मलुकनगरीसाठी एका वेगळ्याच पर्वाची सुरुवात केली होती

*****

काही महिन्यानंतर...



प्रतिष्ठाण शहरात आज जल्लोषाचं वातावरण होतं, आणि त्याचं कारण म्हणजे आजच्याच दिवशी राज्याचे युवराज श्रवण याचा विवाह सोहळा होता. संपूर्ण नगरी सजवली गेली होती, संपूर्ण शहरात हत्तीवरून मिठाई वाटत होते, या शहराची जीवनदायिनी असणाऱ्या गोदावरी नदीच्या शेजारीच बांधलेल्या भव्य दिव्य राजवाड्यातच लग्न समारंभ होता. सर्वच जनता येऊन नवीन जोड्याला येऊन आशीर्वाद द्यायचे,

खरं सांगायचं झालं तर श्री गिरीराज म्हणजेच राज्याचे महाराज हे एक शूर पण फारच दयाळू असे राजा

असल्याने प्रजेचं त्यांच्यावर खूप प्रेम होतं . महाराजांनी सुद्धा स्वतःच्या वैयक्तिक सुखापेक्षा जनतेच्या कल्याणाखातर जास्त काम केलेलं, त्यांच्या असीम प्रेमामुळे जवळ जवळ शहराच्या, राज्याच्या अनेक भागांतून लोक नव्या जोड्याला आशीर्वाद देण्यासाठी आले होते.

वाड्याच्या मधोमध एक व्यासपीठ उभारलं होतं आणि त्याच्यावर दोघे युवराज व युवराज्ञी उभे ठाकले, युवराज्ञी या सामदेशातील उमराव यांच्या कन्या होत्या, ज्याप्रमाणे युवराज्ञी चं रूप भल्याभल्यांचं पारणं फेडत होतं त्याचप्रमाणे तिची बुद्धिमत्ता सुद्धा तेव्हढीच कुशाग्र, आणि युवराजांबद्दल बोलायचं तर काहीच दिवसांपूर्वी आपल्या गुरुकुळातून विद्या अर्जित करून आले होते ते. येणारे जाणारे अतिथी युगुलाचं कौतुक करत होते. व्यापारी लोक मोठमोठ्या भेटवस्तु, तर साधु संत आशीर्वाद देऊ लागले.

"श्रवण, तुमची प्रजा तुमच्यावर जरा जास्तच प्रेम करते असं वाटतंय", हळूच युवराज्ञी युवराजच्या कानात पुटपुटली.

"प्रेम तर करतातच, पण खरं सांगायचं झालं तर हे सगळे त्यांच्या नव्या सुनेला म्हणजे तुम्हालाच बघायला आले आहेत बरं!!, ते तिकडे बघा तरुण मुलींचा समूह किती वेळेपासून तुमच्या अंगावरील शृंगार, कपडे याचीच चर्चा करताय, काही वृद्ध स्त्रिया तुम्ही कशा उभ्या राहतात, इतरांना कसा मान देतात, कुठे चुकतात याचं निरीक्षण करताय तर उरलेली जनता तुमचं सौंदर्य बघण्यात मग्न आहे, एकंदर सांगायचं तर या व्यासपीठावर माझं अस्तित्व फक्त आशीर्वाद घेण्यापूरतच"

एव्हढं बोलून दोघेही हसायला लागले.

सगळं व्यवस्थित चालू असताना अचानक एक घोडेस्वार आला, आणि सरळ चालून राजांकडे आला आणि जवळील पत्र त्यांच्या हातात सोपवलं आणि आल्या मार्गे पुन्हा निघून गेला.

ते पत्र वाचत असताना हळूहळू त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव बदलू लागले,

पत्रात लिहिलं होतं,

"महाराज, काहीच महिन्यांपूर्वी मलुकनगरात झालेल्या घटनेची माहिती तर तुम्हाला दिलेलीच आहे. आणि तुमच्या आदेशावरून गोंधळ पसरू नये म्हणून ही माहिती लपवून ठेवली गेली आहे. परंतु अशुभ वार्ता येन सुरु झालं आहे, शहरातल्या 2 लहान मुलींचा मृत्यू झाला आहे. शहरात अनेक अफवाना उधाण आलंय, त्यात अचल ऋषींचा झालेला वध, मंदिराची वाढवलेली सुरक्षा, या गोष्टींमुळे लोक संशय घेत आहेत, त्यांच्यात भीती वाढत चालली आहे. मला वाटत परिस्थिती हाताबाहेर  जाण्याआधी योग्य ते पाऊले उचलावीत, "

पूर्ण पत्र वाचून झाल्यावर त्यांनी ते पत्र हळूच त्यांच्या प्रधानांकडे दिल आणि बोलले

"प्रधानजी, मलुक नगरात अराजकता सुरु झालीये, त्या ऐतिहासिक मंदिरात नेमकं काय होतंय याचा छडा

लावलाच पाहिजे. आपण आतापर्यंत याला अंधश्रद्धा समजत होतो पण आता त्याचे परिणाम खरंच दिसायला लागले आहेत. आज रात्रीच योग्य ती पाऊले उचलण्यासाठी बैठक घ्यायला हवी, तुम्ही आपल्या सर्व कार्यकरिणीतल्या लोकांना संदेश पोहोचवा आणि आज रात्री बैठकीला हजर राहायला सांगा आणि हो गुप्तहेरांना अजून सावध राहायला सांगा, मला प्रत्येक क्षणाची माहिती हवीये. आणि सामान्य जनतेला याबद्दल काही कळू नका देऊ . "

"ठीक आहे महाराज, जशी आपली आज्ञा, मी आजच सर्वांना सूचित करतो आणि बैठकीला हजर राहायला सांगतो... पण... "

"पण काय?"

"युवराजना याबद्दल सांगू का?आजच त्यांचा विवाह सोहळा संपन्न झालाय आणि लगेचच त्यांना अशा गोष्टीत सामील करावं का?"

"लग्न झालं म्हणून काय, देश आधी नंतर आयुष्य, आणि त्यांनी गुरुकुलात 12 वर्ष जे ज्ञान अर्जित केलंय त्याचा फायदा कधी होणार??त्यांनाही बैठकीला हजर राहायला सांगा"

"जशी आपली आज्ञा"

बघता बघता संध्याकाळ झाली. आतापर्यंत गर्दी ने भरलेला नदीकाठचा परिसर आता एकदमच शांत झाला होता. हळूहळू सूर्य गुडूप होत चालला आणि काहीच वेळात अंधाराचं साम्राज्य येणार होतं. राजवाड्यातील तळमजल्यात 10-12 लोक जमले होते. बसलेल्या मंडळींमध्ये काहींना काही कुरबुर चालू होती.

"आपल्याला असं अचानक इथे का जमवलं असेल?"

"कदाचित दक्षिणेकडून पुन्हा चढाईची शक्यता तर नाही ना?, "

"अहो पण मागच्या वेळी आपण त्यांना चांगला धडा शिकवला आहे, शिवाय राजांचा त्यांच्यावर चांगला जरब पण बसला आहे, आज गोष्ट जरा निराळीच वाटते"

"हो निराळी तर आहेच आणि कदाचित जरा भयावय सुद्धा, नाहीतर आजच एव्हढा मोठा कार्यक्रम झाल्यानंतर अशी बैठक घेतली नसती, आणि विशेष म्हणजे तिकडे सेनापतींसोबत युवराज सुद्धा बसलेलं आहेत"

"महाराज आल्यानंतरच आपल्याला कळेल कि नेमकं झालं काय आहे?"

आणि तेव्हढ्यात महाराजानी प्रधानजी सोबत प्रवेश केला. त्यांना मान देण्यासाठी सगळेच जण एकाएकी उठले.

"कृपया आपापलं स्थान ग्रहण करा, आपण काहीच वेळात बैठक संपवण्याचा प्रयत्न करू", महाराज म्हंटले.

तेव्हढ्यात सेनापती उत्तरले, "पण इतक्या घाईघाईत बैठक घेण्याची गरज पडली म्हणजे याचा अर्थ आपले शत्रू पुन्हा हालचाली तर नाही ना करत?असं काही असेल तर आम्ही लढण्यासाठी नेहमीच तयार आहोत, आणि यावेळी सुद्धा त्यांना पराभवाचा हिसका दाखवू"

"आम्ही तुमच्या पराक्रमाची कदर करतो सेनापतिजी पण यावेळी संकट कदाचित मानवी शत्रूंचं नाहीचेय, "

"काय?म्हणजे?याचा अर्थ कळला नाही आम्हाला"

"सगळे ऐका, मलुका शहरातलं जे गूढ मंदिर आहे ना त्यावर कुणीतरी आक्रमण केलंय, पण ते कुणी केलं, किती जणांनी केलं याबद्दल फारच कमी माहिती आहे आपल्याकडे"

"काय?"

"हो सेनापतिजी, आणि अजून एक वाईट बातमी म्हणजे गाभाऱ्याच्या बाहेर असणाऱ्या राणीच्या पुतळ्याला सुद्धा मधोमध एक मोठा तडा गेलाय"

ते ऐकताच सर्वांमध्ये एकाएकी शांतता पसरली. काही वेळासाठी काय बोलावे हेच कुणाला कळेना. तेव्हढ्यात सामदेशाचे सामंत म्हणजेच श्री कृष्णदेव बोलले,

"पण तो पुतळा तोडणं तर अशक्य आहे ना?असं म्हणतात की तो पुतळा पृथ्वीवरील कोणत्याच भौतिक वस्तूने तुटू शकत नाही ते!!"

"बरोबर आहे कृष्णदेव तुमचं, चिंता याच गोष्टीची आहे, कदाचित कोणत्या तरी असुरी शक्तीचा सामना आपल्याला करावा तर नाही लागणार ना?"

"बाबा पण या मलुकनगरीच्या मंदिराज रहस्य तरी काय आहे नेमकं?", बऱ्याच वेळेपासून शांत बसलेल्या श्रवण म्हणजेच युवराज याने प्रश्न विचारलाच.

हा प्रश्न बहुतेक तिथे बसलेल्या प्रत्येकालाच होता. कारण त्या मंदिराबद्दल माहिती नेहमीच गुपित ठेवली गेली होती.

"हो युवराज, त्यासाठी तर मुद्दाम इथे सगळ्यांना बोलावलं आहे. प्रधानजी मला वाटत तुम्ही सगळ्यांना याबद्दल सांगावं"

प्रधानजी च्या हातात काही ताम्रपत्रे, संदेश होते. कदाचित त्याचा संदर्भ घेऊन ते जे काही आहे ते सांगणार होते.

"मलुकनगर, सह्याद्रीच्या पायथ्याला वसलेलं आणि संपूर्ण आर्यवर्तात प्रसिद्ध असं शहर. हे शहर मुख्य व्यापारी मार्गांवर वसलेलं आहे, पश्चिम सागरी मार्गावरून जी व्यापारी वाहतूक होते त्यासाठीचे सर्व रस्ते याच शहरातून जातात. पाठीशी सह्याद्री, दक्षिण बाजूने वेढलेली किर्रर्र जंगलं, उत्तरेकडे मैलों मैल पसरलेली दरी, आणि पूर्वेकडे पसरलेला सुपीक प्रदेश अशी त्याची रचना आहे. याच गोष्टीमुळे तीन बाजूनी या शहराला भक्कम संरक्षण भेटल आहे. याच गोष्टीमुळे तेव्हा ची राजधानी या शहराला केलं होतं. याच शहरात जवल जवळ 300 वर्षांपूर्वी घडलेली हि घटना, तेव्हा समृद्धीचं शिखर या शहराने गाठल होतं. त्यावेळी राजा मारुत यांची संपूर्ण दंडकारण्यावर एकाधिकार असायचा. जवळ जवळ संपूर्ण जगभरात त्याच्या पराक्रमाचे गोडवे गायले जायचे. ज्यप्रमाणे राजाच्या पराक्रमाची कीर्ती होती त्याचप्रमाणे त्यांची राणी सुद्धा सौंदर्या मुळे फार प्रसिद्ध होत्या.

या काळात राज्यावर बरीच आक्रमण झाली पण कुणीच इंचभर जमीन सुद्धा जिंकू शकलं नाही. अशाच आक्रमण करणाऱ्यांपैकी एक होता रमण. रमण हा तळकोकणापासून ते पश्चिम कर्नाटक पर्यंत पसरलेल्या भागाचा शासक होता. असं म्हणतात त्याने जवळ जवळ 3 वेळा चढाई केली, पण प्रत्येकच वेळेस तो असफल राहिला. पण त्याने हार मानली नाही, या 3 पराभवानंतर त्याने असुरी शक्तीची आराधना करणं सुरु केलं, बरेच नरबळी दिले. एव्हढंच काय त्याने स्वतःच्या लहानग्या मुलीला सुद्धा नैवेद्य म्हणून चढवलं आणि याचंच फळ म्हणून का काय त्याला महाभयानक अशा अघोरी शक्ती भेटल्या. आणि त्याने यावेळी पुन्हा चढाई केली, सोबत होती डोळ्यांनी दिसणारी मानवी आणि न दिसणारी पण जाणवणारी अमानवीय फौज. येताना वाटेत लागणारी गावं तुडवत, अत्याचार करत शेवटी ते मलुकनगरीच्या 40 मैलांवर येऊन ठेपले. मारुत राजाने त्यांना इथेच थांबवण्याचा निर्णय घेतला.

सोबत हजारोंच्या फौज घेऊन राजा मारुत ने रमण च्या सैन्यावर धावा बोलला. सूर्योदय होताच युद्ध सुरू झालं. खरंतर हे युद्ध सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये चालू होतं., दाट झाडी, हिंस्र श्वापद यांनी भरलेली ती डोंगर होती. काही ठिकाणी तर दिवसा सुद्धा अंधारच होता. पण या युद्धात राजा मारुतने प्रयत्नांची पराकाष्ठा केली, अचाट बुद्धिमत्ता आणि पराक्रम वापरून रमणी फौजेला जेरीस आणलं, जवळ जवळ दुपार पर्यंत मलुक ची फौज सहज जिंकेल अशे चिन्ह होते. आता हार निश्चित असं वाटल्याने रमणी फौजेच्या सेनापतीला माघारी फिरण्याचे आदेश दिले. जसे आदेश मिळाले तशी संपूर्ण फौज दक्षिणेकडे धावायला लागली अजाणबनाकडे. अशा ठिकाणी जिथं जंगल अधिक घनदाट होतं. माघारी फिरणारे शत्रू बघून राजा मारुत ला अजूनच चेव आला, त्यानेकाही सैन्य हाताशी घेतलं, एकदाचा काय तो याचा निकाल लावावा म्हणून सैन्य घेऊन रमण ला पाकडन्यासाठी अजाणबन कडे निघाला, जस ते जंगल सुरु झालं तसा चिक्कार अंधार सुरु झाला. असे वाटत

होतं जणू आताच रात्र झाली आहे, अक्षरशः मशाली पेटवून पुढे जावं लागतं होतं. काही मैल पुढे गेल्यावर ते एका टेकडीवर आले, टेकडीच्या पायथाशी एक नदी वाहत होती. इथून पुढचा पूर्णच प्रदेश नजरेत येत होता, अर्धा मैलावर काही हालचाल जाणवू लागली, राजाने सर्वांना सावधानतेचा इशारा केला आणि हळूहळू सर्व जण पुढे सरकू लागले. अचानक समोरून एक सैन्याची तुकडी चाल करून येत होती, हि तुकडी कधी आपल्या पल्ल्यात येते याचीच वाट मलुक सैनिक बघत होते, आणि तेव्हढ्यात जशी ती तुकडी जवळ येत होती तसा हवेतला गारठा हळूहळू वाढू लागला, काहीच क्षणात हाड गोठावी एव्हढी थंडी वाढली, सोबत असलेल्या मशाली विझून गेल्या. राजाला कळत नव्हतं नेमकं चालू काय आहे ते, प्रत्येकच व्यक्ती इतका गोठून गेला होता की हातपाय चालवणं सुद्धा अवघड होऊन बसलं. तिकडून ती सैन्य तुकडी समोर कूच करत होती. बघता बघता ते नदीजवळ आले, आता मात्र इथे त्यांना थांबावं लागणार होतं आणि मलुक सैनिक बाणांच्या साह्याने

त्यांचा फडशा पडू शकणार होते. पण एक आश्चर्य घडलं, ते सैनिक अक्षरशः नदीवरून चालत होते, थोड्याच वेळात त्यांनी पूर्ण नदी पार केली आणि जशी नदी पार झाली तस तीचं पूर्णतः बर्फात रूपांतर झालं, ते सगळं बघून मलुक फौजेचं पूर्ण अवसानच गळून पडलं. त्यात थंडी एव्हढी वाढली होती की बरेच सैनिकांनी शस्त्र टाकून दिले होते. मग काय जे व्हायचं त्याच्या उलटंच झालं. त्या आलेल्या तुकडीने नुसती कापाकापी सुरु केली, अर्ध्या प्रहरात हजारोंची फौज संपली, आणि राजा व त्याच्या काही साथीदारांना अटक केलं गेलं. आता मात्र विनाश अटळ होता. राजाच अटक झाला म्हंटल्यावर मागे ठेवलेली सेना तरी काय लढणार ना, ते सुद्धा रमण च्या अमानवी सेनेला शरण गेले. ".

प्रधानजी हि घटना सांगत असताना अचानक त्यांचं बोलणं थांबवत श्रवण म्हणाला

"प्रधानजी पण ती अमानवी शक्ती होती तरी काय?"

"त्याचं नाव होता, 'कामक', नावाप्रमाणेच कामवासनेतून जन्माला आलेला दैत्य, असं म्हणतात जेव्हा कलयुग सुरु झालं होतं  तेव्हा माणसातल्या अनेक राक्षसी प्रवृत्तींनी शिखर गाठलं होतं आणि त्यात कामवासना या गोष्टीने तर स्त्रियांवरील अत्याचार खूपच वाढले होते. म्हणून त्या काळातल्या जीवक ऋषींना यावर तोडगा काढावं असं वाटलं, जीवक ऋषी म्हणाल तर त्या काळचे सर्वोच्चा आयुर्वेदाचार्य . जवळ जवळ 12 वर्ष प्रयत्न केल्यानंतर त्यांनी एक औषधी तयार केली. यासाठी त्यांनि सह्याद्री, निलगिरी, हिमालय, ब्रह्मदेश पालथं घालून वेगवेगळ्या जडीबुटी जमा केल्या. यासर्व जडीबुटी शिवाय अजून एक गोष्ट लागत होती ती म्हणजे उन्मत्त झालेल्या व्यक्तीचं रक्त. हा पदार्थ बनवण्यासाठी कृष्णा नदीचा जिथून उगम होतो त्या पर्वतातून झिरपणार पाणी सर्वात अनुकूल होतं म्हणूनच सह्याद्री मधे निर्माण करायचं ठरवलं. परंतु प्रत्येक व्यक्तीला पुरेल एव्हढी औषधी तयार करणं हे काही साध काम नव्हतं. त्यासाठी दिवस रात्र एक केला गेला, माणसा ऐवजी उन्मत्त

झालेले हत्ती वापरले गेले, हजारो हत्ती चे प्राण गेल्यानंतर कुठे जाऊन आवश्यक प्रमाणात औषधी बनवता आली आणि त्यानंतर जीवक ऋषींच्या शिष्यानी संपूर्ण भारतात पसरून जेव्हढ्या काही नद्या अस्तित्वात आहेत त्या नद्यांमध्ये हि औषधी टाकून दिली. काही दिवसांतच त्या औषधींचा प्रभाव दिसायला सुरुवात झाली आणि बघता बघता सर्वकाही सुरळीत झालं. पण म्हणतात ना प्रत्येक गोष्टीचा फायदा आणि तोटा दोन्हीही असतात. असंच काहीसं यावेळीही झालं आणि त्यातुनच 'कामक' या असुरी शक्तीची निर्मिती झाली. पण ही शक्ती कोणत्या प्रक्रियेतून निर्माण झाली हे मात्र आपणाला माहित नाहीये.

असो पण रमण ने याच कामक ची उपासना केली, पण सहजा सहजी तो प्रसन्न झाला नाही, असं म्हणतात की रमण ने आजूबाजूची जी काही राज्य जिंकली होती त्या राज्यांतील स्त्रिया कामक ला दान केल्या होत्या. कामक या स्त्रियांचा दिवसरात्र उपभोग घेत होता. वर्षभर असा स्त्रियांचा पुरवठा चालूच होता, पण कामक हि एका प्रकारे

लक्षावधी पुरुषांच्या वासनेतूनच तर बनला होता, एव्हढ्या लवकर त्याची तहान भागण कठीण होतं, शेवटी कामक ने तर रमण कडे सरळ त्याच्या लहानग्या मुलीची मागणी केली. रमण सुद्धा सुढ भावनेत इतका वाहून गेला की त्याने कामक ची हि मागणी सुद्धा मान्य केली. रमण च्या या बलिदानामुळे तो प्रसन्न झाला आणि त्याने स्वतःच्या शक्ती त्याला दान केल्या. युद्धात मलुक सैन्यसोबत जे झालं तो त्या शक्तीचा एक छोटासा हिस्सा.

ही झाली कामक ची माहिती, तर मी तुम्हाला युद्धाबद्दल सांगत होतो. अजाणबनमध्ये कामक ची शक्ती वापरून रमण ने राजा मारुत ला अटक केली. सोबत काही राजाचे मित्र, अधिकारी सुद्धा होते. आणि या सर्व बंदिना घेऊन त्याने थेट मलुकनगर गाठलं. पूर्ण जनतेसमोर राजाचा शिरच्छेद करून मलुक चा अधिपती होण्याची त्याची इच्छा होती. पण नियतीच्या मनात काहीतरी वेगळंच होतं.

इकडे राजाच कैद झाला म्हणून आता मग मलुकनगरीने तह करण्याचं ठरवलं. राजवाड्यात एक बैठक भरली, सर्वच मंत्रीगण, राजर्षी, आणि त्यासोबत राणी उमा हे सगळे त्या बैठकीत होते, आता रमण सोबत तह तर करावंच लागणार होता, अशावेळी प्रधान हेच राजा नन्तर राजकारभारातील सर्वद्योतक होते, म्हणून आता रमण सोबत मुख्य तहाची बोलणी करण्यासाठी प्रधान नि जावं असं सर्वच लोक सुचवत होते.

सर्वच लोक एकमताने राजी होणार तितक्यात उमा राणीने त् स्वतः रमण सोबत बोलणी करायची आहे असा प्रस्ताव बैठकीत ठेवला, साक्षात राणी ने अशा नराधम समक्ष जाण म्हणजे अनर्थ, राणीचा असा प्रस्ताव मांडताच सम्पूर्ण मंत्री मंडळाने त्याला पूर्ण विरोध केला, जो तो आपला नकार दाखवत होता, काहीजण तर सभात्याग करण्याच्या ततयारीत होते... परंतु या सर्व नाकारत राज ऋषी मात्र राणीच्या बाजूने उभे होते, राणी तशी बुद्धीने तल्लख होती,

तिने अनेक बाजू मांडून पूर्ण मंत्री मंडळाला विनवण्याचा प्रयत्न केला परंतु कुणीच मान्य होत नव्हतं. आता मात्र राणीकडे एकच पर्याय उपलब्ध होता आणि तो म्हणजे सम्राज्ञी निष्ठा अधिकार,

हा त्यावेळेचा असा नियम होता की जर का राजा म्हणजेच सम्राट जर का राज्यात नसेल तर राजकारभाराची घडी नीट बसवण्यासाठी सम्राज्ञी ला काही विशेष अधिकार मिळाले होते ज्यामुळे तिचा प्रत्येक शब्द हा मंत्री मंडळाला मान्य करावा लागेल, आणि तेच झालं, राणी स्वयंघोषित रित्या त्या तहाची मुख्य बनली आणि तिच्याच सांगण्या वरून तसा प्रस्ताव रमनला पाठवला गेला.

उमा  बुद्धीने तल्लख, राजपाटलावरच्या अनेक चालिंमध्ये त्या पारंगत होत्या, लहानपणीच आपल्या माहेरी सुद्धा त्यांनी राजपेचाचे अनेक डाव शिकले होते, आणि सध्याच्या राजकारभरात मारुत राजा त्यांचा सल्ला नेहमीच घेत असे, हे झालं बुद्धीच पण सुंदरता म्हंटली तर ब्रह्मदेवाची सर्वोत्तम कलाकृती असं म्हणणं अतिशयोक्ती ठरणार नाही.

अद्‌भुत सुन्दर होत्या त्या. साक्षात  स्वर्गातील रंभाच!!त्यांचे ते लांब काळेभोर केस, रंगाने जराशा सावळ्या, सूर्यनारायणाला सुद्धा हेवा वाटावा एव्हढं चेहऱ्यावर झळकणार तेज.

, . अशा सुंदर पण चतुर स्त्री सोबत प्रतिशोधाच्या अग्नी ने लालबुंद झालेल्या रमण चा तह होणार होता.

बोलणीसाठी सरळ राजवाडाच निवडला गेला, मुख्य सभागृहात दोन्ही बाजूचे लोक बसले होते, राणी जरी मुख्य असली तरी त्या परद्या आड होत्या, व तिथूनच आदेश देत होत्या. कैद केलेले राजा व त्याचे अधिकारी मात्र छावणीतच ठेवले होते. इकडे रमण च्या एका प्रतिनिधीने बोलायला सुरुवात केली, त्या प्रतिनिधींच्या बोलण्यातूनच एक अहंकार झळकत होता, आणि तो फक्त मलुक चं गर्व हरण करण्यासाठीच तिथे होता हे स्पष्ट जाणवत होतं,

त्यांनी स्वतःच्या अनेक मागण्या ठेवल्या, त्या मागण्या म्हणजे थोडक्यात सांगायचं झालंच तर जवळ जवळ मलुक नगरीची पूर्ण सत्ता आणि वर्चस्व याशी निगडीतच होत्या. उमा राणीला स्वतःच्या परिस्थितीची माहिती होती. एकतर राजा कैदेत होते, मुख्य फौज संपलीच होती, जर रमण ऐवजी दुसरा कोणताही राजा असता तर तिने त्या मागण्या कदाचित पूर्णतः मान्य केल्याही असत्या, पण रमण ने कामक ची मदत घेतली होती, अफाट बलिदान दिल होतं आणि ते फक्त या मलुकसाठी. जर त्याला हे राज्य असं भेटलं तर मात्र सूडाच्या अग्नीत पूर्ण राज्य उध्वस्त करण्यास मागे पुढे पाहिलं नसतं.... म्हणून बराच वेळ विचार केल्यानंतर राणीने पडद्या मागूनच बोलायला सुरुवात केली.

'मानलं कि तुमचा लढाई मधे विजय झाला आहे, परंतु मलुक हे दङ्करण्याची राजधानी, आम्ही इथे तुम्हाला तह करण्यासाठी बोलावलं आहे, ना कि सम्पूर्ण

दण्डकारण्याचं हनन करायला, तुमच्या या मागण्या मलुक नगराला अमान्य आहेत

ते ऐकून तिथे असलेला प्रत्येकच जण चकित झाला. साक्षात रमण लाच मागण्या अमान्य आहे असं बोलणं ते हि एव्हढं मोठा पराभव झाल्यानंतर!!

तेव्हढ्यात रमण क्रोधात उभं राहून म्हणाला

'पराभूत असूनही एव्हढा माज!!जर मलुक ला अमान्य असतील तर मग त्या मागण्या आम्हाला वदवून घ्याव्या लागतील', आणि हे बोलून त्याने म्यानातील तलवार बाहेर काढली, त्याला बघताच तिथे उपस्थित त्याच्या प्रत्येकच प्रतिनिधी, अधिकारी, आणि सैनिकाने तलवार बाहेर काढली, रमण रागाने लालबुंद झाला होता आणि तो त्या पुढे काही बोलणार तेव्हढ्यात राणी ने परदा बाजू सारून सर्वांसमक्ष आली. तीचं ते त्या दिवशीचं अद्भुत रूप बघताच रमण काही थबकून गेला. तिच्या सौंदर्याची कीर्ती जरी त्याने याआधी ऐकली होती तरी आजपर्यंत कधी पाहिलं

नव्हतं. राणीला तर असही बघून कोणीही भुलला असता, इथे तर कामक रमणवर चढून बसला होता.

रमण ने तलवार म्यानेत ठेवली व तीचं सौंदर्य न्याहाळू लागला. म्हणतात ना सुंदर स्त्री समोर आल्यावर पुरुषांचे मेंदू घुडघ्यात जातात, तसेच काहीसं झालं.

"उमा राणी, खूपच अद्‌भुत सुंदर आहात तुम्ही. ईश्वराची सर्वोत्तम कलाकृती. तुमचं हे सौंदर्य बघून मी खुश झालोय, त्यामुळे आता मी वेगळा प्रस्ताव तुम्हाला देतो. मी राजाची सुटका करेन, आणि मलुकनगरी माझी केवळ मांडलिक म्हणून राहील परंतु राज्यकारभाराची स्वायत्तता पूर्णतः राजाकडे दिली जाईल, त्याबदल्यात माझ्याशी लग्न करावं लागेल, बोला आहे मंजूर?!!

राणीच्या डोक्यात नक्कीच काहीतरी घोळत होतं, कदाचित सगळं तिच्या मनाप्रमाणेच घडत होतं, तिने लगेचच लग्नाला होकार दिला. तिचा तो होकार ऐकून बाकीचे लोकच काय स्वतः रमण सुद्धा चकित झाला, पूर्ण राजवाड्यात कुजबुज सुरु झाली, आत जे झालं त्यावर

कुणाचाच विश्वास नव्हता, सर्वच लोक अचम्बित झाले होते, मलुक च्या मंत्रीगणाने मान खाली टाकली होती, तिथल्या प्रत्येकालाच कदाचित वाटत असणार कि मलुक ची अशी अब्रू जाण्यापेक्षा रमण इथल्या प्रत्येकाचा शिरच्छेद केला असता तर बरं झालं असत, पण या सर्व गोंधळात का जाणे पण राज ऋषींच्या चेहऱ्यावर मात्र एक किंचित स्मित हास्य उमटलं होतं

तिकडे रमण तलवार हातात घेऊन आरोळी ठोकत होता, त्याच्या दुसऱ्याच हातात मद्य सुद्धा होतं, सध्या चढलेली धुंदी त्याच्या बुद्धिपेक्षा अवजड झाली होती असं म्हणणं व्यर्थ ठरणार नव्हतं,

झालं तर मग, 2 दिवसानीच गावातील महादेव मंदिरात लग्न सोहळा होता. मंदिराच्या गाभाऱ्यातच यद्न्य केला गेला, लग्न लावण्यासाठी शौनक ऋषी म्हणजेच

राज्याचे राज ऋषी हे स्वतःच भट बनले होते, सम्पूर्ण नगरात राणीच्या नावाने नको नको ते अपशब्द वापरले जात होते, त्या नगरीतल्या कुणालाच त्या मलुक चं लज्जा हरण करणाऱ्या विवाहाचा साक्षी बनायची इच्छा नव्हतीच, पण रमण च्या सैनिकांनी प्रत्येकच व्यक्तीला तिथे बळजबरीने आणलं होतं . मंदिराच्या मागच्या बाजूनेच श्रावणी नदी वाहत होती, त्या पवित्र नदीची रोजच पूजा व्हायची, अनेक ब्राह्मण तिथे अर्ध्य द्यायचे, परंतु आजच्या या अमंगळ दिनी कुणीच तिथे गेलं नव्हतं,

मंदिराच्या समोर सम्पूर्ण नगर वासीयांची गर्दी होती, बऱ्याच प्रमाणात परंतु विरळ असे सैनिक उभे होते, कारण त्यांचा एक मोठा ताफा शहराच्या बाहेरील छावणीत मदिरा पिण्यात व्यस्त होता.

इकडे गाभाऱ्यात मंत्र विधी सुरु झाले, उमा राणी आज तर विलक्षण दिसत होती, त्या प्रसंगात सुद्धा ती फारच धीर गंभीर वाटत होती, ना कसली भीती ना गडबड, पण का कुणास ठाऊक तिची नजर मात्र फक्त यज्ञाकडे होती,

दुसरीकडे रमण मात्र असुरी आंनद घेऊन तिथे आला होता, आज पर्यंत त्याने ज्यासाठी एव्हढी तपस्या केली ते मलुक आणि वरून उमा सुद्धा त्याला मिळणार होती, आणि गाभाऱ्यात तिसरा व्यक्ती म्हणजे राज ऋषी, ते मात्र नेहमी प्रमाणेच प्रसन्न दिसत होते, जणू काही झालंच नाहीये, आणि बघता बघता मंत्र सुरु झाले, प्रत्येक मंत्र झाल्यानंतर ऋषी त्या यज्ञात तूप ओतत होते आणि प्रत्येकच मंत्र झाल्यानंतर अग्नी अजून मोठा होत होता. काही मंत्र झाले आणि अचानक त्या गाभाऱ्यात एक सुगन्ध पसरू लागला, खूपच हवाहवासा, दारिद्य आणि घाणीच्या उकिरड्यात बसलेला व्यक्ती पण उत्तेजित होईल असा सुगन्ध, काहीच वेळात यज्ञाच्या भोवती प्रदक्षणा सुरु झाल्या. जशा प्रदक्षिणा सुरु झाल्या तसा रमनच्या वागण्यात एक वेगळाच बदल जाणवू लागला, त्याने त्याची नजर उमा कडे स्थिर केली, एक वासनांध लांडगा जणू त्याच्या आतमधे जागा झाला असं वाटत होतं, एक दोन प्रदक्षिणे नंतर तर तो अजबच वागू लागला, असं वाटत होतं की जणू त्याचं त्याच्या शरीरावर बंधनच नाहीये, डोळे

लालबुंद झाले होते, हातांची नकळत हालचाल होता होती, तोंडातून उमेचं नाव घेत होता, त्याचं ते विक्षिप्त वागणं बघून राज ऋषींचा चेहरा खुलत चालला होता, काहीतरी आपण मिळवत अहो असे भाव उमटत होते, त्यांनी त्यानंतर अचानक खुप सर तुप त्या यज्ञात ओतायला सुरु केलं, तसा रमनचं वागणं अजून च विचित्र झालं. त्याने आजूबाजूला असलेल्या पूजा सामग्रीला लाथ मारली, शौनक ऋषींना एव्हदहा जोरात धक्का मारला कि ते गाभाऱ्याच्या बाहेरच जाऊन पडले, आणि आता गाभाऱ्यात फक्त ते दोघेच उरले, तो राणीकडे उत्तेजित नजरेने पाहू लागला, त्याने राणीचा पदर पकडला आणि हळूहळू तिला निर्वस्त्र करणं सुरु केलं, राणी मात्र अजूनही चलबिचल झाली नव्हती, याउलट तिने हात जोडले, डोळे बंद केले आणि काहीतरी पुटपुटन सुरु केलं. बाहेरून हा सगळा तमाशा दिसत होता, रमण सर्व मलुक समोर हा अनर्थ करत होता, आपल्या डोळ्या देखत मलुक च्या अब्रूचे हे धिंडवडे बघून अनेक जण ते थांबवण्यासाठी पुढे आले, पण रमण चे सैनिक बाहेरून

कुणालाही आतमधे येऊ देत नव्हते. प्रत्येकाला वाटत होतं की आता अनर्थ अटळ आहे. रमण हळूहळू निर्वस्त्र करत होता, राणीने डोळे मिटलेलेच होते, रमण तीचं ते हळूहळू उलगडणार रूप पाहून राक्षसी हसत होता. लांडगा जसा आपल्या सावजा कडे बघतो तशीच त्याची नजर होती, कधी एकदा फडशा पडू असं त्याला होत होतं आणि... आणि अचानक रमण किंकाळ्या फोडू लागला, एकाएकी असंख्य वेदना त्याला होत होत्या. कुणालाच पता नव्हता कि होत काय आहे. राणी हात जोडून निर्वस्त्र अवस्थेत तशाच उभ्या . हळूहळू रमण च्या शरीराची माती व्हायला सुरुवात झाली. त्याच्या शरीराचा एकेक भाग मातीच ढेकूळ फुटाव तसा फुटत होता. हळूहळू राणी बाहेर आल्या, गाभऱ्याचा दरवाजा हळुवार बंद झाला. त्यांनी एकदा प्रजेकड बघितलं, पुन्हा डोळे मिटले. त्यांचा शरीरातून प्रकाश चमकायला सुरुवात झाली आणि बघता बघता त्यांचं शरीर एका पांढऱ्या चकाकणाऱ्या दगडात रूपांतरित झालं.

तिथं उपस्थित असलेल्यांपैकी सगळेच गोंधळले होते. कुणालाच कळत नव्हतं कि झालं काय आहे. आताच शक्तिवान दिसणारा रमणची माती झाली आणि समोर दिसणारी हाडा मांसाची राणी अचानक पुतळा कशी बनली?

तेव्हढ्यात शौनक ऋषी उठले, त्यांनी तो पुतळा लागलीच एका वस्त्राने झाकला. काही क्षण डोळे झाकून आणि हात जोडून त्यांनी काहीतरी प्रार्थना केली आणि त्यानंतर मागे वळून पूर्ण जनतेकडे बघितलं आणि डोळ्यातलं पाणी मिटत ते बोलू लागले,

'आपलं राज्य व् टिकाव यामुळेच राणीने बलिदान दिल. हा सर्व एका कटाचा भाग होता. उमा राणी म्हणजे एका महान कुळातल्या राणी, त्यांना सुद्धा त्या कुळाप्रमाणेच पतीव्रतेचा वर मिळाला होता.

या वारानुसार  कोणताही पुरुष त्यांचा पती सोडून जर त्यांच्यावर अतिप्रसंगाचा प्रयत्न करेल तर त्याचं शरीर नष्ट होईल जस आता रमण च झल आणि त्याची आत्मा कैद होऊन राहील काळाच्या अंतापर्यंत.

हा सगळा कट मी आणि उमारानी ने मिळून केला होता, आम्ही तुपामध्ये उत्तेजित करणारा एक स्निग्ध पदार्थ टाकला होता, जो जळतो आणि त्यातून एक सुगन्ध बाहेर येतो तो कोणत्याही पुरुषाला एका उत्तेजित हत्यीप्रमाणे वासनांध करण्यासाठी पुरेसा आहे. आणि तेच झालं

त्याने तरी स्वतःला सावरण्याचा खुप प्रयत्न केला. परंतु कामक च प्रभाव असल्याने त्याचं स्वतःवर नियंत्रण राहणार नाही याची राणींना खात्री होती आणि त्याने आम्हाला पूर्णपणे बरोबर ठरवलं, त्याच्यातला असुर बाहेर आलाच आणि त्याने हा अनर्थ केला, प्रभाव इतका पडला की त्याचं स्वतःच्या शरीरावर आणि बुद्धीवर काहीच संतुलन नाही राहीलं, कदाचित जर का तो अजून काही वेळ संतुलित

असता तर कदाचित त्याचा विवाहच उमा राणीसोबत झाला असता, मात्र दैव आपल्या सोबत होतं, हो पण या सगळ्यांमध्ये मात्र राणी ने स्वतःचा जीव अर्पण केला.

सध्या रमण तर मेलाच आहे पण त्याची आत्मा राणीने गाभाऱ्यात कैद केली आणि कामक च्या शक्ती स्वतः मध्ये शोषून घेतल्या जेणेकरून रमण ची आत्मा शक्तीहिन बनून तेथेच पडून राहील. यात राणीचा जीव गेला हे वाईट झालं. पण आता मात्र कामक च्या शक्ती कुणी वापरू शकणार नाही कारण त्यासाठी हा पुतळा तोडावा लागेल आणि त्या वरा नुसार या पृथ्वीवरची कोणतीच भौतिक वस्तू या पुतळ्यास तोडू शकणार नाही.

एव्हढं बोलून त्यांनी एका ताम्रपटावर लिहिलं.

'रमण कैद आहे, आणि कामक दुर्बल, पण जेव्हाही ह्या पुतळ्याची विटंबना होईल तेव्हा रमण स्वतंत्र होईल

आणि मलुकच्या आणि दंडकारण्याच्या स्त्रियांचे प्राण जातील, "

आता प्रधानांनी त्यांचं बोलणं थांबवलं आणि सोबत आणलेला ताम्रपट दाखवला. सर्वजण त्याचकडे निरखून बघत होते. "मी आतापर्यंत जे तुम्हाला सांगितलं हि सर्व माहिती मुखोगत आहे, त्यावर किती विश्वास ठेवायचा हे सांगता येणार नाही. हो पन या सर्व घटनेचा एक पुरावा आहे तो म्हणजे हा ताम्रपट. ".

"का प्रधानजी, बाकीचे पुरावे का नाहीये?", श्रवण ने विचारलं.

ते ऐकून गिरीराज म्हणाले, "मारुत राजानंतर दोन वेळा सत्ता हस्तांन्तर झालं, प्रथम हस्तांतरच कारण म्हणजे

जरी राणीने एव्हढं मोठं बलिदान दिलं, राज्य वाचवलं तरीपण त्यानंतरच्या पिढ्यानी मात्र तेच राज्य नीच स्तरावर नेऊन ठेवलं, जनतेवर अत्याचार केला, अर्थव्यवस्था डबघाईला आणली

त्यामुळे त्यांच्या प्रधानांनी मग जनतेच्या आग्रहावरून राज सिंहासन स्वतःकडे घेतलं. पण समस्या त्यांचीही होती, कितीही प्रमाणिकपणे काम केलं तरी अनेक नैसर्गिक आपतींमुळे राज्याचं कम्बरड मोडलं. रमण जरी कैद होता तरी त्याची अवकृपा मात्र त्या शहरावर झाली होती. त्यातच ज्या प्रधानांनी राज्य चालवायला घेतलं त्यांचाही मृत्यू झाला. मग शेवटी आमचे पिता जे प्रतिष्ठान चे उमराव होते, सर्वांच्या आग्रहावरून दंडकरण्याचे अधिपती बनले, पण त्या शहरा सम्बंधी असणाऱ्या अफवांमुळे त्यांनी राजधानीच आपल्या प्रतिष्ठान ला हलवली जेणेकरून त्या अशुभ शहराचा प्रभाव दण्डकरण्यावर पडणार नाही

सर्वच जण त्या मंदिरा पासून दुरावा ठेवत होते, त्यासंबंधी कोणतीही गोष्ट आपल्या जवळ ठेवली तर त्याने आपला विनाश होईल अशी समजूत पसरली, एव्हढंच काय तर त्याबद्दल बोलणं सुद्धा बंद केलं, दोन तीन पिढ्या नंतर तर त्या गोष्टीवर इतका बहिष्कार टाकला गेला की या घटनेबद्दल बऱ्याच लोकांना माहिती सुद्धा नाहीये. आता जी काही माहिती मिळवायची असेल ती या कथेवरून आणि मलुक मध्ये गेल्यानंतरच मिळेल. "

"बाबा अजून एक प्रश्न आहे, मारुत राजाचे वंशज सुद्धा तिथेच राहतात का?, जर त्यांच्याकडून काही माहिती मिळाली तर?"

"ते सध्या तरी मलुक मध्ये राहत नाहीत, असं म्हणतात की राज्य गामावल्यानंतर त्यांनी मलुक सोडलं आणि कोंकण प्रदेशात कुठेतरी ते राहतात, पण नेमकं कुठे याचा शोध घेण्याचा आम्ही प्रयत्न केला नाही"

यानंतर काही वेळ अचानक शांतता पसरली, प्रत्येकजण विचारात मग्न झालं होतं, तेव्हढ्यात सेनापती म्हणाले, "महाराज, मग त्या ताम्रपटा नुसार आता खरंच स्त्रियांचे मृत्यू होतील?"

"सेनापतिजी आम्हाला आधी हे खरं वाटत नव्हतं, पण एव्हढयात काही लहानग्या मुलींचे मृत्यू झालेले सुद्धा आहेत!!आणि त्याच सोबत काही तरुणींचे सुद्धा प्राण गेले आहेत, आपल्याला या सम्बंधित अफवा पसरण्याआधी लवकरात लवकर पाऊले उचलावी लागणार आहेत"

"बाबा मला परवानगी द्या, मी मलुक ला जातो आणि तिथे नेमकं काय घडतंय याचा छडा लावतो. "

"श्रवण पण तुझं आजच लग्न झालंय, आणि आताच पाठवणं ते पण अशा ठिकाणी, मी परवानगी नाही देऊ

शकत""बाबा पण माझ्या ज्ञानाचा काय फायदा होणार मग?"

"बाळ, तिथे जाऊन फक्त एव्हढंच कार्य नाही करायचं, तिथले लोक फार भयभीत झाले आहेत, त्यांना अभय मिळेल हे पण तितकंच महत्वाचं आहे"

"का नाही, मी नक्कीच करेल हे, मी आणि सती दोघे मिळून तिथं जातो"

सती म्हणजेच श्रवण ची नवविवाहित पत्नी हिच नाव काढताच अचानक शांती पसरली. त्या सभेत सामदेशाचे उमराव अर्थात सतीचे पिता सुद्धा उपस्थित होते आणि आताच लग्न झालेल्या आपली मुलगी आणि जावई मलुक सारख्या गावात जाताय असं ऐकल्यावर साहजिक त्यांच्या चेहऱ्या वरचे हावभाव जरा चिंतित झाले.

"कृष्णदेव, जर श्रवण आणि सती ची जाण्याची वेळ आलीच तर तुम्ही परवानगी देणार का?", गिरीराज स्वतः कृष्णदेव याना म्हणाले.

"अहो असं काय म्हणता, जशी ती माझी तशीच आता तुमची सुद्धा मुलगी आहेच, आणि हो तिच्या बुद्धिमत्तेवर आणि चातुर्यावर मला तिळमात्र संशय नाही. "

"झालं तर बाबा, मी आणि सती काहीच दिवसात तिथं पोहोचतो आणि तिथलची घडी व्यवस्थित लावतो"

"श्रवण, एव्हढी घाई बरी नव्हे, तुम्ही दोघेही थोडे दिवस विश्रांती घ्या, कारण आता वैशाख संपताच पावसाळा सुरू होईल, आणि पावसाळ्यात सह्याद्री त्याचं रौद्र रूप धारण करतो. "

"बाबा पण तोपर्यंत काही विपरीत घडलं तिथे तर, कदाचित पूर्ण गाव सुद्धा निरर्वासित होऊ शकतं. आणि जर वरील कथा खरंच सत्य असेल तर हजारो निरपराध स्त्रियांचे बळी जातील. "

"बरोबर आहे श्रवण, पण अशा कठीण परिस्थितीत, आणि ते हि मलुक ला!!!, नाही नको, त्यापेक्षा मी स्वतःच तिथे जातो, "

"महाराज, पण दक्षिणेतील परिस्थिती माहित आहे ना तुम्हाला, गोदावरी च्या मुखाशी राज्य करणारा गोंदक राजा आपल्या राज्यावर आक्रमण करायला नेहमीच तयार असतो, आणि त्यात जर  तुम्ही पश्चिमेकडे गेलात तर मग त्याला आयती संधी मिळणार"

"प्रधानजी पण ही सुद्धा राज्यवरील आपत्तीच आहे ना?"

"महाराज पण त्याबद्दल सत्यता किती वास्तविक आहे यबद्दल आपण साशँकच आहोत, मला वाटत तुम्ही युवराजाना परवानगी द्यावी, भविष्यात राजगादीवर बसल्यानंतर त्यांना अशा संकटांचा सामना करावाच लागेल मग आताच त्यांना तयार होण्याची संधी तुम्ही द्यावी असं मला वाटतं", बराच वेळ विचार केल्यानंतर महाराज म्हणाले,

"ठीक आहे, पुढच्या पौर्णिमेला तुम्ही वाटचाल करायला लागा, सेनापती सुद्धा तुमच्या संरक्षणासाठी सोबत असतील, फक्त काळजी घ्या, आणि हो आपल्या बैठकीत काय झालं याची वाच्यता बाहेर होता कामा नये, युवराज सुद्धा मलुक ला का चालले आहेत याची आपल्याशिवाय कुणाला कानोकान खबर झाली नाही पाहिजे"

एव्हढं बोलून मग बैठक बरखास्त केली गेली. आणि जो तो आपल्या शयन कक्षात निघून गेला.

श्रवण च्या आयुष्यतला हा एक महत्वाचा दिवस होता. आजच त्याचं लग्न झालं होतं, आणि आजच त्याच्यावर एक मोठी मोहीम सोपवली गेली होती. सध्या मात्र त्याच्या डोक्यात मलुक च चित्र तरळत होतं, तो सह्याद्री, ते मंदिर, पुतळा याचाच विचार करता करता शयनगृहात शिरला. जस दार उघडलं तस अचानक त्याला शुद्ध आली. समोर पलंग सजवून ठेवला होता. त्यावर सती पदर घेऊन बसलेली होती. सगळीकडे सुवास दरवळत होता. आजूबाजूला असणाऱ्या

पणत्या मुले हलकासा उजेड तिच्यावर पडत होता आणि त्या उजेडात तिच्या पैठणीवर केल गेलेलं नक्षीकाम अजून उठून दिसत होतं.

तस सतीला श्रवण आधीही भेटला होताच. लहानपणी जेव्हा महाराजांसोबत सामदेशाची सफर करायला गेला होता तेव्हा. गिरीराजांनी जेव्हा तिथे भेट दिली तेव्हा दोनच गोष्टी त्यांच्या मनात भरल्या होत्या, एक म्हणजे नर्मदा नदी, जवळ जवळ अर्धा मैल पसरलेलं तीच पात्र जेणेकरून उत्तरेतून राज्यावर आक्रमण करणं जवळ जवळ अशक्यच आणि दुसरी म्हणजे सती. अगदीच लहानगी असून सुद्धा तिच्या हजरजाबाबी उत्तरांमुळे स्वतः गिरीराज सुद्धा चकित झाले होते. कदाचित तेव्हाच त्यांच्या मनात ती भरली असणार...

इकडे श्रवण सती जवळ गेला. त्याने हळूच पदर बाजूला केला, सतीने हळूच त्याच्याकडे बघितलं. विलक्षण सुंदर होती ती. चेहऱ्यावर एक वेगळंच तेज होतं. डोळे टपोरे आणि काळेभोर, तिच्याबद्दल सांगायचं झालंच तर जसा

उगवता सूर्य असतो ना सर्वांसाठी नव्या उमेद आकांक्षा घेऊन येतो तशीच ती.

याउलट श्रवण होता, त्याचे डोळे फारच धीरगंभीर, चिर काळोखात वाट दाखवणाऱ्या चांदण्याच्या प्रकाशासारखा होता तो.

ती त्याच्याकडे बघून एक हलकस हसली आणि तिने बाजूला असलेली पणती विझवली....

: ***रहस्य***

आजचा दिवस खूप खास होता, आजच मलुक ला प्रस्थान करायचं होतं. श्रवण आणि सती दोघेही तयार झाले होते, सोबत सेनापती, साधारण 100 च पायदळ आणि काही घोडदळ सुद्धा होतं.

प्रतिष्ठान ची नेहमीची प्रथा होती ती म्हणजे राजघराण्यातील कुठलाही व्यक्ती जर का मोहिमेवर जात असेल तर त्या आधी गोदावरीची पूजा केली जायची, श्रवण ने सुद्धा मग तीच प्रथा पाळत सूर्योदय होताच ती पूजा केली, त्या प्रदेशातील ती एकमेव नदी होती जिला कडक दुष्काळात सुद्धा पाणी असायचं, त्यामुळे ती सर्वांनाच वंदनीय होती, पूजा सम्पताच श्रवण आणि सती ने सर्व ज्येष्ठांचा आशीर्वाद घेतला, नुकताच उगवलेल्या सूर्यदेवाला नमन केलं आणि मोहिमेवर निघाले.

जवळ जवळ 200 कोस अंतर होतं प्रतिष्ठान ते मलुक मधलं, साधारण पणे एव्हढं अंतर दहा बारा दिवसांत पार होतं पण इथे दंडकरण्याच्या घनदाट जंगलातून जायचं होतं, तसंच मधे मधे सह्याद्रीचे उंचच उंच सुळे लागणार होते. हिंसर् पशूंचा सामना करावा लागणार होता, आणि त्यातच वैशाखातल ऊन, एकंदरीत मोहीम बरीच लाम्बणार होती.

मजल दरमजल करत पूर्ण जत्था हळूहुळू पुढे सरकत होता, सुरुवातीचे चार पाच दिवस तरी सगळं सुरळीत चालू होतं, आणि सुरळीत चालण्याचं कारण म्हणजे अजून पर्यंत सह्याद्री लागलाच नव्हता, सपाट प्रदेशातून चाल होती, दर दिवशी चा मुक्काम कुठल्या न कुठल्या गावात असायचा.

प्रतिष्ठान चे राजा गिरीराज यांची प्रजेमध्ये प्रेमळ राजा अशी छबी होती, अशा राजाचे राजपुत्र आपली गावात येन म्हणजे गावकऱ्यांसाठी एक उत्सवच असायचा, प्रत्येक गावात त्यांचा योग्य तो पाहुणचार होत होता. ठिकठिकाणी सती आणि श्रवण च औक्षण केलं जायचं, आजही अशाच एका गावी यांचा आज मुक्काम होता. रोज प्रमाणे आजही गावात जोरदर आतिथ्य झालं होतं, गावाच्या किनाऱ्यावर छावणी करून पूर्ण जत्था मुक्कामी होता,

हळूहळू रात्र सरत होती तशी पूर्ण छावणी गाढ निद्रेत पहुडली होती, पण श्रवण ला मात्र का कुणास ठाऊक आज झोप येत नव्हती,

तो असच बाहेर फिरण्यासाठी आला आणि चांदण्यात नाहून निघालेल्या समोरच्या प्रचंड डोंगर रांगांकडे बघत होता. आकाश स्वच्छ होतं, पौर्णिमेचा चंद्र आणि त्याच्या जोडीला असंख्य चांदण्या होत्या, आणि त्या सर्वांच्या प्रकाशात समोरच असणाऱ्या डोंगराच शिखर लक्ख उजळून दिसत होता, ते दृश्य नजरेत साठवत

असतानाच अचानक त्याच्या खांद्यावर एक अवजड हात पडला,

"युवराज, कसला विचार करत आहात?", सेनापतींचा आवाज होता तो

"काही नाही, आज झोप येत नव्हती म्हणून मग सहजच बाहेर पडलो होतो, सेनापती हा समोरचा डोंगर सह्याद्री पर्वताचा भाग का?"

"हो युवराज, या गावापासून सह्याद्रीची हद्द सुरु होते, आतापर्यंत आपल्याला सपाट प्रदेश होता, पण इथून पुढे मात्र आता डोंगर रांगा आणि त्यातल्या घनदाट वनांचा सामना करावा लागणार आहे"

"म्हणजे मलुक ला पोहोचणं तितकंसं सोपं नाही तर, मग मला एक प्रश्न आहे की असं दूर स्थित नगर आधीच्या काळात इतकं प्रसिद्ध होतंच कसकाय?"

"युवराज, जुन्या काळी समुद्र मार्गे आपला व्यापार इतर देशांशी होत असे, आणि हा व्यापार होण्यासाठी पूर्ण आर्यावर्त मध्ये फक्त तिनंच मोठी बंदर होती, त्यातील एक आणि सगळ्यात प्रमुख बंदर कोंकणात आहे, आणि त्या बंदराकडे जाण्याचा एकमेव मार्ग हा मलुक मधून जायचा,

त्या काळी मलुक ला इतर मोठ्या नगरांशी जोडण्यासाठी एक विशाल काय मार्ग तयार केला होता, असं म्हणतात की त्या मार्गावरून एकाच वेळी चार बैलगाड्या मावतील एव्हढं तो रुंद होता, पण जेव्हा मलुक नगरात ते घडलं तेव्हापासून मात्र त्याची प्रतिष्ठा, सन्मान, व्यापार सगळंच बंदच पडलं, मग तो मार्ग सुद्धा हळूहळू नामशेष झाला, आता सध्या त्या मार्गाचे काही अवशेष मात्र आहेत ज्यांचा मागावा घेत आपण मलुक गाठणार आहोत"

"एका महानगराची अशी अवस्था, अरेरे!!!, सेनापतिजी सध्या मलुक ची स्थिती कशी आहे?"

"सध्या ते नगर तितकंसं समृद्ध नाहीये, पण शहर डबघाईला आलाय असं म्हणणं चुकीचं ठरेल, मलुक मधून दोन नद्या वाहतात, श्रावणी आणि स्निग्धा, या दोनही नद्यांना बारमाही भरपूर पाणी असत, याच दोन नद्यांनि मलुक च्या पूर्वेला एक संगम केलाय ज्याच्या आजूबाजूची जमीन हि फारच सुपीक आहे, त्यामुळे मलुक ला तस उत्पन्न बऱ्याच प्रमाणात आहे, पण हो जुन्या मलुक सारखं मात्र बिलकुल नाही"

"सेनापतिजी, मला आता कधी मलुक गाठतो आणि कधी नाही असं होत आहे"

"धीर धरा युवराज, अजून आपल्याला बराच प्रवास करायचा आहे, आणि हो त्यासाठी तुम्ही विश्रांती घेत सुद्धा तितकंच महत्वाचं आहे"

एका प्रकारे श्रवण ने आता झोपून घ्यावं असा निर्देश सेनापतींनी दिला होता आणि तो मिळताच ते दोघेही झोपी गेले,

दुसऱ्या दिवशी सूर्योदय होण्याआधीच प्रस्थान सुरु झालं. आणि अपेक्षे प्रमाणेच घनदाट झाडी सुरु झाली. काही ठिकाणी तर अक्षरश दिवसा ढवळ्या अंधार होता. बऱ्याचदा हिंस्र पशूंशी सामना सुद्धा करावा लागला. कधी कधी रात्री झोपलं असताना अचानक वाघाची डरकाळी ऐकू यायची, लँडग्यांच रडगाणं तर नित्याची बाब होती, कधीकधी तर एखाद्या नदीवर पाणी भरायला गेलं तर आपसूक एखादं अस्वल जांभया देताना दिसायचं. नशीब चांगलं होतं म्हणून अजून तरी पहिल्या पावसाची सुरुवात झालीच नव्हती नाहीतर रोगराईने उच्छाद मांडला असता. पण अनेक संकटांचा सामना करत, कस का होईना शेवटी ते मलुक च्या मुख्य द्वारावर येऊन ठेपले. त्याचं मुख्य प्रवेश द्वार

म्हणाला तर जवळ जवळ 10 माणसं उंच, त्याला बाहेरून मोठमोठाले खिळे होते जेणेकरून कोणी हत्ती द्वारे दाराला तोडू नये, बाहेरून तटबंदी होती, तिची उंचीसुद्धा जवळ जवळ दरवाजा एव्हढीच, परंतु बांधकाम फारच जून वाटत होतं, तटबंदीचे दगड सुद्धा हळूहळू झिजत होते, त्यावर अनेक वेली, झुडपं उगले होते. जसा यांचा जत्था तिथे पोहोचला तस त्यांचं स्वागत करण्यासाठी मलुक चे सामंत केशवराय तसेच सर्व अधिकारी आधीपासूनच उपस्थित होते.

जस यांचा प्रवेश मलुक मध्ये झाला तसा त्यांचा स्वागत समारंभ सुरु झाला, जणू वाटत होतं आज मलुक मध्ये उत्सव आहे, ठिकठिकाणी पताका उभारले होते, मुख्य पथावर रांगोळ्या काढल्या होत्या, तोरण उभारली गेली होती, राज्याच्या युवराज आणि युवराज्ञी ला बघण्यासाठी पूर्ण मलुक वासीयांची गर्दी झाली होती,

"युवराज तुम्ही मलुक मध्ये आलात आणि आम्ही धन्य झालो, कित्येक वर्षानंतर या नगरीला राजकुटुंबाचा स्पर्श झाला, आम्ही धन्य झालो", मलुक चे सामंत केशवराय श्रवण ला म्हणाले

"धन्य तर आम्ही झालोय सामंत जे या नगरीच दर्शन झालं, कित्येक वेळा मलुक च नाव ऐकलं होतं, आज साक्षात दर्शन होतंय", श्रवण ने भाव व्यक्त केले.

समोर फारच गर्दी झाली होती, सर्वच लोक या दाम्पत्याला भेटण्याचा प्रयत्न करत होते, ज्यांना शक्य नव्हतं ते लोक दुरूनच आशीर्वाद देत होते, सती आणि श्रवण च्या गळ्यात फुलांच्या माळाच माळा जमल्या होत्या, सगळेच लोक गर्दी अवरण्यात दन्ग झाले होते, आणि तेवढयात कुणाचा तरी रडण्याचा आवाज येऊ लागला,

एक स्त्री होती ती, तिच्या पेहराव्या वरून फारच गरीब वाटत होती, केस विस्कटलेले होते, आणि एक सारखा आक्रोश चालू होता,

"मला माझी मुलगी परत द्या, माझी मुलगी नेली सैतानान, परत द्या तिला", आणि असं म्हणून पुन्हा जोरजोरात ओरडणं सुरु होतं, कुणालाच काही कळत नव्हतं, सगळेच लोक चकित झाले होते, तितक्यात सामंतानी आपल्या काही सैनिकांना डोळ्यानेच निर्देश केला, आणि तो आदेश कळताच ते सैनिक त्या स्त्री कडे गेले आणि तिला दूर घेऊन गेले,

"सामंत, कोण आहे ती स्त्री, आणि काय म्हणतेय ती?", सतीने प्रश्न केला

"एक वेडी स्त्री आहे ती युवराज्ञी, ती नेहमीच असं करते, तरी तुम्ही चिंता नका करू, आपले लोक तिची योग्य ती काळजी घेतील"

खरं तर सती ला सध्या त्या शहरात काय चालू आहे याचा काहीच मागमूस नव्हता, श्रवण ने सुद्धा अजून पर्यंत काहीच तिला सांगितलं नव्हतं, म्हणून ती सध्याच्या प्रकाराने फारच गोंधळून गेली

"बरं केशवराय यांच्या राहण्याची व्यवस्था कुठे केलीये हे तर सांग, युवराज आणि युवराज्ञी दोघेही दमले असतील"

सेनापतींनी विषय बदलावा म्हणून विचारलं,

"तिथेच राजवाड्यात, खास युवराज येणार आहेत म्हणून त्याची डागडुजी, साफसफाई व्यवस्थित करून घेतलेली आहे"

"हे उत्तम केलं"

"सेनापतिजी, दोघे म्हणजे तुम्ही आमच्यासोबत नाही राहणार?"

"नाही युवराज, आम्ही वाड्यात नाही मात्र वाड्या समोर छावणी करून राहू, आमच्या सोबत सैनिकही राहतील. आणि तसही मी दिवसभर वाड्यातच थांबेल फक्त झोपण्यासाठी छावणीत जाईल, तसही तुमच्या से दास दासी असतीलच"

"ठीक आहे, जशी तुमची इच्छा"एव्हढं बोलून सर्वच जण राजवाड्याकडे निघाले,

राजवाडा म्हणाला तर बराच भव्यदिव्य होता पण अर्थातच जास्त वापरात नसल्याने तो तितका संपन्न वाटत नव्हता. वाड्याला सुद्धा एकपदरी तटबंदी होती, तिथेच आवारात एक विहीर पण होती. जवळ जवळ 3 मंजले होते वाड्याला. पण तिसरा मजला बंद केलेला होता.

"सामंत जी, हा तिसरा मजला बंद का बरं?"

"युवराज काय आहे ना हा वाडा कित्येक वर्षांपासून बंद आहे, फक्त वाड्याचा तळमजला आम्ही राजकीय कामकाजासाठी वापरतो, दुसरा मजला उघडला तेव्हाच त्याला साफ करताना दमछाक झाली, आणि  आपण दोघेच आले आहात म्हणून मग मी दोन मजले तयार केलेत. तसही तिसऱ्या मजल्यावरती खास काही नसावं, कारण तो मजला राजकुटुंब वैयक्तिक कारणांसाठी वापरायचे, तिथे काही कक्ष आणि दोन दालन आहेत, पण जर का आपण म्हणत

असाल तर मी 2 दिवसात तो मजला सुद्धा साफ करायला लावतो"

"नको जाऊद्या त्याची काही गरज नाही, आपण बरोबर बोलत आहात, आम्हा 10-15 जणांसाठी एव्हढं पुरेसं होईल. आणि तसही तळमजल्यावर सभागृह आहेच, तिथेच आपल्या बैठक होतील, म्हणून तिसरा मजला तात्पुरता बंद असला तरी विशेष फरक नाही पडणार"

"जशी तुमची आज्ञा, आणि हो कसलीही गरज लागल्यास कुठल्याही सेवका तर्फे मला संदेश द्या, मी लगेच येईल, सध्या इथे सर्वच सुविधांचा प्रतिबंध केला आहे.

तर मी आता परवानगी घेतो, आज तुम्ही दमला असाल तर विश्रांती घ्या, आपण उद्यापासून गहन विषयांवर चर्चा करूयात"

आणि एव्हढं बोलून समन्त निघुन गेले,

बघता बघता दिवस निघून गेला, रात्रीच जेवण उरकल्यावर सती आणि श्रवण दुसऱ्या मजल्यावर गेले, त्या मजल्यावर एक मोठा सज्जा होता, त्या सज्जवरून जवळ जवळ पूर्णच मलुक नजरेत पडत होतं.

"युवराज, किती सुंदर आहे ना हे शहर, बघा आपल्या बरोबर पाठीमागे एक सह्याद्रीच शिखर भिंत बनून उभं आहे, त्याच शिखरावरून दोन नद्या वाहतात, श्रावणी आणि स्निग्धा, दोन्ही नद्यांनी मिळून मलुक ची सीमा बनवलीये, आणि याच नद्यांचा आजूबाजूला वस्ती बनलेली आहे, उत्तुंग अशा इमारती आहेत इथे, इतक्या उंच तर प्रतिष्ठान मधे पण बघायला मिळत नाहीत, त्यांच्याच बाजूला काही छोटी घर पण आहेत ज्यांची धाटणी पण एकदम वेगळीच, हिरवळ म्हणावं तर असं वाटत पूर्ण मलुक ने एक हिरवा शालू अंगावर ओढला असं वाटत, खरंच एका काळात याने भरभराटिच शिखर गाठलं असणार ना! !"

"हो ते तर आहेच सती, जेव्हा हे शहर त्याच्या संपन्नतेवर असेल तेव्हा तर इंद्राची अमरावती सुद्धा यापुढे कमी पडत असणार"

"पण एक सांगू, इतक्या सुंदर शहरात ते एकटच मंदिर वेगळं का दिसत आहे हेच कळत नाहीये मला, मी बराच वेळेपासून त्या मंदिराकडे बघत आहे, खूप सुंदर आहे ते, बाजूने नदी वाहते, वर सोन्याचा कळस, पण काय माहिती पण एक वेगळीच भावना मनात येते तिकडे बगीतल्यावर, "

"म्हणजे?"

"म्हणजे का कुणास ठाऊक पण एक विक्षिप्त पण जाणवतो त्याकडे बघितल्यावर"

"त्याच मंदिरासाठी तर आपण इथवर आलोय"

"त्या मंदिरासाठी, म्हणजे मला कळलं नाही"

"सती आपलं इथे येण्यामागच प्रयोजन काय वाटत तुला?"

"हेच ना कि मलुक ची तुटलेली घडी पुन्हा बसवायची आहे, पुन्हा त्याचं व्यापारी महत्व त्याला प्राप्त करून द्यायचं"

"हो ते तर आहेच पण त्याहूनही अजून एका महत्त्वाच्या कामासाठी आपण इथे आलो आहोत, "

"आणि ते कोणतं?"

"या मंदिराबद्दलच आहे ते, सती जरी हे मंदिर इतर कोणत्याही मंदिरासारखं वाटत असलं ना तरी यात खूप गूढ लपलेले आहेत"

"मला सविस्तर सांगाल का?"

"हो, ते तर संगावच लागेल, खरं तर तुला आपण निघायच्या आधीच सगळं स्पष्ट सांगायला हवं होतं, पण याची वाच्यता कुठे होऊ नये, त्या बद्दल चुकीची माहिती पसरू नये म्हणून मी आतापर्यंत तुला सांगितलं नाही, पण आता मला वाटत मी तुला सगळं स्पष्ट सांगितलंच पाहिजेल"

आणि श्रवण ने हळूहळू ऐकलेलं सगळं काही सती ला सविस्तर सांगितलं, कशाप्रकारे मलुक चा ऱ्हास झाला, राणीने कशाप्रकारे स्वतःच बलिदान देऊन या शहराची रक्षा

केली, आणि आता त्या मंदिरातील रहस्यमयी पुतळा तुटला आहे... हे सगळं सांगत असताना सती काळजीपूर्वक ऐकत होती, सती च्या चेहऱ्यावरचे भाव पूर्णतः बदलून गेले, साधारण दोन तास लागले श्रवण ला संपूर्ण माहिती सांगायला

, " तर सती हि होती मलुक ची आणि त्या मंदिराची सविस्तर माहिती, तुला आठवत आपल्या लग्नाच्या दिवशीच मी एका गुप्त बैठकीत गेलो होतो, त्या बैठकीत असही कळालं होतं की हा पुतळा तुटल्यानंतर लहानग्या मुलींचे मृत्यू सुद्धा झाले आहेत, आज सकाळी आपल्याला गर्दीत जी महिला दिसली होती आक्रोश करताना कदाचित तिच्या मुलींसोबत पण काहीतरी अघटित घडलं असणार, नेमका याच गोष्टीचा छडा लावायचा आहे आणि त्यावर उपाय सुद्धा आपल्याला काढायचा आहे"

"याचा अर्थ आपल्याला लवकरात लवकर कार्यास सुरुवात केली पाहिजे, अजून मृत्यू होण्याआधी या गोष्टीची ईतयंभूत माहिती मिळालीच पाहिजे आपल्याला, पण युवराज तुम्ही जी कथा मला सांगितली त्यावरून मला काही प्रश्न पडले आहेत, जर का हा पुतळा पृथ्वीवरच्या कोणत्याच भौतिक वस्तूने तुटत नसेल तर मग तो तुटलाच कसा? याचा अर्थ हा पुतळा तोडणारा कुणी सामान्य व्यक्ती नाहीये. कदाचित त्या व्यक्ती मध्ये एक वेगळं सामर्थ्य आहे आणि त्याला याबद्दल पूर्णतः सखोल माहिती असणार, पण प्रश्न हा सुद्धा आहे की त्याने हा पुतळा या आधी का नाही तोडला? तोच दिवस निवडला यामागे सुद्धा कारण असेलच.... "

"बरोबर आहे सती तुझं, पण आपल्याला आधी हे तरी पडताळाव लागेल की या गोष्टींचा संबंध खरंच त्या पुतळ्याशी आहे का, कारण आपल्याकडे फक्त दन्तकथा आहेत ज्या खऱ्या वाटण्यापेक्षा कल्पनिकच जास्त भासतात. "

"मला वाटत आपण उद्या सकाळीच त्या मंदिरात गेलंच पाहिजेल. "

"हो, नक्कीच त्या सोबत स्थानिक लोकांची भेट पण घेऊ, जेणेकरून त्यांना एक सहानुभूती मिळेल आणि काही पुरावे मिळतील का ते पण बघता येईल आपल्याला"

"हो युवराज, हे बरोबर आहे, मला सुद्धा हेच वाटत"

..... .....

दुसऱ्या दिवसाची पहाट झाली होती, बाहेर किर्रर्र अंधार होता, कदाचित आज आभाळ खूप असल्याने तस असणार, सतीला हलकीशी जाग आली होती... वाड्याच्या मागे बरीच झाडी होती आणि त्यानंतर लगेचच डोंगर सुरु

होत होता त्यामुळे गारवा फार होता... तिने बाजूला बघितलं तर श्रवण तिथे नव्हता. कदाचित आज तिच्या आधीच तो उठला असणार, आळस देत तिने केस बांधले आणि उठली, अजूनही डोक्यात त्या मंदिराचे विचारच घोळत होते, बाहेर आल्यावर वाड्याची साफसफाई चालू होती, 'कमल' म्हणजेच सतीची खास दासी त्याकडे लक्ष देत होती.

"कमल आज इतक्या लवकर"

"हो, युवराज बोलले लवकर आवरायला, ते मंदिरात जाण्या विषयी काहीतरी बोलले होते"

"आता कुठे आहेत युवराज?"

"बाहेर असतील"

सती ने हलकेच बाहेर बघितलं, श्रवण सेनापती सोबत काहीतरी चर्चा करत होता,

"अजून सूर्यदेव सुद्धा जागे नाही झाले आणि इथं पूर्ण वाडा जागा झालाय, व्वा!!आता मलाही आवरायला लागणार"

"सेनापती आज मी आणि सती त्या मंदिरात जाण्याचा विचार करतोय"

"युवराज्ञी ला घेऊन?"

"हो, त्यात काही धोका आहे का?"

"नाही, तसा धोका तर नाही राहणार. ठीक आहे मी केशव ला सांगतो, आपण एक घटिका नंतर जाऊयात"

"आणि अजून एक, मला वाटत आपण आजच शोध सुरु करावा, काही माहिती कुठून भेटते का हे बघुयात".

"ठीक आहे, तुम्ही म्हणता तस, आपण आज गावातच काही माहिती मिळते का ते बघुयात, "

झालं तर मग ठरल्यानुसार श्रवण तयार झाला. कोवळी कोवळी सूर्यकिरणे आता कुठे ढगाच्या आडून पृथ्वीवर येत होती, तेव्हढ्यात सती सुद्धा तयार झाली, ती मुळातच इतकी सुंदर होती ना त्यात तिने शृंगार केलेला म्हणून आता तर अप्रतिमच दिसू लागली. सोबत सेनापती, कमल, सामंत, आणि एक दोन सेवक घेऊन ते मंदिराकडे कूच करू लागले,

श्रवण दुरूनच मंदिराला न्याहाळत होता. मंदिराच्या बाजूने वाहणाऱ्या नदीला एव्हढा कडक उन्हाळा झाला असून सुद्धा बऱ्यापैकी खळाळत पाणी होतं... मंदिराची रचना सुद्धा अशाप्रकारे केली गेलेली कि ते नेमकं नदी ज्या ठिकाणी अर्धाकार वळण घेत नेमकं तिथेच ते होतं त्यामुळे मंदिरात जमिनीवरून जाण्यासाठी एकच मार्ग होता, आणि नदीचं पात्र आणि उतार बघता पावसाळ्यात तर तिला पार करणं म्हणजे महाकठीण.

"सामंत, मंदिराची ठेवण बघता ते फारच सुरक्षित आहे, त्यामागे काही कारण असाव का!!"

"त्याबद्दल सांगायचं झालं ना तर युवराज हे मंदिर म्हणजे एकप्रकारे राज मंदिर, मारुत राजांनीच स्वतः हे बांधलेलं, तिथेच ते महादेवाची आराधना करत, असं म्हणतात की ते अनेक शक्तींसाठी कित्येक दिवस याच मंदिरात राहायचे आणि त्यांच्या उपस्थितीत मंदिराची पायरी सुद्धा कुणाला ओलांडायची परवानगी नसत. म्हणून त्यांच्या सुरक्षिततेसाठी हे मंदिर अशा प्रकारे बांधल गेलं होतं. आधी तर नदीच्या पलीकडे कुणाला रहाण्याची परवानगीही नव्हती, पण आता तुम्ही काही आदिवासी जमातींची विरळ वसाहत बघू शकता"

'अशा कोणत्या शक्तींची आस होती त्यांना??"

"क्षमा असावी पण हे सध्या तरी मला माहित नाही, पण त्यांनी त्या काळात बराच प्रदेश जिंकला होता, त्या संबंधीतच काही असावं ते"

"अजून एक प्रश्न आहे, आता इथे पूजा किंवा आरती नेमकी कुणाची होते??"

"कुणाचीच नाही, या मंदिराला सगळेच विटाळलेलं समजता, पूजा तर सोडा या मंदिरात येन सुद्धा अशुभ मानतात, एव्हढंच काय गावातल्या स्त्रियांसाठी तर अलिखित बंदीच आहे इथे येण्यासाठी"

"अरेरे, एव्हढं भव्य मंदिर ओसाड पडलं म्हणायचं तर?!!"

"नाही तस नाहीये, इथे सुद्धा एक पुजारी आहेत जे याची निगा राखतात, रोज साफ करून उमा राणीच्या पुतळ्याचा अभिषेक केला जातो"

"म्हणजे मंदिराला पुजारी आहेत तर आणि त्यात हे मंदिर नदी पेक्षा थोडसच उंच आहे, शहरातल्या मुख्य ठिकाणांहून आरामात दिसेल, मग असं असतानाही तो पुतळा वितम्बित करे पर्यंत कुणालाच का कळालं नाही"

"त्याचं काय आहे ना युवराज, हि सगळी क्रिया रात्री घडली, सकाळी मुख्य पुजारींचा मृतदेह आम्हाला तिथे सापडला, पुतळा तोडणाऱ्यानेच आमच्या गोविंद पंतांचा वध केला, कदाचित त्या रात्री त्यांनी याला विरोध केला असणार, आता गोविंद पंतानंतर त्यांचेच दूरचे भाऊ सध्या या मंदिराची निगा राखत आहेत"

"पुजारी बुवा तिथेच राहायचे का?"

"नाही, त्यांचं वास्तव्य गावात होतं, पण त्या रात्री ते मंदिरात का आले हे मात्र माहित नाही"

"सामंत, याचा अर्थ त्यांना पूर्वकल्पना तर नव्हती ना कि कुणीतरी त्यादिवशी असं काहीतरी करणार आहे ते"

"अरे हो, याचा विचार आलाच नाही, कदाचित त्यांना भनक लागली असावी पण मग त्यांनी लागलीच येऊन मला का नाही सांगितलं!"

"सामंत जी गूढ आहे, हे मंदिर आणि हे जे काही चाललंय ते"

"हो ना याच गोष्टीने माझीपन झोप उडवली आहे, पण तो विषय आपण नंतर घेऊयात, चला आता बोलणं थांबवू आपलं गूढ मंदिर पण जवळ आलंय, ज्यासाठी आलोय ते काम आधी करूयात"

आता समोर ते मंदिर उभं होतं, अद्भुत होते ते, भव्य, हेमाडपंथी आणि त्या काळातील कलेची आणि

सम्पन्नतेची साक्ष देत सर्वांना खुणावत होतं. सती आणि श्रवण हळूहळू एकेक पायरी चढत होते, एक वेगळाच सुवास दरवळत होता

"सामंत जी हा सुवास दरवळतो आहे तो आज कशासाठी?काही विशेष आहे का?"

तेव्हढ्यात सेनापती बोलले

"नाही युवराज, हि या मंदिराची विशेष प्रथा, याला नेहमीच सुवासिक फुलांनी अत्तराने सजवलं जात, असं म्हणतात की आतमधे जो 'कामक' आहे त्याला इथेच रोखून धरण्यासाठी सुरु झालेली ही प्रथा"

"पण कामक तर कैद आहे ना, मग अजून काय रोखायच त्याला", सती पहिल्यांदाच काही बोलली.

"हो युवराज्ञी, पण एक सुरक्षितता म्हणून हा उपाय केला जातो"

हळूहळू एकेक पायरी चढली जात होती, आणि आता मुख्य द्वार आलं,

"सुंदर, किती मनमोहक चित्र रेखाटलं आहे या स्त्रियांचं इथे"

"युवराज हे काहीच नाही तुम्ही मंदिर आतून बघा, अचम्बित व्हाल"

आणि त्यांनी म्हंटल्या नुसारच ते आतून सुद्धा खूप सुंदर होतं, अनेक रमणीय चित्र रेखाटली होती, हरीण, ससे, हत्ती यांचे चित्र होते, त्याचसोबत अनेक स्त्रियांचे मादक चित्र सुद्धा काढले होते. हे सगळं हळूहळू बघत असताना श्रवनच्या नजरेत आला त्या ठिकाणची सर्वात सुंदर कलाकृती म्हणजेच तो पुतळा. भलेही तो मानेपर्यंत

झाकलेला होता तरीपण त्याचा मुखडाच इतर सर्व कालाकृतींवर भारी पडत होता.

"सामंत हाच का तो पुतळा ?"

"हो, हाच तो उमा राणीचा पुतळा, "

त्यावेळी सेनापतीनी बाकीच्यांना बाहेर जाण्याची आज्ञा दिली. आता फक्त तिथे श्रवण, सती, सेनापती, सामंत केशव आणि मंदिराचे नवे पुजारी जे कि गाभऱ्या जवळ उभे होते एव्हढेच जण होते. सामंत यांनी पुजाऱ्यांकडे एक खूण केली, ते हळूच पुढे आले आणि श्रवण कडे रोख करत बोलले

"राजकुमार मी हे वस्त्र आता हटवणार आहे पण तुम्हा सगळ्यनची मानसिक तयारी तर आहे ना?"

"मानसिक तयारी का?"

"कारण तुम्ही आता जे बघणार आहेत याचा तुम्ही काय कुणीच विचार केलेला नाहीये"

"असं काय आहे तिथे"

"तुम्ही स्वतःच्या नजरेनेच बघा"

आणि असं म्हणून त्यांनी त्या पुतल्यावरच वस्त्र झटकन बाजूला सारल, आणि समोर जे दिसत होतं त्याने सगळ्यांचं हृदय पिळवटून निघालंकुणाचाच स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता,

, "अरेरे, देवा काय आहे हे", सेनापती उद्गारले.

"हे कसं शक्य आहे, हा तर फक्त पुतळा आहे ना, माझा डोळ्यांवर विश्वास बसत नाहीये", श्रवण हळहळला.

समोर उमा राणीचा पूर्णतः नग्न पुतळा होता आणि त्यावर छातीपासून पोटापर्यंत एक जखम होती, अगदी मानवी शरीरावर तलवारीने वार केल्यावर जशी जखम होते ना अगदी तशीच. त्यात थिजलेलं रक्त सुद्धा दिसत होतं, असं वाटत होतं जणू एखाद्या मानवी शरीरावर कुणीतरी तलवारीने वार केला आहे. वरून पुतळ्याचा पायाजवळ काही रक्ताचे थिजलेलं थेंब सुद्धा दिसत होते,

तेव्हढ्यात सामंत बोलले, "हो युवराज आम्हाला सुद्धा आधी हा फक्त पुतळा वाटायचा, आणि या सर्व दन्तकथा, पण हे बघून खरंच विश्वास बसलाय की हे काही

साधसुध  नाहीये, ते खरंच उमा रानीच शरीर आहे त्याचं रूपांतर एक कठीण खडकात झालेलं आहे"

"सामंत जी मग तुम्ही आधी हे सर्व सविस्तर का नाही सांगितलं?"

"कस सांगणार युवराज, हे असं जर का चुकून सुद्धा पसरलं असतं तर लोक मलुक सोडून कधीच परागंदा झाले असते"

"तुमचाही बरोबर आहे, सेनापतिजी आपल्याला लवकरात लवकर पाऊलं उचलावी लागतील, याची लवकरात लवकर माहिती जिथुन कुठून भेटेल त्याचा शोध घेतलाच पाहिजे"

तेव्हढ्यात त्यांचं वाक्य तोडत पुजारी बोलले,

"तुम्हाला अजून एक गोष्ट दाखवायची राहिली आहे, माफ करा तुमच्या बोलण्यात अडथळा आणत आहे, मी पंत शशिकांत, या मंदिराचा सध्याचा पुजारी, पुजारी म्हणणं चुकीचं राहील कारण या मंदिराय महादेवाची कसलीही पूजा होत नाही पण मला तुम्ही इथलचा निरीक्षक म्हणू शकतात, या मंदिराची मीच निगा राखतो, या आधी माझे थोरले बंधू हे काम करायचे पण त्यांच्या दुर्दैवी मृत्यू नंतर मलाच हे बघावं लागत"

सर्वजण त्यांच्याकडेच बघत राहिले, पंत म्हणजे एकदमच 6 फूट, भरदार शरीर, पांढऱ्या पण रुबाबदार दाढी मिश्या, चेहऱ्यावर तेज, डोळ्यात भरून दिसाव असं व्यक्तिमत्व,

"युवराज तुम्ही एकदा समोर येऊन या गाभाऱ्याकडे लक्ष द्या"

तस म्हणताच श्रवण पुढे आला, गाभाऱ्याचा दरवाजा बंद होता, त्याने दरवाज्याच नीट निरीक्षण केलं, आणि त्याची हळुवार नजर दरवाज्याच्या कडी कडे गेली,

"पंत, हे काय, हि कडी अशी का दिसत आहे?"

"बरोबर ओळखलं युवराज, हि कडी तुम्ही बघू शकतात कि पूर्णतः काली पडली आहे, याचा अर्थ कळला का!!! याचा अर्थ असा की या गाभाऱ्यात जी काही शक्ती कैद होती तिची सुटका झाली आहे, प्रचंड शक्ती एकदम थोड्या वेळात पार झाल्याने त्या कडीचा रंग त्या प्रचंड ऊर्जेमुळे असा कला ठिक्कर पडलाय"

"याचा अर्थ रमण सुटलाय?"

"हो युवराज, हेच खरं आहे, कदाचित तो आपल्या आसपास सुद्धा असावा, त्या ताम्रपटनुसार रमण ची सुटका झाली याचा अर्थ सर्व स्त्रियांचे प्राण गेले पाहिजेल, पण सध्या तरी तुरळक घटना घडत आहेत आणि ते सुद्धा अगदीच नवजात मुलींसोबत, कदाचित तो सध्या फार अशक्त असावा

पण हो त्याला त्याच्या सर्वच शक्ती पुन्हा प्राप्त करायला वेळ लागणार नाही युवराज, आता मलुक च भविष्य तुमच्यावर अवलंबुन आहे, तो पूर्णतः शक्तिवान होण्याआधी त्याला कैद करणं फार गरजेच आहे. कदाचित वेळ आपल्याकडे जास्त नाहीये,

पण हो तुमच्यात आणि सती मधे ती शक्ती आहे, तुम्हीच मलुक ला रमण च्या प्रकोपा पासून वाचवू शकतात,

मी तुम्हाला मदत करायला सदैव  तत्पर असेल, महादेवाची कृपा पण तुमच्यावर आहेच, फक्त तुंम्ही हिम्मत ठेवा, बुद्धीने काम घ्या, विजय तुमचाच होईल

...............

पंत, जर का तुमच्या म्हणण्यानुसार रमण खरंच कैदेतून सुटला असेल तर त्याला थांबवणार ते कसं?,

"युवराज, त्याबद्दल काही स्पष्टीकरण देण्यासाठी मी फारच अज्ञानी आहे, या गोष्टीच उत्तर फक्त आमचे मोठे बंधू गोविंद पंतांकडेच होतं. आणि दुर्दैवाने ते आता हयात नाही. "

"फक्त गोविंद पंतांकडे म्हणजे?"

"म्हणजे सध्याच्या पिढीमध्ये मलुक मधील तरी ते शेवटचे होते ज्यांना या सर्व संदर्भाची सर्व माहिती होती. खरं तर आमचं कुळ म्हणजे आम्ही जीवक ऋषींचे अग्रज आहोत.

तेच जीवक ऋषी ज्यांनी रमण ला कैद करण्यात उमा राणींना साथ दिली होती. उमा राणींना लाभलेला वर, त्याच्या मर्यादा आणि रमण याविषयी ची सर्वच माहिती फक्त त्यांना होती. पण हो हि माहिती फारच महत्वाची असल्याने ती इतर कुणाला सांगणं चुकीचं होतं... पण ती दुसऱ्या पिढीला कळणं सुद्धा तितकंच महत्वाचं होतं.

मग एक प्रथाच सुरु झाली, हि सर्वच माहिती पुढच्या पिढीतील फक्त एकाच योग्य अग्रजाला सांगितली जायची, लक्षात ठेवा एका पिढीत फक्त एकालाच. अशाप्रकारे ते सर्व ज्ञान गुपितही राहीलं आणि हस्तांतरित सुद्धा झालं. आमच्या पिढीतील सर्वात योग्य व्यक्ती म्हणजे गोविंद पंत, त्यांना आमच्या पितांनी सर्व माहिती हस्तांतरित केली, पण त्यानंतर मात्र एक समस्या बनली, पंतांनी विवाह केलाच नाही त्यामुळे

पुढची पिढीच नव्हती ज्याकडे ते हि सर्व माहिती देऊ शकेल. म्हणून ते सर्व गुपित त्यांच्यासोबतच निघून गेलं"

"अरेरे, म्हणजे आता रमण ला कैद करण्याचा आपल्याकडे मार्ग नाहीच तर!!!"

"असं म्हणणं चुकीचं ठरेल, आमचे मोठे बंधू फार हुशार होते, त्यांनाही या परिस्थितीची जाणीव असणार, त्यांनी कुठे ना कुठे याचे पुरावे नक्कीच सोडले असावे, आणि मला वाटत की ते पुरावे नक्कीच त्या आदिवासींच्या पर्वतात कुठेतरी असणार"

"आदिवासणीचे पर्वत, म्हणजे मला कळलं नाहीये!!"

तितक्यात सामंत बोलले, "युवराज, तुम्हाला येण्याआधी मी काही पर्वत्ररांगा दाखवल्या होत्या आठवतंय, तिथेच आदिवासी राहतात... जेव्हा पंत हयातीत होते तेव्हा ते वर्षातील नऊ महिने मलुक मध्ये असायचे तर उरलेले तीन महिने ते त्या पर्वतात राहायचे, कुठली तरी साधना ते करत असावेत असा आमचा कयास आहे. "

"मला वाटत कि आपण ज्याने हा पुतळा तोडला त्या गुन्हेगारालाच शोधण्याचा प्रयत्न केला तर?आपल्याला नेमकं काय चालू आहे ते हि कळेल आणि येणारी आपत्ती पण दूर करता येईल"

"त्याचा शोध घेण चालूच आहे युवराज्ञी, पण ज्याने हे काम केलंय तो कुणी सामान्य व्यक्ती असावा असं वाटत नाही, कुठलाही पुरावा मागे त्याने सोडला नाहीये त्यामुळे

शोध घेणं फारच कठीण झालंय, तरीपण आम्ही पूर्ण कष्ट करत आहोत आणि लवकरच त्याचा शोध घेऊ"

"मला वाटत कोणत्याही राजाने शत्रूचा विनाश करण्याआधी प्रजेच्या रक्षणाची सोय लावली पाहिजेल, आणि सध्या प्रजेचा सर्वात मोठा शत्रू म्हणजे रमण, आणि त्याला जर का पुन्हा कैद करायचं असेल तर त्याची शेवटची आस म्हणजे त्या आदिवासी जमाती", पंत नकळत बोलून गेले.

आतापर्यंत शांत असणारे सेनापती बोलले,

"युवराज मग उशीर कशाचा, लगेच जाऊयात आणि सूर्यास्ताच्या आधी परत येऊ"

"नाही सेनापती, त्यांच्याजवळ जाणं एव्हढं सोपं नाहीये, त्या आदिवासींना आपल्यावर थोडाही विश्वास

नाहीये, या गावातल्या कुणालाही तिथे प्रवेश नसतो फक्त जुने पुजारी सोडले तर,

आदिवासींना सुद्धा आम्ही मलुक मधे प्रवेश देत नाही,

आणि जर का आपण तिथे घुसण्यासाठी बळाचा वापर केलाच तर सहजरित्या काही हाती येईल याची शक्यता कमीच", सामंत यांनी आपला पक्ष मांडला

"सामंत पण इतका संघर्ष का?, त्या तर फक्त जमाती आहेत ना?"

" ते इतर आदिवासींसारखे नाहीयेत, प्रथम जेव्हा ते इथे आले होते तेव्हा त्यांची राहण्याची पद्धत आपल्यासारखीच होती आणि त्यांनी आल्याल्याच मलुक वर हक्क सांगितलं, काही लढाया सुद्धा झाल्या, पण मलुक समोर त्यांचा टिकाव लागला नाही, ते हरले, खरं तर त्यांचा

तेव्हाच सम्पूर्ण विनाश करायला पाहिजे होते पण या आधीच्या त्यांच्याशी एक तह केला आणि त्यांना त्या डोंगत रंगात राहण्याची परवानगी दिली, त्याचा फायदा ही झाला की हिंसर् श्वापद जे त्या वनातून इथं यायचे त्यांचा त्रास कमी झाला... हो पण या निर्णयामुळे या गावातून त्या पर्वतात जाणं कठीण होऊन बसलंय"

"चला म्हणजे आमच्या मलुक ला येण्याच्या प्रयोजनात अजून एक कार्य जुडलं तर, प्रश्न असा आहे की कार्य तर फार आहे पण वेळ खूप कमी"

"श्रवण!!", सती काहीतरी बोलणार होती,

"हा बोला सती"

"मला वाटत तुम्ही आणि सेनापती यानी बाहेरच्या मोहिमा कराव्यात, मी आणि सामंत काका शहरातल काम पार पाडतो, जेणेकरून या बाबतीत तुम्हाला सर्व माहिती

बाहेरून मिळेल तर आम्हाला गावातून .... आपण कितीही नाही म्हंटलं तरी या गावात कुठे ना कुठे या प्रसंगच्या पाऊलखुणा असतीलच, आणि तसही माझं या गावात येण्याचं मुख्य कारण हेच आहे ना कि इथलच्या स्थानिक समस्या सोडवणे, शांतता प्रस्थापित करणे, त्याच निमित्ताने हे काम सुद्धा होईल"

"युवराज त्यांचं म्हणणं पटतंय मला, यामुळे वेळेची बचत तर होईलच पण राजघराण्याची प्रसिद्धी पण वाढेल"

. "ठीक आहे सती, ठरलं तर मग, अशाच पद्धतीने आपण काम करूयात. सेनापतीजी मला वाटत आपण सध्याच्या अवस्थेबद्दल प्रतिष्ठान ला कळवलं पाहिजेल. "

"नाही युवराज, आताच नको, आपल्या हाती जेव्हा अजूनही स्पष्ट असे पुरावे येतील तेव्हाच त्यांना कळवण बरं होईल, "

"पण एव्हढ्या सगळ्या गोष्टी मलुक मध्ये घडत आहेत आणि त्या बाबांना न कळाव्या !!!"

"सध्या तुम्हीच मलुकचे कर्ता धरता आहेत असं समझा, हवं तर एखादी कल्पना तुम्ही त्यांना द्या, पण इतक्यात सगळंच त्यांना सांगणं बरं नव्हे"

"तुमचही बरोबर आहे, असो, मला वाटत आता इथून निघावं आणि पुढच्या चर्चेसाठी आपण वाड्यातच जमाव, पंत तुम्ही पण रात्रीच्या जेवणासाठी वाड्यातच या, आपण सगळे मिळून लवकरात लवकर याचा तोडगा कसा काढता येईल याचा विचार करूयात"

"ठीक आहे युवराज, माझ्याकडून जेव्हढी काही मदत होईल तेव्हढी करण्याचा माझा प्रयत्न असेल"

"सामंत आज दुपारी अजून एक कार्य करण्याचा विचार आहे"

"तो कोणता?"

"ज्या मुलींचे मृत्यू झाले आहेत त्यांच्या घरच्याना वाड्यावर बोलावून घ्या, नेमकं काय झालं हे तरी कळेल"

"जशी आपली आज्ञा, आज दुपारच्या भोजना नंतर त्या कुटुंबांना वाड्यावर बोलावलं जाईल"

................

(मलुक मधे दोन नद्या आहेत, त्यातील एक म्हणजे श्रावणी आणि दुसरी स्निग्धा, श्रावणी च प्रवाह काहीसा उंचावरून होता, आणि जवळ जवळ सर्वच मंदिर श्रावणी

नदीच्या काठावर होते. म्हणून ही नदी पवित्र समजली जात होती, त्यामुळे शहरातील सम्पन्न, श्रीमंत भाग याठिकाणी होता, या उलट स्निग्धा हि नदी कनिष्ठ मानली जायची, गावातील सर्वच पाण्याचा निचरा या नदीत होत असे, म्हणून सर्वच कष्टकरी, गरीब  वर्ग या नदीच्या किनारी वास्तव्य करत होता. )

वाड्याच्या सभागृहात श्रवण, सेनापती, सामंत, सती, आणि काही सैनिक होते आणि समोर एक स्त्री आक्रोश करत होती.

"नेमकं काय झालं होतं?, तुझी लहान मुलगी कशी दगावली", रडणाऱ्या गोमतील शांत करत सती विचारत होती.

, गोमती म्हणजे स्निग्धा नदीजवळ वास्तव्य करणारी, तीन मुलं आणि चार मुलींची आई,

"पोरांना घरी सोडून मी हिला एकटीला पाठीवर बांधून शेतात जायचे. पण त्या दिवशी हिला घरीच राहू दिल, कामावरून आले तर हिला ज्वर चढला होता, अग्नीचा गोळा हातात घ्यावा असे तिला हातात घेतल्यावर वाटत होतं, लगेचच हिला घेऊन मी वैद्यांकडे गेले, त्यांनी फार उपाय केले, पण ज्वर उतरलाच नाही, दुधासारखी गोरीगोमटी माझी मुलगी हळूहळू हिरवीगर पडली आणि मध्यरात्री तिने प्राण सोडले. "

एव्हढं बोलून ती पुन्हा रडायला लागली. सती तिला सावरायचा प्रयत्न करत होती पण ती आई कोणत्या दुःखातून जाते हे कुणीच समजू शकत नव्हतं. त्यात स्वतःच मूल स्वतःच्या डोळ्यासमोर गमावणे म्हणजे फारच हृदय पिळवटून टाकणारी गोष्ट.

फक्त गोमतीच नव्हती जीला यातून जावं लागलं होतं. वत्सला, अन्नपूर्णा, मिथिला, वर्षा, यामिनी, गंगा या सर्व स्त्रियांची हिच कहाणी होती. पण त्यांच्यात एक साम्य होतं, वत्सला सोडली तर सगळ्याच स्त्रिया त्या कामकरी वस्तीतल्या होत्या. फक्त वत्सला हि श्रावणी नदीच्या काठी उच्च वसाहतीत रहात होती.

श्रवण ने सामंत याना जवळ बोलावलं आणि विचारलं,

"तुम्हाला वाटत नाही का कि यात काही गडबड आहे, बघा ना सगळ्या एकाच वस्तीत राहणाऱ्या आहेत. कदाचित स्निग्धा नदीच्या पाण्याचा तर काही प्रभाव नाही ना"

"नाही युवराज, आम्ही या स्थितीची तेव्हाच सखोल चौकशी केली होती, जर का पाण्यात खोट असती तर

इतरांना सुद्धा तसाच त्रास झाला पाहिजे होता पण तसं नाहीये... आम्ही यासाठी वैद्यांची भेट घेतली होती, त्यांनीच आम्हाला हे जे काही चालू आहे त्याची कल्पना दिली ... आणि का चालू आहे हे पण सांगितलं होतं"

"मग काय सांगितलं त्यांनी?"

"मी हे तुम्हाला संगीतल्यापेक्षा तुम्ही त्याच्याशीच वार्ता का नाही करत?, ते सुद्धा आज इथे आले आहेत, आपली आज्ञा असेल तर त्यांना बोलावू का?"

"ठीक आहे, पण त्या आधी या कुटुंबांना त्यांच्या घरी पाठवल पाहिजे"

"जशी आपली इच्छा"

त्यानंतर त्या सर्व कुटुंबांच आदरातिथ्य करून त्यांना घरी पाठवले गेले.

"सामंत जी, बोलवा वैद्यांना, आताच त्यांच्याशी बोललं पाहिजे"

सामंत यांनी सैनिकाला सांगून वैद्यांना सभागृहात बोलवायला सांगितलं. वैद्यांच नाव ऐकून एक म्हतारा व्यक्ती, अनुभवाने स्थिर व्यक्तिमत्व असं चित्र श्रवण च्या मनात तरळलं. पण प्रत्यक्ष बघतो तर वेगळंच. वैद्यांच नाव घेताच एक स्त्री आतमधे आली, साधारण वयाची तिशीच गाठली असणार तिने, रंगाने जराशी सावळी, केसांचा बुचडा बंधलेला, हाताला वेगवेगळ्या प्रकारच्या माळी बांधलेल्या, कपाळाला पांढरा भसम् लावलेला, चेहऱ्यावर वेगळंच तेज, डोळ्यांत करारीपणा.

"प्रणाम असो युवराजाना, इतक्या तातडीने इथे बोलावलं म्हणजे नक्कीच काहीतरी गहन बाब असणार, ", तिने तिच्या एकाच वाक्यात आणि तिच्या अस्मानी आवाजाने त्या सभागृहात कधी वर्चस्व मिळवलं कळलंच नाही.

"आपला परिचय कळेल का?"

"माझा परिचय, म्हणजे सामंतानी पूर्ण ओळख करून नाही दिली वाटत, असो माझं नाव रजनी, मलुक चे प्रसिद्ध वैद्य, ज्यांची तिन्ही लोकांत ख्याती होती असे आयुर्वेदाचार्य धवल ऋषींची प्रथम आणि एकमेव कन्या, त्यांच्याच पाऊलखुणा जपत मी सुद्धा वैद्य बनले"

"तुमचं वय बघता फारच कमी वेळेत तुम्ही आयुर्वेदाचार्य बनला असं नाही का वाटत...!!"

"आयुर्वेद निरीक्षणातून शिकायचा असतो युवराज, जेव्हापासून बोलायला लागले तेव्हापासून मी रुग्णांच निरीक्षण करतेय, असो वेळ न दवडता माझं येण्याचं कारण मला कळू द्या"

"काहीच दिवसांपूर्वी झालेल्या लहान मुलींच्या मृत्यू बद्दल बोलायचं आहे, म्हणजे नेमकं असं काय झालं होतं त्यांना?"

"त्यांना काही झालं नव्हतं, ते केलं गेलं होतं"

"म्हणजे?"

"आयुर्वेद हे जरी सर्व नैसर्गिक घटकांवर अवलंबुन असलं ना तरी त्यात अनैसर्गिक घटकांचा सुद्धा तितकाच संदर्भ आहे जो मानवी बुद्धीला पटतच नाही"

"रजनी तुम्ही स्पष्ट शब्दात सांगितलं तर कळेल मला"

"स्पष्ट शब्दात सांगायच तर ते जे झालं होतं ते खूपच अमानवीय होतं, आयुर्वेदाच्या पलीकडे, मी आतापर्यंत असा ज्वर कधीच नव्हता बघितला, त्या रात्री मी जेव्हढे शक्य होईल ते सर्व प्रयत्न केले, जीव वाचवणं तर दूरच पण ज्वर थोडासुद्धा उतरला नाही, सुरुवातीला तिचा रंग हळूहळू हिरवा पडत चालला होता, तिची अवस्था बघून वाटत होतं की हिच्यात प्रतिकार शक्तीच राहिली नाहीये, असं वाटत होता की कुणीतरी पूर्ण शरीर आतून ओरबाडत आहे. आणि तेव्हढ्यात अचानक एक बदल झाला. नकळत तिची प्रकृती सुधारायला लागली***, हिरवट पडलेली ती पुन्हा तिच्या गव्हाळ रंगाकडे वळू लागली, असं वाटलं की औषधींचा हा परिणाम असेल पण नाही, तिची सुधारणा झाल्याझाल्या तिच्या तोंडातुन रक्त येऊ लागलं, त्यानंतर नाकातून, चेहऱ्यावर छोटेछोटे छिद्र तयार झाले ज्यांतून रक्त वाहायला लागलं आणि बघता बघता तिने जगाचा निरोप घेतला, त्यानंतर सुद्धा जे दुसऱ्या मुलींसोबत झालं ते पण अशाच प्रकारच होतं, मी त्यानंतर अनेक ग्रन्थ चाळले, माझ्या

पिताश्रीनी जे काही लिहून ठेवले होतं ते सुद्धा वाचला, अथक परिश्रमानंतर एका ठिकाणी त्याचा संदर्भ कळाला, मी ते आधीही वाचलं होतं किंतू बाबांनी हे मला सांगितलं होतं पण या भूलोकी अशा गोष्टी सुद्धा असतात यावर विश्वासच बसत नव्हता.

"नेमका काय संदर्भ भेटला तुम्हाला?"

"ते सुरुवातीला जे घडलं होतं ना तो सरळ सरळ एका बाह्य शक्तीने आत्म्या वर ताबा मिळवण्याचा प्रयत्न होता"

"काय?"

"हो, माझीपन अशीच प्रतिक्रया होती, अशा गोष्टी खरंच होतात का यावर विश्वासच नव्हता, पण मला एक गोष्ट खटकली कि तिची तब्येत जी सुधारली त्याचा काय अर्थ होता?असं वाटत होतं की कोणतीतरी विरुद्ध शक्ती सुद्धा तिथे होती जी या प्रवृत्तीला थांबवत होती.... मी हे सगळं कळल्यानंतर बराच वेळ थकीत झाले होते... मग शेवटी मला हे जरा विचित्र वाटलं म्हणून मी सामंताना येऊनच हि बातमी कळवली. "

"म्हणजे तुम्हाला म्हणायचं आहे की कुण्या असुरी शक्तीमुळे असं झालं?"

"नक्की तर नाही सांगू शकणार पण अनैसर्गिक जरूर म्हणता येईल. "

"आणि तुम्हाला विश्वास आहे की ही कोणती रोगराई नाहीये, कारण हे वत्सलेची मुलगी सोडली तर बाकी सगळेच स्निग्धा नदीकाठी राहतात. "

"नाही, आतापर्यंत शेकडो वर्षात ज्या साथीचे रोग आलेले आहेत त्या सगळ्यांचा अभ्यास मी केलेला आहे आणि जर का त्या पाण्यामुळे कुठली रोगराई पसरत असेल तर सर्वच लोक जे या पाण्याचा उपभोग करतात त्यांना हि रोगराई झाली पाहिजे होती, पण फक्त लहान मुलींच या प्रकरणात दगावत आहेत!!! विश्वास ठेवा या प्रदेशात तरी आमच्या कुळापेक्षा कुणी श्रेष्ठ आयुर्वेदाचार्य कुळ नाहीये, म्हणून माझ्या ज्ञानावर संशय कृपया घेऊ नये, "

"तुमचा गैरसमज होतोय, मला फक्त सध्या त्या प्रसंगाची माहिती पाहिजेल आहे, म्हणून शँका तर निघातीलच ना?"

"माझ्याकडे आहे या सगळ्यांचा उत्तर"

"आणि ते काय?"

"ते मंदिर!!"

हे ऐकताच अचानक पूर्ण सभागृहात शांतता पसरली

"चकित नका होऊ, मला सुद्धा त्याबद्दल माहिती आहेच, म्हणूनच मी यांची माहिती सर्वप्रथम येऊन सामंताना येऊन सांगितली, दुसरा तोडगा नाहीये याच्याशिवाय, त्या मंदिरात नेमकं काय आहे याची मला काडीची कल्पना नाहीये पण हो जर का ते मंदिर विटाळल तर त्यातून एक असुरी शक्ती बाहेर पडेल हे मात्र माहित आहे"

तेव्हढ्यात सती म्हणाली,

"युवराज, मला वाटत आपण यांना घडणाऱ्या सगळ्या गोष्टींचा कल्पना दिली पाहिजे, यांच्या ज्ञानाचा आपल्याला फायदाच होईल. "

"म्हणजे काही अशुभ घडलेलं आहे का?"

"हो, अशुभ म्हणण्यापेक्षा दुर्दैवी"

"नेमकं काय झालंय"

"त्या मंदिरातला उमा राणीचा पुतळा विटाळला आहे आणि आता त्या ताम्रपटनुसार रमण ची आत्मा बाहेर पडली आहे आणि.... "

"आणि काय, !!"

"आणि आता ती मलुक च्या स्त्रियांचा कर्दनकाळ ठरेल!!"

"म्हणजे ती दन्तकथा खरी आहे तर!!"

"दुर्दैवाने हो, आम्ही याला टाळण्याचा पूर्ण प्रयत्न करू, आणि या कार्यात आपली काही मदत मिळाली तर फार बरं होईल"

"मला वाटत मी आपली मदत करू शकते, "

"ते कशी?"

"मी या सर्व घटनांचा बारिकीने अभ्यास केला होता, त्यातून मला एक कळालं कि ती जी काही असुरी शक्ती आहे ना ती पाण्यातून प्रवास करते, आणि अमावस्येशी तिचा सम्बन्ध आहे, यासाठी तिने स्निग्धा नदीची निवड केली असावी"

"ते कसं?"

"बघा ना गोमतीची मुलं हि नदीकाठी खेळत होते, काही नदीत पोहत होते तर काही किनाऱ्यावर बसलेले होते, बाळाची अंघोळीची जबाबदारी मोठ्या मुलींवर होती. आणि

तिने जस नदीचं पाणी तिच्या अंगावर टाकलं तसा ज्वर सुरु झाला.

बाकीच्या प्रसंगात सुद्धा कुठे ना कुठे स्निग्धा नदीच्या पात्राचा सम्बन्ध आहेच"

"मान्य आहे पण मग वत्सले विषयी काय सांगणार?ती तर तिथे नाही रहात"

"वत्सलेची पोर तर जन्मल्या जन्मल्या ज्वराने बाधित झाली होती, याचा अर्थच मला कळला नाही, मग नीट विचारपूस केल्यावर कळालं कि तीच माहेरघर आहे ना ते स्निग्धा नदीवर आहे, अर्थातच बाळंत पणासाठी ती माहेरी गेली होती आणि त्या दरम्यान तिचा सम्बन्ध स्निग्धा नदीच्या पाण्याशी अनेकदा आला, याचा अर्थ पोटातच तिला बाधा झाली असावी पण त्याचा प्रभाव मात्र जन्मानंतर दिसला"

"याचा अर्थ आता त्या नदीच्या पाण्याचा वापर बंद करावा लागेल का?"

"नाही युवराज, प्रश्न पाण्याचा नाहीये, प्रश्न आहे पात्राचा, रमण कदाचित तिथे पात्रात निवास करतोय ना कि पाण्यात"

"मानलं, पण मग त्याने श्रावणी नदीची निवड का नाही केली, उलट ती तर मंदिराच्या बाजूनेच वाहते"

तेव्हढ्यात सामंत बोलले,

"श्रावणी नदीवर नेहमीच तीर्थ, मंगल कार्य, अभिषेक चालूच असतात, मला नाही वाटत कुठलीही एक दानवी शक्ती अशा ठिकाणी निवास करू शकेल "

"हो ते हि असू शकत, चला धन्यवाद तुमच्या या माहितीमुळे आम्हाला बरीच मदत होईल, कदाचित पुढील मृत्यू तरी टाळता येतील, सामंत जी शहरात दवन्डी पेटवा,

कुणीही लहान मुलगी अथवा गर्भवती महिला स्निग्धा नदीच्या पात्रात जाऊ नये"

"जशी आपली आज्ञा"

"सामंत जी, पंत नाही का आले अजून??"

"कुणी माझी आठवण काढली का?", तेव्हढ्यात स्वतः पंतच सभागृहात आले.

"या पंत तुमचीच वाट बघत होतो आम्ही"

"मी एक साधा पंडित, माझी वाट बघणं एका युवराजला शोभा नाही देत, तुम्हाला कधीही आठवण आली

की फक्त आज्ञा करत जा मी लगेचच हजर होत जाईल, अरे हे काय मलुक चे आयुर्वेदाचारिणी इथे कसकाय?"

"प्रणाम पंत, मला सुद्धा सध्या घडत असलेल्या अभद्र घटनांसाठीच इथे बोलावलं गेलंय"

"चला, म्हणजे तुमच्या कुशाग्र बुद्धीचा राज्याला पुन्हा फायदा होईल तर, असो मला इथे बोलावण्याच प्रयोजन कळू शकेल का युवराज"

"खरंतर त्या आदिवासी जमातींच काय करावं यासाठीच तुम्हाला बोलावलं आहे, "

"मी आपणाला आधीच सांगितलं आहे, जी काही खरी माहिती मिळवायची असेल ती तिथेच आहे"

"एव्हढ्या विश्वासाने कस सांगू शकता तुम्ही?"

, सती ने प्रश्न विचारला.

"साधारण दोन वर्षांपूर्वी माझा वार्तालाभ आमच्या मोठ्या बंधू सोबत झाला होता. त्यावेळी बोलता बोलता त्यांनी माझ्याकडे नकळत मनीरसाचा उल्लेख केला होता, ते त्या पर्वतात कदाचित मनिरस तयार करण्याचा प्रयत्न करत असावेत, आणि आपल्या सर्वांना माहीतच आहे की मनिरसाचा उल्लेख हा त्या कामक च्या त्या पौराणिक कथेत आढळतो ज्यात कामक कसा उत्पन्न झाला याची माहिती दिली गेली आहे, रमण आणि कामक चा शेवट कसा करावा याचा उलगडा करण्याचा प्रयत्न ते करत असावेत, आणि मला नक्की खात्री आहे की त्यांनी त्याबद्दल सर्व काही नमूद केल असावं, आणि मला वाटत कि त्यांनी त्याचा उलगडा

केलाही असणार, आपल्याला जरबते कळून घ्यायचं असलं तर त्या पर्वतात जावंच लागेल"

"म्हणजे आता ते आदिवासींचं निवासस्थान हीच आपली शेवटची आशा असं म्हणावं लागेल तर"

" मलापण तेच वाटत, आणि हो एक लक्षात घ्या आपल्याला लवकरात लवकर गेलं पाहिजेल, दोनच दिवसांनी अमावस्या आहे, पुन्हा कुणातरी निरपराध मुलीचे प्राण जाण्या अगोदर", असं रजनी ने सुचवल.

"हो, ते हि तितकंच महत्वाचं आहे"

आतापर्यंत कधीनव्हे ते शांत असलेले सेनापती अचानक उद्गारले,

"ठीक आहे, या मोहिमेची जबाबदारी मीच घेतो, सोबत काही सैनिक घेऊन त्या पर्वतांवर चढाई करतो आणि सर्व माहिती काढून आणतो"

"नाही सेनापती, तिथे माझं असणं महत्वाचं आहे, आणि सैन्य सोबत घेऊन जाण मला योग्य वाटत नाही, कदाचित शांततेत, प्रसंगाच गांभीर्य त्यांना सांगितलं तर ते हि वाद न घालता मदत करतील. आपण दोघेच तिथे जाऊयात"

"युवराज मी एक सुचवू का?, मला वाटत त्या पर्वतावर जाण्याआधी एकदा आपण अमावस्येला मलुक ला थांबावं, आपण नेमकं बघुयात ना कि खरंच हे मृत्यू ला जबाबदार ती अनैसर्गिक शक्ती आहे का?आणि आपल्याला प्रत्यक्ष कळेल सुद्धा कि नेमकं काय होतंय... ऐकावात

असलेल्या कथांपेक्षा एकदा स्वतःच्या डोळ्यांनी खात्री केलेली बरी, नाही का?", सती ने तिचा पक्ष मांडला

"अमावस्येनंतर, पण तोपर्यंत एखादा मृत्यू झाला तर"

"त्याचीच तर आपल्याला खात्री करायची आहे, आतापर्यंत रजनी यांनी सर्व शक्यता सांगितल्या आहेत, या अमावस्येला त्याचं प्रात्यक्षिक बघुयात"

"म्हणजे आपल्या डोळ्या देखत कुणाचा मृत्यू होऊ द्यायचा?"

"नाही, मुळीच नाही, मला वाटत आपण सर्व दक्षता घेऊयात, कुणीच स्निग्धा नदीला स्पर्श नाही करायचा,

आपले सैनिक जागोजागी तैनात करायचे जेणेकरून काही झालंच तर लगेच परिस्थिती सांभाळून घेता येईल, यावेळी समझुनच घ्यायचंय, नेमकं काय करतो रमण, नेमकं त्याला पाहिजे तरी काय?, आणि हे सर्व प्रत्यक्षात बघितल्याशिवाय नाही कळणार"

"म्हणजे मृत्यू होऊ द्यायचाच असं ना?"

"नाही सेनापती, मृत्यू तर होऊ द्यायचाच नाही, आपल्याला बघायचं आहे की तो नेमकं काय करतोय जेणेकरून त्याला इतरांच्या आत्म्यावर वर्चस्व मिळवता येत!!"

"चांगली कल्पना आहे, पण आपल्याला कस कळेल कि तो कोणत्या वेळी कुठे आहे, एव्हढंच काय आपण त्याला बघू तरी शकतो का?", रजनी ने प्रश्न केला

ते ऐकताच सामंत बोलले, "त्याला आपण बघू शकतो का हे तर नाही सांगू शकत मी, पण हो आपल्याकडे एक अशी प्रणाली आहे की मलुक मध्ये कोणतीही घटना घडलीच तर काहीच क्षणात ती आपल्याला कळू शकेल, ती प्रणाली वापरली तर मग किमान आपण घडलेल्या घटनास्थळी तरी लवकर पोहोचू शकू"

"अशी व्यवस्था आहे मलुक मधे?"

"हो, का नाही!! शहरात उंच स्थळांवर तांब्याचे मोठे मोठे पत्रे बसवले आहेत, त्यांना एका दिशेमधे जर का आपण स्थगित केलं तर शहरातील एका जागेची छाया दुसऱ्या जागेवर सहजरित्या पाठवत येते... हि प्रणाली मारुत राजानेच तयार केलेली, काही विशिष्ट खुणा तयार करून एक संदेश याद्वारे प्राप्त करता येतो आणि मग त्याला उत्तर

म्हणून तसाच संदेश पुन्हा पाठवता सुद्धा येतो, त्यासाठी आपण शहराच्या विविध भागांत मोठं मोठ्या मशाली लावल्या आहेत ज्यांच्या ज्वालांचा वापर करून संदेश तयार होतो, त्यातील मुख्य मशाल हि राजवाड्यातील मोठ्या सज्जा वर आहे, जिथून सर्व काही व्यवस्था चालवता येते"

"अद्भुत!अशी व्यवस्था तर अजून प्रतिष्ठान मध्ये सुद्धा केलेली नाहीये"

"हो पण सध्या तरी हे सगळं वापरात नाहीये, पण चिंता नाही, उद्याच सगळं व्यवस्थित केलं जाईल"

"उत्तम!, तर मग आता पहिलं पाऊल तरी आपण उचलायला आपण तयार झालो म्हणायचं, किमान यामुळे पुढची वाट तरी सापडावी अशीच ईश्वर चरणी प्रार्थना,

बोलता बोलता संध्या झाली आहे, मला वाटत आता ही सभा इथेच संपवावी, आपण उद्या सगळे पुन्हा भेटूच"

....................

ज्या दिवसाची प्रतीक्षा दोन दिवसांपासून केली जात होती तो दिवस आज उजाडला होता, नुकताच सूर्योदय झाला होता, श्रवण वाड्याच्या सज्जातून पूर्ण शहराला न्याहाळत होता, पूर्ण शहर अजूनही जागी नव्हतं झालं, वर थोडंफार आभाळ दाटून आल होतं, कदाचित लवकरच पहिला पाऊस येईल याची ती चाहूल असणार, शहराच्या मागे उभा असलेला सह्याद्री आज धुक्यांमुळे पूर्णतः झाकला गेलेला, श्रावणी नदीच्या पत्रातुन हळुवार पाणी वाहत होतं. होतं, त्याने खाली बघितलं तर वाड्याच्या आवारात जे छोटंसं देऊळ होतं तिथे नित्यप्रमाणे सती दिसली, तिच्यासोबत कमल म्हणजेच तिची दासी तर होतीच. सती च आणि कमल

च फार जमायचं, कमल बद्दल सांगायचं झालंच तर ती दुर्दैवाने एक विधवा होती, अगदीच लहान वयात लग्न झालं आणि त्याच वयात कपाळाचा कुंकू पण पुसल्या गेलं, तस राजघरातील स्त्रियांवर विधवांची सावली पण पडू देत नाही कुणी, पण सती आणि कमल च खूप जमायचं, म्हणून मग तिच्या आग्रहाखातर कमल तिची दासी किंवा तिची सोबती म्हणूनच राहायची आणि लग्न झाल्यावर देखील तिच्यासोबत कमल सुद्धा आली होती.

असो, अमावस्या सुरु व्हायला अजूनही दोन प्रहर बाकीचं होते, वाड्याचा सज्ज बऱ्यापैकी मोठा होता, उंचावर होता, एकंदर पूर्ण शहराच्या निरीक्षणासाठी उत्तम जागा, म्हणून याच ठिकाणी संदेश प्रणाली बसवली गेली होती, शहरात विविध ठिकाणी लावलेले तांब्याचे पत्रे शेवट इथेच करत होते, जवळ जवळ तीन पत्रे सज्जावर होते जे शहराच्या तीन भागांतून येणारे संदेश पकडू शकत होते.... तयारी तर जोमात झाली होती आता प्रतीक्षा फक्त एखादी घटना घडण्याची होती... श्रवण ने एकदा त्या पत्र्यांची पाहणी

केली, शहराकडे भिरभिरती नजर टाकली, त्याला अचानक शहरातील घरांमधे एक साम्य नजर आलं, बऱ्यापैकी घरांना आजूबाजूला मोकळी जागा होती, नीट बघितल्यावर कळल कि हि जागा मुद्दाम खोलगट केली होती,

कदाचित त्याच्यातून लगेचच पाण्याचा निचरा व्हावा यासाठी असणार ती.. आणि त्याची गरजही होती म्हणा, सह्याद्रीच्या कुशीत वसलेलं ते शहर, पाऊस तर जोरदार पडत असणार मग साठलेल पाणी बाहेर जाणार कस?पण यापासून उंच आणि टुमदार घरे वंचीत होती. त्यांना आधीच उतरत्या छपराची घरे होती, पाणी न साठता दूरवर पडायचं जेणेकरून जमा होणार नाही. तो मनोमन हसला कारण प्रतिष्ठान ला श्रीमंत लोक आपल्या घराजवळ पाणी साठाव म्हणून व्यवस्था करायचे तर इथं ते साठू नये म्हणून, आणि हसता हसता तो त्याच्या कक्षात निघून गेला.

....

मध्यान्ह उलटून गेलं होतं, सकाळी भरून आलेलं आभाळ तर केव्हाच निघू गेलेलं, त्याची जागा आता सूर्यदेवाने घेतली होती, जणू आता सूर्यनारायण पृथ्वीवरच आले आहेत एव्हढा दाह जाणवत होता... जवळ जवळ सगळ्यांचं घामाच्या धारा लागल्या होत्या, पण तेव्हढ्या उन्हातही सज्जावर तंबू ठोकून श्रवण आणि सेनापती बसलेले होते... दुरून दवन्डी पेटवणार दिसत होता. पहाडी आवाज असणाऱ्या त्याने कामात कसलाच आळस दाखवला नव्हता. तशी त्याला आज्ञाही केली गेलेली, शहरातल्या प्रत्येकच भागात तो आतापर्यंत किमान दोन फेऱ्या मारून आला होता, त्याच्या या प्रयत्नांनी तरी कुणी नदीवर जाईल असा वाटत नव्हतं, आता रमण ला त्याचं सावज पकडण्यासाठी मोठी मशागत करावी लागणार होती आणि श्रवण ला नेमकं तेच हेरायच होतं, कि रमण हा सध्या शक्तीहीन आहे का कि सध्या शांत.

कारण शक्तीहीन असल्यास कुणालाही नदीचं पात्र ओलांडून सावज तर तो बनवू शकता नव्हता, मात्र जर का शांत असेल आणि योग्य वेळेची वाट बघत असेल तर त्याच्या गरजेनुसार तो कसाही एखादा बळी घेऊन पुन्हा लुप्त होऊ शकत होता, तो मनोमन खुश झाला होता, कारण निर्णय जरी अमावस्येपर्यंत थांबायचा निर्णय त्याने घेतला होता तरी याचे हे फायदे मात्र सती लाच सुचले होते, सुंदर बुद्धिवान मुलगी तशी कुणाला नको असते ??

आता सूर्य पश्चिमेकडे कलला होता, याचा अर्थ अमावास्येचा प्रहर सुरु झाला होता, भलेही सूर्यास्ताला बराच वेळ होता तरी कुठल्याही क्षणी संदेश येईल त्यामुळे सर्वच जण सावध झाले होते. सामंत शहरात प्रत्येक भागात फिरून सैनिकांना सावध राहण्याचा इशारा देत होते, संदेश प्रणालीवर तैनात असलेले पण डोळ्यात तेल घालून इशाऱ्याची वाट बघत होते.

हळूहळू वेळ पुढे सरकत होता, एक घटिका, दोन घटिका, तीन घटिका पण अजूनही कुठेच काहीच हालचाल जाणवत नव्हती. आता सूर्य हळूहळू निरोप घेत होता, आभाळात सगळीकडे तांबड पसरलं, गावात सगळीकडे दिवे सुरु झाले, आज संदेश प्रणालीसाठी तर मुद्दाम रोषणाई करण्यात आली होती, दीपावळीनंतर प्रथमच एव्हढी प्रकाशाने हि नगरी भरली असणार, काही वेळाने अंधाराच साम्राज्य पसरायला लागलं, पण अजूनही काहीच घडत नव्हतं.

"सेनापतिजी आपण रमण च्या बाबतीत चुकलो तर नाही ना, मला वाटत आपण मांडलेले अंदाज, तर्क चुकीचे ठरले आहेत. बघा ना आतापर्यंत ज्या काही घटना घडल्या त्या सूर्यास्ताच्या वेळी, किंवा दिवसा. पण आता रात्र झालेली आहे पण काहीच घडलं नाही"

तेव्हढ्यात सती बोलली,

"कदाचित युवराज आपण बरोबर सुद्धा असू शकतो, रमण खरंच शक्तीहीन आहे, बघा ना नदीपात्राजवळ कुणीच नाही गेलंय, मला तर वाटत तो सावज न भेटल्याने अजून क्रोधीत झाला असणार"

"तुझं बोलणंही योग्य असू शकतं, पण आपल्याला नक्की माहित नाहीये कि खरंच आपले तर्क बरोबर आहेत की नाही, कदाचित आज आपल्यासोबत पंत असले असते तर निर्णय घेण्यात मदत झाली असती, सेनापतिजी आता आपण त्यांना इथे बोलावू शकतो का?"

"बोलावू शकतो पण ते अवघड जाईल, कारण त्यांचं वास्तव्य काही स्थिर नाहीये, ते जिथे कुठे बोलावणं येत तिथे मुक्काम करतात, नाही बोलावणं आलं तर वनात कुठेतरी राहतात, आणि आता रात्री त्यांना शोधन म्हणजे कठीणच"

"ठीक आहे जाऊद्या, तसही आज काही घडेल असं वाटतही नाहीये"

असच बघता बघता एक प्रहर निघून गेला, आता सगळेच कंटाळून गेले होते, श्रवनचा डोळा लागत होता, सेनापती मात्र सह्याद्री प्रमाणेच अचल होते. पहारा मात्र सैल नव्हता झाला, शेवटी सेनापतींचे सैनिक होते ते.... तेव्हढ्यात आळस जावा म्हणून श्रवण इकडे तिकडे फेऱ्या मारत होता,

"सेनापतीजी, मला वाटत आता मध्यरात्र झाली आहे, काही होईल असं वाटत हि नाहीये, मला वाटत आता आपल्या सैनिकांना आज्ञा द्यावी कि पुन्हा छावणीत येऊन जा....

आणि वाक्य पूर्ण नाही होतं तोच सोसाट्याचा वारा वाहू लागला, एव्हढा वेगाने कि सगळीकडे धुळीचे लोट उडाले, आणि हत्तीची गर्जना व्हावी तसा आवाज सह्याद्रीच्या दिशेने येऊ लागला,

"हा आवाज कसला?", सती ने घाबरत विचारलं,

"अरे देवा, हा आवाज तर.... हा आवाज म्हणजे मेघागर्जना... या वर्षीच्या प्रथम पावसाला पण आजच यायचं होतं तर... "

लक्षावधी घोडदळाने एकदाच आक्रमण करावं इतक्या वेगाने आणि असमन्त दुमदुमून जावा अशा आवाजाने ढग गडगडत आले. बघता बघता दूरवरून येणार तोच आवाज आता मलुक च्या आभाळातून येत होता, सोबत कडाडणाऱ्या विजा आणि प्रचंड वेगाने वाहणार वादळ.

काहीच क्षणात सरी कोसळलं सुरु झालं. सह्याद्रीचा पाऊस प्रथमच बघत होते, धो धो करत प्रचंड पाऊस सुरु झाला.

आता मात्र पुरती पंचायत झाली होती, संदेश प्रणालीसाठी पेटवलेले भव्य दिवे, मशाली क्षणभरात विझून गेल्या, याचा अर्थ आता शहरात कुठेही काही झालं तर इकडच तिकडं कळणार नव्हतं.

"सेनापतिजी, आता आपण काय करावं, हे तर अगदीच अनपेक्षित होतं"

"चिंता नसावी युवराज, मला वाटत आपण वाडा सोडून शहरात जावं आणि प्रत्यक्ष माहिती काढावी"

"ठीक आहे तसा करूयात"

"त्यांनी सती ला वाड्यावरच राहू दिले, सोबत काही दास दासीही होते, आणि हे दोघे अंगरक्षकांसह शहराच्या मध्य भागाकडे निघाले. पाऊस प्रचंड कोसळत होता, दहा फुटांवरची वस्तू सुद्धा स्पष्ट दिसत नव्हती... पण अशा पावसात सुद्धा सैनिक कामात दिरंगाई करत नव्हते, खरंतर सैनिकांचा तो जोश बघून सेनापतींचा उर भरून आला... तेव्हढ्यात सामंत आणि इतर अधिकारी त्यांना येऊन भेटले,

"युवराज क्षमा असावी, मी या पावसाचा अंदाज बांधायला हवा होता, माझ्या या दिरंगाई मुले पुरती पंचायत झाली आहे"

"नाही सामंत, स्वतःला दोष नका देऊ, यात तुमची काहीच चुकी नाही, मला वाटत आपल्याला सर्वांना मिळून आता काम करावं लागेल, तुम्ही तुमचे सर्व अधिकारी नगराच्या विविध भागात पाठवा, आणि आपण तिघे

नगराच्या एकदम मध्य भागी उभे राहू म्हणजे काहीही झालं की आपल्याला कळणं सोपं होईल"

"चालेल, आपण तिघे माझ्या वाड्यावर जाऊयात, तो साधारण पणे नगराचा मध्य मानला जातो, आणि मी माझे अधिकारी तुम्ही सांगितल्या प्रमाणे मलुक मध्ये पाठवतो"

बघता बघता सर्व जण पांगले, आणि हे तिघे काही बातमी येते का याची वाट बघत सामंतांच्या वाड्यावर थांबले

एक घटका झाली पाऊस काही थांबायचं नाव घेत नव्हता. श्रवण त्या पावसातही वाड्याच्या सज्जावर येऊन निरीक्षण करत होता, त्या प्रदेशात तो सामंतांचा वाडाच सर्वाधिक उंच होता, बाकी सारे घर लहान होती म

, नेहमी प्रमाणे दोन घरांत अंतर होते, आणि त्या ठिकाणी पाणी जाण्यासाठी जागा केली होती.

"सामंत, मला सांगा शहरात इतका पाऊस पडतो तर पाण्याचा निचरा कसा होतो"

"सोपं आहे, हे बघा ना घरांच्या मध्यभागी साचणार पाणी  त्या छोट्या नाली द्वारे बाहेर काढलं आहे"

"आणि ते श्रावणी नदीत जात आहे का?"

"नाही ती चढावर येते ना, हे सगळं पाणी स्निग्धा नदीत जात"

ते वाक्य ऐकताच श्रवणला धक्का बसावा असं झालं.

"

म्हणजे पूर्ण शहराचं पाणी स्निग्धा नदीत जात ?"

"हो युवराज"

"याचा अर्थ हे सर्व दोन घरांमधील छोटे छोटे नाले म्हणजेच स्निग्धा नदीच्या छोट्या उपनद्या असही आपण त्याला म्हणू शकतो ना!!"

"हो असू शकत"

"अहो सामंत, याचा अर्थ कळतोय का?आपण भयानक अवस्थेत अडकलोय"

"म्हणजे मला कळलं नाही युवराज"

"अहो याचा अर्थ असा आहे की आता सम्पूर्ण मलुक गावच स्निग्धा नदीचं पात्र बनलंय, कळालं का?, रमण आता पूर्ण मलुक मध्ये कुठेही बिनधास्त गमन करू शकतो"

"अरे देवा, युवराज तुमचं म्हणणं जर खरंच असेल तर आपण फारच मोठ्या विवनचनेत अडकलोय"

आणि एकमेकांशी संवाद साधत असतानाच अचानक गावाच्या एका ठिकाणाहून एका स्त्रीचा आक्रोश ऐकू येऊ लागला,

"सेनापतिजी, रमण ने काम सुरु केलंय वाटतं"

आणि तिघेही त्या आवाजच्या दिशेने पळत सुटले, आवाज जिथून आला त्या दिशेने ते धावत होते, त्या घरात

बरीच गर्दी जमली होती, जाऊन बघतो तर एक दोन वर्षांच्या मुलीला मांडीवर घेऊन एक स्त्री रडत होती, नेहमी प्रमाणेच ती हिरवीगार पडली होती, आजूबाजूला एक सडका दुर्गन्ध पसरला होता, सर्वच लोक नाक दाबत होते,

ती मांडीवर असलेली मुलगी पूर्णपणे हिरवी पडली होती, तोंडातून फेस येत होता, डोळे पांढरे पडले होते,

सर्व लोक हळहळले होते, पण कुणीच काहीही करू शकत नव्हतं, श्रवण ने लागलीच सेवका तर्फे रजनी ला बोलावणं धाडलं होतं... असाच काहीसा वेळ निघून गेला, तो दुर्गन्ध वाढतच होता, आता त्या लहानग्या मुलीला कुणीच वाचवू शकणार नाही असं वाटत होतं आणि तितक्यात अचानक तो दुर्गन्ध दूर झाला, आणि त्या मुलीचा रंग पूर्ववत होऊ लागला, आणि जसा तो रंग पूर्ववत झाला तस तिच्या सबंध शरीरातून रक्ताच्या धारा लागल्या आणि तिने प्राण सोडले.

हि एक घटना होत नाही तोच शहराच्या प्रत्येक भागातून रडण्याचे आवाज येऊ लागले. हे तिघे धावण्याशिवाय काहीच करू शकत नव्हते, हे तिघे जिथेही जात होते  तिथे आधीच मृत्यू झालेला असायचा. आणि य घटना शहराच्या गोलाकार आकारत घडत होत्या

तेव्हा सामंताना कल्पना सुचली,

"युवराज, बघा हे सगले मृत्यू एका मालिकेत होत आहे, शहरात गोलाकार कृत्य घडत आहेत, आणि आता त्याच मालिकेनुसार पश्चिमेला काहीतरी घडेल.

"चला तिकडेच जाऊयात, "

", तिथे कुणी आहे का ज्यांना लहान मुलगी आहे?"

"हो एक कुटुंब आहे, मला वाटत त्याच घरात गेलं पाहिजे"

म्हंटल्यानुसार काहीच अवधीत ते तिथे पोहोचले.

दुरूनच एक किंकाळी ऐकू येत होती, याचा अर्थ आता ते ज्या घरात होते तिथे काहीतरी होणार होतं . पावसाचा ओघ थांबला नव्हता, तो सुद्धा धुवादार पडत होता. त्या घराच्या बाजूने इतर घरानुसार पाणी वाहत होतं. त्या ठिकाणी सेनापती उभे होते, घरात श्रवण आणि समन्त होते, तेव्हढ्यात सेनापतींनी आवाज दिला, बाहेर जाऊन बघितल तर ते पाणी हळूहळू हिरवं होत चाललं होतं. एक खूपच किळसवाणा, घाणेरडा वास यायला सुरुवात झाली... डोकं चक्रावून जाईल एव्हढा घाणेरडा वास येत होता... त्यामुळे ते सगळेच घरात गेले.

ती बिचारी आई तिच्या दोन वर्षाच्या मुलीला कड्यावर घेऊन बसली होती.... फार घाबरली होती, पण आईच होती शेवटी ती. स्वतःच्या बाळावर संकट आले तर साक्षात ब्रह्मदेवाला सुद्धा झिडकारेल अशी ताकद असते आईच्या मायेत.

हळूहळू तो घाणेरडा वास घरात येऊ लागला. पण दिसत कुणीच नव्हतं, सगळे जण हातात तलवार घेऊन तयार होते. घरात असलेले मशाली, दिवे आपोआप विझू लागले,

श्रवण दरवाज्याकडे उभा होता, त्याने स्वतःची तलवार बाहेर काढली होती, जवळ जवळ अर्धा माणूस उंच आणि त्या अंधाराचे सुद्धा विलक्षण चकाकी होती तिला, कुठल्याही समस्येला तोंड देण्यास तो समर्थ होता

आणि हळूहुळू तो दुर्गन्ध वाढत चालला होता, तो दुर्गन्ध एव्हढं वाईट होता की नकळत श्रवनची पकड सैल होऊ लागली आणि त्याची ती विलक्षण तलवार हातातून निसटली, त्याला अचानक भोवळ येऊ लागली, त्याचे डोळे जळत होते, जळजळ करणारे डोळे त्याने त्या क्षणासाठी हाताने पुसले, आणि जसा त्याने डोळ्यांवरून हात बाजूला

केला तस अहो आश्चर्यम, समोर असलेल्या प्रत्येकच वस्तूच अचानक रुपडं पालटून गेलं, असं वाटत होतं की जणू तो त्याच्या शयनगृहात आलाय. काय होतंय काहीच कळत नव्हतं, आणि एकाच क्षणात त्याला समोर सती दिसायला लागली. लग्नाच्या पहिल्या रात्री जशी दिसत होती एकदम तशीच, तिच्या शरीरातून मादक सुगन्ध दरवळत होता, तीच शरीर इतकं कामुक त्याला कधीच भासल नव्हतं, ती जवळ आली, तिने त्याचा हात तिच्या हातात घेऊन स्वतःच्या कम्बरेवर ठेवला, त्याच्या नजरेत तिची भेदक नजर नेऊन स्थिरावली आणि जराशी पूढे झोकून तिचे मऊ आणि गुलाबी ओठ त्याच्या ओठांवर चिटकवून दिले, हा क्षण कधी सम्पूच नये असं श्रवनला वाटत होतं, तिचा श्वास सुद्धा त्याला जाणवत होता, आता तिला बाहुपाशात घेऊन पूर्ण सुख देईपर्यंत सोडूच नये अशी त्याची इच्छा होती तेव्हढ्यात त्याला कुणीतरी आवाज दिला

"युवराज, युवराज, उठा युवराज, अनर्थ झालाय"

"त्याने डोळे उघडले तर काय बघतो समोर जे न व्हायचं तेच झालं, तो घाणेरडा वास अजूनही घरातच होता, ते मूल हळूहळू हिरवं पडत चाललं होतं, नजरे समोर असूनही काही करता येणं शक्य नव्हतं... सगळ्यांच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते, प्रथमच दुरबल असल्याचं जाणवत होतं....

आणि एकाएकी तो दुर्गन्ध नाहीसा होऊ लागला, तिथे त्यांना एक सुगन्ध येऊ लागला, मध्ये मध्ये वीज चमकाव्यात तसा प्रकाश चमकायला लागला, आणि बघता बघता तो दुर्गन्ध नाहीसा झाला. असं वाटत होतं जणू आताच कुणीतरी दोन लोक लढाई करून गेले, त्यांनी मुलीकडे बघितलं तिचा हिरवा रंग हळूहळू उतरू लागला, ती पुन्हा बरी झाली होती का?प्रत्येकाच्या डोळ्यात कुठे ना कुठे आशेचा किरण जन्माला आला, पण नाही, दैव इतकंही चांगलं नव्हतं, इतर मुलींप्रमाणे ती सुद्धा रक्ताने भरून गेली.

ते सगळं बघून श्रवण पूर्णतः हतबल झाला, सबंध आयुष्यात जी काही विद्या शिकली ती त्या शक्तीच्या पायाजवळ सुद्धा नव्हती, हत्यार टाकून आत्मसमर्पण सुद्धा अशा हतबलते पेक्षा सरस ठरलं असत... तो फक्त बघण्या शिवाय काहीच करू शकला नाही, नकळत डोळ्यातून अश्रू येऊ लागले, आणि त्या ठिकाणी पुन्हा एक आक्रोश झाला, पण तो यावेळी श्रवनचा होता,

बाहेर ढग तसेच गडाडत होते, पाऊस कोसळत होता, आणि शहर किंकाळ्यांनी भरून गेलं होतं!!!

## *शोध सत्याचा*

काल रात्री जे झालं होतं त्याच्याने पूर्ण शहर हादरून गेलं होतं, सलग सात अबाल मुलींचे मृत्यू झाले, आजचा पूर्ण दिवस मलुकसाठी शोकाकुळ होता. पूर्णच शहरात अफवाना उधाण आलेलं, नको नको त्या चर्चाना तोंड फुटलेले, कुणी याला देवाचा प्रकोप म्हणू लागलं तर कुणी स्वतःच्या कर्माची पाप. काही जण तर त्या मंदिराबद्दलही प्रश्न उपस्थित करू लागले. आता मात्र श्रवण च्या सम्पूर्ण कौशल्याची कसौटी होती, एकतर या अमानवी शत्रूला तोंड देणं भाग होतं त्यात वरून घाबरलेल्या जनतेला हि सम्भाळण गरजेचं होतं... त्यात वरून नैसर्गिक आपत्ती म्हणजेच पाऊस.... पण  तसं म्हंटलं तर श्रवणही स्वतःच पूर्णच तुटला होता....

सूर्योदय होऊन बराच वेळ झालेला, शहरात अजूनही कालच्या प्रसंगाचे आक्रोश ऐकू येत होते. श्रवण सरळ वाड्याच्या बाहेर पडला आणि श्रावणी नदीच्या

काठावर जाऊन बसला... डोळ्यासमोर राहून राहून कालचंच दृश्य येत होतं, त्याला एका ठिकाणी बसनही कठीण झालं होतं. असं वाटल कुठेतरी शान्त जागेत जाऊन बसावं, तो उठला आणि हळूहळू नदीच्या काठाने निघाला, हळूहळू नदीचा प्रवाह वाढत चालला होता, कालच्या पावसाने तुडुंब भरली होती, तो त्या नदीसह चालतच राहिला, एक कोस, दोन कोस असं हळूहळू अर्धा प्रहर चालल्यावर त्याला संगम दिसला, नीट बघता श्रावणी नदी आणि स्निग्धा नदीचा तो संगम होता, तिथेच किनाऱ्यावर तो जाऊन बसला, मनात अनेकानेक विचार येत होते, त्याला अचानक त्याच्या गुरूंची आठवण झाली. गुरुकुलात काढलेले दिवस, त्याच्या गुरूंनी दिलेली शिकवण, जवळ जवळ आवश्यक अशा सर्वच कला मध्ये पारंगत झाला होता, पण नैराश्यावर मात करणं मात्र एकच गुरु शिकवू शकतो आणि तो म्हणजे अनुभव. श्रवण ला नुसतं वाटत होतं की कदाचित आज त्याचे गुरु तिथे असते तर आज तो इतका

निराश नसता झाला. कुठेतरी त्याला आशेचा मार्ग त्यांनी दाखवलाच असता.

त्याने गुरूंच स्मरण करण्यासाठी अलगद डोळे मिटले, डोळ्यांसमोर त्यांची छबी आणली आणि हळूच पुटपुटला, 'गुरुदेव, मार्ग दाखवा',

आणि अलगद डोळे उघडले, आणि डोळे उघडताच त्याला एक मनुष्य आकृती दुरून त्याच्याकडे चालत येताना दिसली, अंगावर भगवे वस्त्र, डोकं मुंडन केलेलं, हातात विविध प्रकारच्या माळा. हळूहळू जेव्हा ती आकृती जवळ आली तेव्हा श्रवण ला ओळख पटली. ते शशिकांत पंत होते,

चेहऱ्यावर प्रखर तेज, जणू एखादा तेजस्वी ताराच चालत समोर येतोय असं भासत होतं, 6 फूट उंची, चेहऱ्यावर नेहमीच एक स्मित हास्य, आणि मुख तर नेहमीच

प्रसन्न, जरी ते ब्राह्मण असले तरी शरीर मात्र कोणत्याही क्षत्रिय प्रमाणे बलदंड होतं.

त्यांचं आगमन होताच श्रवण उठून उभा राहिला,

"पंत तुम्ही इथे!!"

"माझं काय मी जिथे निवारा मिळेल तिथे राहतो, त्यात हा संगम, इथलची झाडे, कपाऱ्या, या तर मला नेहमीच खुणावत असतात, पण माझं सोडा तुम्ही फार निराश दिसत आहात, हे सगळं काल रात्रीच्या प्रसंगामुळे तर नाही ना?"

"कालचा प्रसंग तुम्हाला कसा माहिती?"

"येतात कधी कधी दृष्टान्त"

"पंत काल जे झालं ते फारच दुर्दैवी होतं हो, मी तरुण वयातच लढाई बघितल्या आहेत, वनांमध्ये श्वापदांशी सुद्धा सामना केलाय, पण काल जे काही माझ्या समोर होतं त्याचा कधी स्वप्नातही विचार नव्हता केला, हातात असलेले शस्त्र त्यावेळी निरर्थक बनले, माझ्या बाहूंची ताकद त्या

ताकदीच्या चरणा जवळही नव्हती., आयुष्यात प्रथमच मी स्वतः निरर्थक आहे असं वाटत होतं. "

"नाही युवराज, स्वतःला दुर्बल समजू नका, आयुष्यात असे प्रसंग येणारच, प्रत्येकच वेळेस विजयाची अपेक्षा ठेवणं चुकीचंच... पण एक लढाई हरल्यामुळे युद्धाचा निकाल घोषित होत नसतो... कुणी कितीही ताकदवान जरी असला तरी परिपूर्ण मात्र त्या परमात्म्या शिवाय कुणीच नाही, आणि मला तुमच्यावर पूर्णपणे विश्वास आहे कि तुम्ही त्याला नक्कीच कैद करणार"

"परंतु ती शक्ती फारच असामान्य आहे, तिला फार जवळून अनुभवलं काल मी. "

"काय?अनुभवलं म्हणजे?"

"म्हणजे जेव्हा हि घटना घडली तेव्हा एक उग्र वास आला होता, आणि काहीच क्षणात मला नाही नाही ते  भ्रम झाले"

"कोणत्या प्रकारचे भ्रम?"

"मला अचानक समोर सती दिसली, मनात फक्त कामुक विचार येऊ लागले, असं वाटत होतं की आमच्या दोघांचंच वेगळं विश्व होतं, बरं झालं वेळेवर आम्हाला सेनापतींनी जाग केलं, नाहीतर मी अजून किती वेळ त्या चक्रव्यूहात अडकलो असतो देव जाणे"

"हे भ्रम फक्त तुम्हालाच झाले का?"

"नाही, तिथे उपस्थित असलेल्या जवळ जवळ प्रत्येकालाच, फक्त सेनापती सोडून"

"म्हणजे सेनापतींच ब्रह्मचर्य कामात आलं तर"

"म्हणजे?"

"म्हणजे जे काही रमण ने केलं त्या सर्व कामक च्या शक्ती आहेत, पण कोणताही खरा ब्रह्मचारी ज्याच्या मनात

कधी स्त्री बद्दल लालसा उत्पन्न नाही झाली त्याच्यावर हे सगळ प्रभाव नाही टाकू शकत, मनाचा संयम म्हणजेच सर्वात प्रभावी शस्त्र आहे, पण याने फक्त स्वतःच रक्षण होऊ शकतं, मात्र जर का त्याला सम्पूर्ण पणे नष्ट करायचं असल्यास तर काहीतरी असामान्यच करावं लागेल

"आणि ते काय?"

"त्याचं उत्तर मी तुम्हाला आधीच दिलंय, तुम्ही त्या आदिवासींमध्ये गेलं पाहिजे, ईश्वर पुढचा मार्ग तुम्हाला तिथेच दाखवेल, आणि एक लक्षात ठेवा तुम्ही एकटे कधीच नसाल तुमच्यासोबत तो परमात्मा नेहमीच राहणार आहे. कदाचित त्याची प्रचिती भविष्यात येईल किंवा आली सुद्धा असेल. "

"प्रचिती!! हो पंत, काल जेव्हा तो प्रसंग घडत होता तेव्हा असं वाटलं आता सगळं सम्पल, पण नाही तिथे अचानक एक हलकासा सुवास सुद्धा दरवळला होता. काही ठिकाणी वीज चमकल्यावर जसा प्रकाश दिसतो ना तसच काहीसं दिसलं होतं... त्या नरकात कुठेतरी वात्सल्य जाणवत होतं, पण दुर्दैवाने त्या लहानग्या मुलीचा जीव वाचवण्यासाठी ते पूरक नव्हतं. "

"जे विधिलिखित आहे त्याला कुणी बदलू नाही शकत, जाऊद्या मला वाटत आता तुम्ही त्याच्याबद्दल जास्त विचार करू नये .... "

"पंत एक सांगू?"

"बोला ना, "

"आज तुमच्याशी बोलून मला खूप दिवसा नंतर माझ्या गुरुदेवांची आठवण झाली, त्यांच्याशी वार्ता केल्यानंतर सुद्धा असच प्रसन्न वाटत, "

"मी तर एक साधा पुजारी, कुना महान व्यक्तीशी माझी तुलना होऊच शकत नाही, कदाचित आज मंगल योग साधला गेला असावा आणि माझ्या मुखातून काही शब्द वदले गेले जेणेकरून तुम्हाला धीर यावा, तो वर बसलेला स्वामी सगळं बघतो, त्याच्या मनाप्रमाणेच सगळं घडत, आपण तर फक्त त्याचं एक माध्यम"

किती छान बोलत होते पंत, आज प्रथमच त्यांचा असा मोठेपणा श्रवनला जाणवत होता, कालच नैराश्य कुठल्या कुठे निघून गेलं. श्रवण त्यानंतर कितीतरी वेळ त्यांच्याशी चर्चा करत बसला, त्याला वेळेचं भानसुद्धा राहीलं नाही, बघता  बघता संध्याकाळ झाली. आणि जेव्हा अंधार दाटून आला तेव्हा श्रवण ने त्यांचा निरोप घेतला. पण जाता जाता त्यांनी एक रुद्राक्ष त्याच्या गळ्यात बांधलं आणि ते पुन्हा कुठेतरी श्रावणी नदीच्या तीरावर गडप झाले.

........

सूर्य मावळला होता, आता पुन्हा पावसाच्या हलक्या सरी कोसळत होत्या, सभागृहात एक बैठक रंगली होती.

"सेनापतिजी मला वाटत आपण उद्याच रवाना झाल पाहिजे"

"जस तुम्ही म्हणता, मी तयारी केलेली आहेच, तुमची आज्ञा जशी झाली तस आपल्याला निघता येईल"

तेव्हढ्यात सामन्त म्हणाले,

"पण तुम्ही फक्त दोघेच जण तिथे जान म्हणजे धोका खूप मोठा आहे, दण्डकारण्याच्या युवराजाना काही होणं म्हणजे बरं नव्हे, "

"सामंत त्याची काळजी घेऊ नका, मी असेपर्यंत युवराजांच्या केसालाही धक्का लागणार नाही"

"सेनापती तुम्ही एक असामान्य लढवय्ये तर आहातच पण तिथे तुमचा सामना एका फौजेशी होऊ शकतो जे कधीही कुणाची दया करत नाहीत, आलेली शिकार स्वतःच खाऊन घेतात मग ती शिकार हरीण असो व माणूस"

"सामंत आम्ही सोबत काही सैन्य घेऊन जाऊच"

"सैन्य, सेनापती जर आपण सैन्य घेऊन तिथे गेलो तर मदत मिळण्यापेक्षा आपल्याला एक युद्ध करावं लागेल, मला वाटत आपण दोघच जावं, आपला मनोदय त्यांना नीट सांगितलं तर ते नक्कीच मदत करतील यात शंका नाही"

"नाही युवराज, अशी चूक करू नका, मी या नगरीचा सामंत आहे, त्या आदिवासींना चांगलं ओळखतो,

तुम्ही बिना फौजेचा तिथे जण म्हणजे स्वतः संकटांना आमंत्रण देण्यासारखं आहे"

"सामंत, ठीक आहे, जर का तुम्ही म्हणत असाल तर मी आणि युवराज फौज घेऊन जातो, पण ती फौज आम्ही मुख्य पर्वताच्या पायथ्याशी ठेवतो, जर का आम्हाला काही धोका जानवलाच तर लगेच एक संदेश बाण आकाशात सोडताच सर्व सैन्य वर येण्यास जास्त वेळ लागणार नाही"

"पण तरीही हे खूप धोकादायक आहे"

"सामंत पण जे भविष्यात होईल ते विध्वन्सक असेल, त्याला टाळण्यासाठी एव्हढं तर करावंच लागेल ना, "

"ठीक आहे, असं असेल तर मी पण आपल्यासोबत येतो"

"नको सामंत, आमच्या पश्चात या शहराला कोण संभाळणार, तुमची खरी गरज इथे आहे, रमण जरी फक्त अमावस्येला वध करत  असेल तरी इतर दिवशी गाफील राहून चालणार नाही, शिवाय गावात लोक नाही नाही त्या चर्चा करत आहे, मृत्यूच्या मागचे कारण विचारत आहे, अशावेळी त्यांना शान्त करणं, सुव्यवस्था लावणं या कामात सतीला तुमच्या साथीची फार गरज लागेल"

"ठीक आहे जस तुम्ही म्हणता, पण काळजी घ्या, आणि हो तुम्ही तिथून माघारी कधीपर्यंत याल?"

"काहीच दिवसात माघारी येण्याचा आमचा पूर्ण प्रयत्न असेल, पण दैव किती साथ देईल यावर ते सगळं अवलंबुन आहे, आणि हो एक महत्वाच सांगायचं आहे. जर का समजा आमच्यासोबत काही बरं वाईट झालं तर मात्र तुम्ही हे गाव पूर्णपणे स्थलांतरित करा, कारण पुढच्या

अमावस्येला तो अधिक प्रबळ बनेल, पुन्हा पाऊस झाला तर तीच गत होईल, संगमाच्या माध्यमातून तो श्रावणी नदीमध्ये सुद्धा प्रवेश करू शकतो, यावेळी लहान मुलीच नाही तर स्त्रियांचे सुद्धा प्राण जातील... म्हणून जर का पोर्णिमेपर्यंत आम्ही परतलो नाहीच तर तुम्ही थोडे थोडे करून आजूबाजूच्या गावात लोकांना हलवा, आणि हो पुढे नदीच्या काठांवर जी गाव असतील त्यांना सुद्धा हेच सांगा.. "

"जशी आपली आज्ञा"

"आता मला वाटत हि सभा इथेच थांबवली पाहिजे, उद्या आम्ही निघूच, तुम्ही शहराची अधिसारखीच काळजी घ्याल अशी इच्छा करतो. "

युवराजांची अशी आज्ञा होताच सभा बरखास्त झाली. प्रत्येक जण आपापल्या निवासी निघून गेला, काही वेळाने

रात्रीच जेवणही उरकलं, आणि त्यानंतर शयनगृहात रवाना झाले.

.....

"सती आज मला संगमावर पंत भेटले होते, खूप वेगळ्या हस्ती आहेत त्या, त्यांना बघून मला तर गुरुदेवांची आठवण झाली"

"ते नेमके कुठे राहतात, मी सुद्धा अनेक मंदिरात गेली आहे, बऱ्याच ठिकाणी ते उपस्थित आढळतात"

"अग त्यांचं ठावठिकाणा निश्चित नसतो, जिथे कुठे जागा मिळेल तिथेच ते निवारा तयार करतात आणि दिवसभर देवाची भक्ती"

" मग ते या गावात यायच्या आधी कुठे रहायचे?"

"पश्चिमेला मुंग डोंगराच्या कपारीत एक छोटंसं गाव आहे, तिथे जो एक फार मोठ सरोवर आहे जिथे एक शिवलिंग आहे, त्याच शिवलिंगाचे ते पुजारी होते, पण त्यानंतर मलुक मधे हि घटना घडली तेव्हपासून त्यांचा वास इथेच असतो"

"चला म्हणजे त्याच निमित्ताने मलुक ला त्यांचे पदस्पर्श लाभले तर"

"हो, आणि ते हि अशावेळी जेव्हा या गावाला त्यांची सर्वात जास्त गरज आहे, "

"हो ते तर आहेच, "

"फक्त एकदा हि आदिवासींची मोहीम पार पडली ना कि मग सर्व काही सुरळीत होईल, मग जे काही कळालं आहे ते प्रतिष्ठान ला सुद्धा सांगता येईल ... या रमण चा काहीही करून अंत करावाच लागेल"

"काळजी नसावी, देवाची कृपा आणि दृष्टी सदैव सत्याच्या बाजूनेच असते, आणि त्यात तुम्ही आहातच धैर्यवान, या गावाचा प्रश्न नक्कीच सुटणार बघा... असो पण त्यासाठी उद्याच काम निपटाव लागेल, उद्या निघायच्या आधी आपल्याला मंदिरात अभिषेक सुद्धा करायचा आहे. म्हणून युवराजांनी आता झोपावं जेणेकरून उद्या लवकर उठता येईल. "

"ठीक आहे राणीसाहेब, जशी आपली आज्ञा"

...........

दुसऱ्या दिवशी सुर्योदयापूर्वीच श्रावणी नदीवर असणाऱ्या गावदेवतेच्या मंदिरात अभिषेक चालू होता. बरेच लोक जमले होते... साक्षात पंतच आज पुजारी बनले होते... श्रवनच्या आणि सेनापतींचा भाळाला देवीचा अंगारा लावला गेला... त्यांनी देवीचे तसेच पंतांच पण दर्शन घेतलं आणि ते

आपल्या ध्येयाकडे निघाले. सोबत जवळ जवळ शेकडोंच सैन्य होतं. मलुक पासून जरी त्या पर्वत रांगा दिसत असल्या तरी ते अंतर बरंच होतं. मजल दरमजल करत करत ते कूच करू लागले. साधारण एक प्रहरानंतर सेनापतींनी त्यांच्या सैन्याला तिथेच थांबायला लावलं.

अजूनही काही कोसांच अंतर बाकी होतं. पण इथून पुढे आता वनांतून जावं लागणार होतं. पुन्हा तशीच घनदाट, डोंगरी भाग, ज्यात कधीही हिंसर् श्वापद समोर येतील असं वाटत होतं.

अचानक हळूहळू सरी कोसळायला सुरुवात झाली, आधीच एव्हढं घनदाट जन्गल, त्यात पावसामुळे जागोजागी पाण्याचे झरे वहायला लागले. डोंगराची चढाई तर चिखल झाल्यामुळे अजूनच अवघड झालेली.

"सेनापती, या ठिकाणी आपण व्यवस्थित चालूही शकत नाहीये अशा ठिकाणी ते राहू कसे शकतात?"

"मलाही हाच प्रश्न पडलाय, इथे राहणं म्हणजे आश्चर्याचीच गोष्ट आहे"

"आपण आताशी एक डोंगर पार केलाय, समोर अजून एक पर्वत दिसतो आहे, आपल्याला तिथे तर नाही ना जावं लागणार"

"हो युवराज, सामंतानी सांगितल्यानुसार तर या उंच पर्वतावरच त्यांची वस्ती आहे. "

"दुपार आहे, तरी या दाटलेल्या अभाळामुळे सूर्यप्रकाश पोहोचेना झालाय. मला वाटत आपण हा पाऊस कमी होईपर्यंत समोर असलेल्या कपारीत बसावं, कारण या अवस्थेत चढाई करणं म्हणजे सोपं नाहीये!!"

"ठीक आहे जस तुम्ही म्हणता"

त्यानुसार ते दोघेही एका कपारीत आसरा घेऊन बसून राहिले. बाहेर पाऊस सारखा कोसळत होता. श्रवण मनातल्या मनात पुढे काय करायचं याचे आराखडे बांधत

होता. सेनापती अजूनही तेवढेच कणखर भासत होते... एका खऱ्या योध्याप्रमाणे, गोदावरीला आलेल्या मोठमोठ्या पुरात त्यांनी मोहीम काढल्या होत्या, हा पाऊस अशा व्यक्तीच काय बिघडवणार. एक दोन तास झाल्यानंतर हळूहळू पावसाचा जोर ओसरायला सुरुवात झाली. आता बाहेर बऱ्यापैकी प्रकाश जाणवत होता,

"सेनापती आता आपल्याला कूच करायला मार्ग मोकळा झालाय असं वाटत, आपण आता निघालं पाहिजे"

युवराज तयार आहे म्हंटल्यावर सेनापतींनी लगेच खाली ठेवलेली तलवार उचलली, आणि लगेच उभे राहिले. दोन तीन तास सलग पडलेल्या पावसामुळे बाहेर सगळीकडे चिखल झाला होता... त्यात वाट काढत काढत ते समोर जाऊ लागले. मधेच एखादा साप, अजगर झाडांवर वेटोळे घालताना दिसत... माकडांच्या टोळ्या तर जागोजागी होत्या... असच पुढे जाताना त्यांना दूरवर एक माकड खाली पडलेलं दिसलं... त्याचा आकार तसा बराच मोठा होता.

त्याकडे दुर्लक्ष करत हे दोघेही आपापल्या मार्गाकडे निघाले. पण अचानक ते जोरजोरात विव्हळायला लागल.

त्याचं विव्हळण ऐकून अचानक बाकीच्या झाडांवरून सुद्धा तसेच विव्हळण ऐकू येऊ लागलं. कोणी दिसत तर नव्हतं पण आवाज मात्र ऐकू येत होते. हळूहळू चारही दिशांनी तसाच आवाज येऊ लागला. ते आवाज ऐकून दोघांनीही आपापली तलवार बाहेर काढली आणि एकमेकांच्या पाठीला पाठ लावून सगळीकडे नजर टाकू लागले. अचानक श्रवनला त्याच्या पायाजवळ काहीतरी हालचाल जाणवली, त्याने खाली बघितलं तर त्याचा पाय एका वेलीत अडकला होता, श्रवण ला ते दिसताच कळून चुकलं कि हा एक सापळा आहे, कुणीतरी मनुष्यच होता जो हे सगळं करतोय, त्याने अत्यन्त शिताफीने तलवार चालवत क्षणार्धात ती वेळ पायापासून वेगळी केली

तितक्यात एक लाकडी बॅन सुई सुई करत सेनापतींच्या दिशेने आला, त्याचा वेग बघता तो कधीही

शरीराला आरपार करेल असं वाटत होतं, पण सेनापतींनी वेळ साधली आणि वेळीच तो बाणाचा प्रहार तलवारीने रोखला

"युवराज, हे कोणततरी मानवी आक्रमण आहे, आपण सावध रहायला हवं"

"मलाही तसेच वाटतंय, पण शत्रू कुठे आहे हे मात्र कळत नाहीये"

अचानक डोक्यावरती असणाऱ्या झाडाच्या फांदीवर काहीतरी हालचाल झाली, दोघांनीही आपल्या तलवारीच तोंड वरच्या दिशेने केलं. तेव्हढ्यात त्या फांदीतून एक जाळ खाली आल आणि या दोघांच्या अंगावर पडलं. ते इतकं मोठं होतं कि दोघानाही हालचाल करता येत नव्हती, तलवारीने सुद्धा त्याला कापण शक्य होत नव्हतं. आता मात्र आपण अडकलोय हे त्या दोघानाही कळून चुकलं होतं.

"कोण आहे ज्याने आम्हाला कैद केलय?खरा क्षत्रिय असशील तर समोर ये", सेनापतींनी अचानक गर्जना केली.

त्यांचं बोलणं सम्पताच दूरवर विव्हळणार माकड उठलं. त्याची उंची जवळ जवळ कोणत्याही सामान्य मनुष्या एव्हढी होती, विशेष म्हणजे ताठ कण्याने ते चालू शकत होतं. हळूहळू जवळ आल्यावर या दोघांना कळून चुकलं कि ते कोणी माकड नाही तर तसा वेष धारण केलेला माणूसच आहे... तो जसजसा जवळ येत होता तसतसा आजूबाजूच्या झाडांतून सुद्धा अनेक माकडाचा वेष घेतलेले लोक बाहेर येऊ लागले. बघता बघता तीस चाळीस

जणांचा घेरा त्यांना पडला. जोरजोरात वाद्य वाजवणं सुरु झालं. माकडाच्या वेशातले ते तरुण विचित्र पद्धतीने नाचू लागले, विविध पक्ष्यांचे आवाज काढू लागले, श्रवण आणि सेनापती त्या जाळ्यात एव्हढ्या खराब पद्धतीने

अडकले होते की आता तर त्यांना हालचाल करणंही अवघड झालं होतं. अनेक वेली एकमेकांत गुंफून ते जाळ तयार केलं गेलं होतं त्यांमुळे तलवारीच्या घावांचाही त्यावर काही फरक पडत नव्हता.

त्या टोळीचा म्होरक्या म्हणजेच सुरुवातीला विव्हळणार ते माकड त्यांच्या पुढ्यात येऊन उभा राहिला. त्याने त्याच्या साथीदारांना काहीतरी हातवारे केले. त्याला होकार देतच काही जण समोर आले आणि त्यांनी श्रवण आणि सेनापतीला पकडलं, जाळ्यातून सोडण्याआधी तलवारी अलगद वेगळ्या केल्या, आणि सोबत आणलेल्या दोराने दोघांचेही हात बांधले.

"तुम्हाला काय वाटलं?तुम्ही आणलेलं सैन्य मागे ठेवलं तर आम्हाला कळणार नाही, हे समोर जे शिखर दिसतंय ना तिथून काहीच लपत नाही", तो म्होरक्या दोघांकडे बघून बोलला

ते ऐकताच सेनापती भडकले

"मूर्ख माणसा, तुला माहित नाहीये तू कुणाला अटक केलं आहेस ते!!"

"कुणीही का असेना, पण या ठिकाणी तो आमच्यापेक्षा नीचच राहील, तुम्हाला काय वाटलं, तुम्ही मलुक वरून सैन्य आणल तर आम्ही हरुन जाऊ, हा प्रदेश सोडून देऊ... आमचे राजे विरसेन तुम्हाला इतके भित्रे वाटले काय?"

"आपला गैरसमज झालाय, आम्ही इथे युद्धासाठी नाही आलोय. एका गहन विषयावर चर्चा करायची आहे, आणि हो यात आमचा कसलाच स्वार्थ नाहीये हे लक्षात घ्या", श्रवण बोलला.

"हा सहदेव काय मूढ वाटल का तुम्हाला?तुम्ही स्वतःच सैन्य मागे सोडलं आहे, आता आमच्याशी गोड गोड वार्ता करून मग पाठीत सूरी खुपसण्याचा डाव आहे ना तुमचा, पण आता फसले आहात तुम्ही, राजा विरसेनच तुम्हाला मृत्युदंड देतील आता"

आणि एव्हढं बोलून ते सर्व जण त्यांना कैदी बनवून पुढे घेऊन गेले... जाताना सुद्धा ते सर्व आदिवासी नाचतच होते, जणू आज या दोघांची मेजवानी करून खाणार होते ते. हळूहळू शिखर चढायला सुरुवात झाली... मधे मधे विचित्र प्रकारे तयार केलेली घरे दिसत होती. काही दोन झाडांच्या मधे, काही घरे तर झाडांवरच तयार केली होती. त्या दोघांना घेऊन जात असताना प्रत्येक घरातून लोक बाहेर येऊन येऊन मजा बघत होते, सहदेव ज्याने याना पकडलं तो मात्र खूपच आनंदित होता. स्वतःच्या राज्याला वाचवल्याचा अभिमान चेहऱ्यावर झळकत होता त्याच्या... चालता चालता त्या पर्वतावर एक सपाट जागा दिसली... एव्हढी मोठी सपाट जागा आणि ते हि इतक्या उंच पर्वतावर हे कुणाला पटलच

नसत. त्या जागेत एक काठोकाठ भरलेला तलावही होता. त्याच्या बाजूला असलेल्या एका विशाल वटवृक्षाखाली बरेच लोक जमलेले होते... या दोघांनाही तो जमाव त्या तलावाकाठी घेऊन गेला.

"महाराज विरसेन, हेच ते दोघे होते जे आपला प्रदेश जिंकण्याच्या इच्छेने आले होते. पण आम्ही त्यांना वनातच बंदी बनवलं"

"सहदेव आम्हाला तुमच्या कडून हीच अपेक्षा होती, तुमच्या सारख्या शूरवीरांमुळेच आपण या वनात सुरक्षित आहोत... चला आता वेळ न दवडता याना काली मातेकडे बळी म्हणून चढवूयात"

तेव्हढ्यात विरसेन च्या बाजूलाच उभा असलेला एक वृद्ध व्यक्ती बोलला.,

"राजा विरसेन, पण खरंच हे त्याचं मनिषेने इथं आले आहेत का?मला वाटत त्यांना शिक्षा देण्याआधी त्यांचा पक्ष ठेवण्याची संधी द्यावी, "

"गुरुदेव परंतु राज्याच्या शत्रूंवर कसलीही दया दाखवू नये ही आपलीच शिकवण ना!!"

"बरोबर आहे, परंतु प्रत्येकाला त्याची बाजू मांडण्याचा अधिकार मिळालाच पाहिजे हा सुद्धा आपला नियम आहेच ना!!"

"ठीक आहे, यांचे तोंड उघडण्यात यावे"

विरसेन च्या आज्ञेनुसार दोघांचेही तोंड उघडले गेलं, आणि तस करताच श्रवण बोलला

"मी दण्डकारण्याच्या राजकुमार श्रवण, इथं खरंच तुमच्याशी शांततेत चर्चा करायला आलोय, मला वाटतंय तुम्हाला  नक्कीच काहीतरी गैरसमज झालाय"

ते ऐकताच विरसेन जोरजोरात हसायला लागला.

"अरे मूर्खा, दण्डकारण्याच्या राजकुमार प्रतिष्ठान सोडून मलुकमध्ये कसा येणार?"

तेव्हढ्यात सेनापती बोलले,

"विश्वास ठेवा, ते खरंच युवराज आहेत, आणि हो आम्ही इथे एका महत्त्वाच्या कामाकरता आलोय. त्यात आम्हाला तुमची मदत पाहिजे"

"काय!!म्हणजे हे खरंच युवराज आहेत. मग तर काम अजूनच सोपं झालंय. मलुक म्हणजे आमचा शत्रू,

आणि मलुक चे अधिपती तर प्रतिष्ठान चे राजा म्हणजे तुमचे पिता, चला मी इतक्याश्या फौजेने कधीच प्रतिष्ठान ला हरवू शकलो नसतो, पण कालीमातेची कृपा आणि तिने माझ्या शत्रुनाच इथे आणलं, ती नरबळीची तलवार आणा, एकाच क्षणात या दोघांचाही प्राण घेतो मी"

आणि एव्हढं बोलत, जोरजोरात हसत त्याच्या हातातली ती लांबसडक तलवार फिरवत फिरवत श्रवण कडे आला.

त्याच्या डोळ्यात आग भडकत होती, जणू असं वाटत होतं की याच प्रतिशोधासाठी तो कित्येक वर्षांपासून थांबला होता, त्याच्या हसण्यातुन एक राक्षस डोकावत होता, चेहऱ्यावरचे स्नायू ताणले गेले होते, त्याने दुसऱ्या हाताची मुठ तर इतक्या रागाने दाबली होती की सर्वच नसा बाहेर आल्या होत्या

त्याने डोळे बंद केले आणि कालीमातेच्या मंत्र पुटपुटला, नन्तर डोळे उघडले, समोर श्रवण दोरखण्डने बांधून ठेवला होता, विरसेन ला आता फक्त त्याची मान दिसत होती, त्याने त्याची तलवार जोराय उचलली आणि तो ती मान धडापासून वेगळी करणार तितक्यात एक करारी आवाज मागून आला

"थाम्ब विरसेन!!!! "....

..........

तो त्याच वृद्ध गृहस्ताचा आवाज होता.

"थाम्ब विरसेन!!!, याना मारू नकोस", ते बघून सर्वच लोक अचम्बित झाले, खरंतर विरसेन हा तिथलचा सर्वेसर्वा होता, त्याला सल्ला देणारे काही लोक असायचे पण त्याला आतापर्यंत अशी आज्ञा करून कुणी थांबवलं नव्हतं,

हातातली ती तलवार तशीच थांबवत विरसेन ने त्या वृद्ध गृहस्थांकडे बघितलं

"गुरुदेव, या मलुक वासीयांसाठ तुम्ही मला थांबण्याची आज्ञा करत आहात??"

"गैरसमज करून घेऊ नये, मी तुमच्या कडून एक घोडचूक होऊ नये म्हणून असं केलं, एकदा तुम्ही या राजकुमारांच्या गळ्यात निरखून बघा"

असं म्हणताच सगळ्यांची नजर श्रवनच्या गळ्याकडे गेली... तिथे पंतांनी दिलेला एक रुद्राक्ष होता.

"युवराज, हा रुद्राक्ष तुमच्याकडे कसा?", त्या वृद्ध व्यक्तीने प्रश्न केला.

"मला पंत शशिकांत यांनी हा रुद्राक्ष दिलाय, जे कि गोविंद पंतांचे लहान भाऊ आहेत. "

"पंतांचा रुद्राक्ष, आणि तो हि तुमच्याकडे, विरसेन मला नाही वाटत आपल्या प्रदेशात येण्यामागे यांचा काही वाईट हेतू असेल, कारण पंत हे एकमेव व्यक्ती आहेत ज्यांची मलुक आणि आपल्यात शांती रहावी अशी इच्छा आहे, ते स्वतःचा रुद्राक्ष असा कोणत्याही माथेफिरूला देणार नाही किंबहुना तो अशा कुणालाही धारण करता येत नाही. मला वाटत यांचं इथे येण्या मागे काहीतरी वेगळं प्रयोजन असावं. "

"ठीक आहे गुरुदेव, जर तुम्हाला असं वाटत असेल तर मी याना स्वतःची बाजू मांडण्याचा अवसर देऊ शकतो, सैनिकांनो युवराजांना मुक्त करा"

असं म्हणताच दोन जण समोर आले आणि त्यांनी श्रवनला मुक्त केलं.

"बोला युवराज, निसंकोच बोला, "

"धन्यवाद विरसेन, गुरुदेव जे तुम्ही मला बोलण्याचा अवसर दिला. मला वाटत आपलं बोलण जर का गोपनियतेमध्ये झालं तर बर राहील"

"गोपनीय?"

"हो, कारण ही ते आहेच तितकी महत्वाचं"

विरसेन ने एकदा गुरुदेवांकडे बघितलं,

"ठीक आहे युवराज, तुमची इच्छा असेल तर आपण आपलं बोलणं गोपनियतेत करू शकतो"

आणि असं म्हणत श्रवण, सेनापती, विरसेन आणि गुरुदेव सर्व एका गोपनीय ठिकाणी आले. ते ठिकाण दुरून फारच छोट घर वाटत होतं, असं वाटत होतं जणू तिथे चार लोक मावणं सुद्धा कठीण, पण आत जाऊन बघता कुठल्याही महाला पेक्षा कमी नव्हतं ते, एका काळ्या कभिन्न कड्याच्या बाजूला उभारलेला होता तो महाल . त्याच्या बऱ्याच खोल्या तर कड्याच्या आतमधे बांधलेल्या होत्या... शिल्पकामाचा इतका उत्तम नमुना या आदिवासींमध्ये बघायला मिळेल असा कुणी स्वप्नातही विचार केला नव्हता.

ते चोघे जण या महालाच्या एका खाजगी खोलीत गेले. सर्वच जण दगडाने तयार केलेल्या खाटेवर बसले.

"हं!!आता बोला युवराज, तुम्ही इथे का आलात, नेमका तुमचा हेतू काय आहे?"

"विरसेन, कदाचित तुम्हाला श्रावणी नदीच्या काठी असलेल्या त्या मंदिराबद्दल माहिती असेलच"

"ते गूढ मंदिर, हो त्याबद्दल ऐकलं तर आहे!!गोविंद पंतांचा मृत्यू सुद्धा तिथेच कुणीतरी केला असं सुद्धा कानावर आलं आहे"

"बरोबर, त्याच मंदिरात जो उमा राणीचा  जो पुतळा आहे त्याला सुद्धा तडा देण्यात कुणीतरी यशस्वी झालंय"

"काय? हे कदापी शक्य नाही, पृथ्वी वरील कुठलीही भौतिक वस्तू त्या पुतळ्याला इजा करूच शकत नाही", अचानक बाजूला बसलेले गुरुदेव किंचाळले.

"हो गुरुदेव, पण दुर्दैवाने खरंच असं झालंय, हे कुणी आणि कोणत्या पद्धतीनं केलं हे जरी माहित नसलं तरी हे झालंय"

तेव्हढ्यात विरसेन बोलला,

"तो पुतळा तुटल्याने काय झालंय मग?"

"विरसेन, मी तुम्हाला एकदा रमण आणि कामक ची कथा सांगितली होती आठवली का?त्यानुसार जेव्हा केव्हा हा पुतळा तुटेल तेव्हा तो रमण मुक्त होईल आणि सर्वप्रथम मलुक च्या स्त्रियांचे प्राण जातील आणि हळूहळू संपूर्ण दंडकरण्यातील स्त्रियांचे, सगळीकडे अराजकता माजेल, दण्डकारण्याच्या नवी पिढीच जन्मणार नाही"

"अरेरे, हे तर फारच दुर्दैवी झालंय, परंतु यावर काहीतरी तोडगा असेल ना!"

"तोच तोडगा काढण्यासाठी तर मी इथे आलोय"

"इथे आलोय म्हणजे?, आम्ही तुमची मदत करू शकतो का?पण तसं तर तुमचं सैन्य आमच्यापेक्षा कित्येक पटीने सामर्थ्यवान आहे, मग आम्ही काय मदत करणार?"

"प्रश्न ताकदीचा नाहीये, तसही कुठल्याही तलवारीने कुणीही त्याला हरवू शकत नाही आणि कुठलीही ढाल त्याच्यापासून रक्षा करू शकत नाही... त्याला ह्रवण्यासाठी काहीतरी वेगळं करावं लागणार आहे"

"आणि ते काय?"

"तेच जाणून घेण्यासाठी मी इथे आलोय, गोविंद पंतांच निवासस्थान  इथेच आहे ना!!, असं म्हणतात की गोविंद पंतांना रमण बद्दल, त्या मंदिराबद्दल सर्व काही माहित होते. त्यांच्या राहत्या घरी त्यांनी काही पुरावे सोडले असावेत असा अंदाज सुद्धा आहे. शिवाय कुना अनुयाला तरी त्यांनी याबद्दल सांगितलं असेल... तीच माहिती काढण्यासाठी आम्ही इथे आलो आहोत. "

"गोविंद पंत एक मोठे हस्ती होते, त्यांच्या बद्दल मला आणि माझ्या प्रजेला अत्यन्त आदर होता, ते वर्षातून फक्त तीन महिन्यांसाठी इथे यायचे, आल्या आल्या ते कालीमातेच दर्शन करत असे, त्या नन्तर त्यांच्या देवकुपीत ते रहायचे व त्या तीन महिन्यात सबंध पर्वताची सफर करायचे, या तीन महिन्यात मात्र ज्या तीन अमावस्या असायच्या त्या काळात ते स्वतःला कालीमातेच्या मंदिरात बंदिस्त करून घ्यायचे, त्यावेळी मात्र त्या मंदिराची कुणीच पूजा करू शकत

नव्हत... आणि जसे तीन महिने सम्पले कि ते निघून जात, ते या काळात मात्र काय करायचे हा प्रश्न मी काय आमच्या पितांनी पण त्यांना केला नाही, त्यांनी इथे कुणाला स्वतःचा शिष्य हि बनवून घेतलं नाही, म्हणून त्यांच्या बद्दल माहिती देणारा आमच्या राज्यात कुणी असं अवघड आहे.. पण हो तुम्हाला जी कोणती मदत लागेल ती करायला आम्ही नेहमीच तत्पर आहोत, पण त्या बदल्यात मी एकच अपेक्षा ठेवतो आणि तो म्हणजे प्रामाणिक पणा "

"धन्यवाद विरसेन, तुम्ही आमची करत असणारी मदत कोणत्याही उपकारा पेक्षा कमी नाही"

"माझ्या जागी कुणीही असत तर एव्हढं तर केलंच असतं.... असो पण ते जे सैन्य तुम्ही आणलं आहे आणि माघारी ठेवलं आहे त्याबद्दल मात्र तुम्हाला स्पष्टीकरन द्यावाच लागेल. "

"तुमच्यापासून लपवून मला काही फायदा नाहीये. खरं सांगायचं तर आम्ही दोघेच इथे येणार होतो. पण सामंतानी मलुक आणि तुमच्यात असणारा वाद आम्हाला सांगितला. त्यांच्या मते आम्ही दोघेच इथे येन बिलकुल सुरक्षित नाही, म्हणून सुरक्षिततेसाठी आमच्यासोबत काही सैन्य दिल गेल . पण विश्वास ठेवा प्रथम आक्रमण करण्याचा माझा कसलाच हेतू नव्हता"

"ठीक आहे. युवराज तुमच्या शब्दावर मला विश्वास आहे, मी फक्त इमानाच्या बदल्यात इमान अपेक्षित ठेवतो. बाकी तुम्हाला इथे कसलीही मदत लागली तर आम्ही तत्पर आहोत. तुमची आणि तुमच्या सेनापतींची राहण्याची व्यवस्था आमच्याच महालात केली जाईल. तुम्ही आजच्या दिवस आराम करा आणि आम्हाला तुमचं आदरातिथ्य करण्याची संधी द्या"

"पुन्हा एकदा धन्यवाद विरसेन... अशा करतो की तुमच्या मदतीने या समस्येवर नक्कीच तोडगा निघेल"

एव्हढं संभाषण सम्पवून मग ते सगळेच उठले. विरसेनने त्यांना बाहेर आणलं... पुन्हा सर्वजण त्याच ठिकाणी जिथे आधी सभा भरली होती तिथे आले. आणि यावेळी तर विरसेन ने चक्क श्रवण ला आलिंगन दिल आणि ते हि सर्वांसमक्ष. अर्थातच बघणारे सगळेच लोक चकित झाले होते, पण ते दृश्य बघून जमलेल्या प्रत्येकाला हि कल्पना तर आलीच कि हे बाहेरचे लोक शत्रू नाहीयेत.

.......

बघता बघता रात्र झाली. श्रवण आणि सेनापती विरसेन च्याच महालात विश्रामगृहात होते. दिवसभराच्या प्रवासानंतर थकवा जरी आला असला तरी मात्र डोक्यात

चालू असलेल्या विचारांच्या चक्रामुळे मात्र दोघानाही झोप येत नव्हती. या प्रदेशात ते आले तर होते पण अजूनही बरंच काम बाकी होतं. खिडकीतून दिसणाऱ्या आकाशातल्या ताऱ्यांकडे बघत बघतच त्यांनी कशीतरी रात्र काढली. दुसऱ्या दिवशी सूर्य उगवताच दोघानाही जाग आली. सकाळी सकाळी हवेत हाड गोठवणारा गारवा पडला होता. एकतर रात्रीच मुसळधार पाऊस झाला होता आणि त्यात ते अधिक उंचीवर पण होते. श्रवण ने सहजच बाहेर नजर टाकली, बघतो तर काय सगळीकडे नुसते धुकं पसरलेले होते. मधातूनच जोराच वार आलं की ते धुकं बाजूला सरून त्यामागची हिरवळ दिसत होती. श्रवण ने ते बघण्यात जास्त वेळ न दवडता लगेचच प्रातर्विधी उरकल्या आणि आपल मुख्य काम साध्य करण्यासाठी तो तयार झाला.

सकाळी कालीमातेच्या मंदिरात आरती असते, याच निमित्ताने तिथे जाण्याचा निर्णय घेतला. विरसेन तर कालीमातेचा फार मोठा भक्त असल्याने तो सूर्योदय होताच मंदिरात जायचा, अर्धा प्रहर त्याच्या हाताने तिथे पूजा

चालायची आणि त्यानंतर आरती होत असे. म्हणून आजही तो आधीच तिकडे गेला होता. मग एक सेवक काही वेळाने श्रवण आणि सेनापतीला त्या ठिकाणी घेऊन आला.

मंदिर म्हंटलं तर श्रवनच्या विचारात एक वास्तू तरळली होती पण प्रत्यक्षात बघतो तर ती एक गुहा होती. त्या गुहेत कालीमातेच्या काळ्या पाषाणाने बनवलेली दीड माणूस एव्हढी उंच मूर्ती होती ती... प्रथमतः बघून कुणीही घाबरून जाईल असच तीच रूप होतं. तिचे ते चार हात, डोळ्यात दिसणारी अंगार, लाल भडक आणि बाहेर काढलेली जीभ, आणि त्यात वरून पूजा करताना तिच्यावर केलेला कुंकवाच्या वर्षावाने तर ती अजूनच भडक दिसत होती. श्रवण आणि सेनापती थोडं दूरच उभे राहिले... मूर्तीच्या एकदम पुढ्यात विरसेन होता. सात फुटाच त्याचं धिप्पाड शरीर, पिळदार दंड, मानेपर्यंत ओघळणारे केस आणि पिळदार मिशी असं त्याचं रूप होतं. हातात एक अर्धवट माठ होता आणि त्यात ज्वाला पेटत होती, विरसेनने तोंडातल्या तोंडात काहीतरी शब्द पुतपुटले, त्याने एकवार

सर्व लोकांकडे नजर फिरवली आणि हात वर उंचावला आणि अचानकच सगळेच जण आरोळी ठोकायला लागले. काय होतंय कळतंच नव्हतं, बेंबीच्या देठापासून सगळे ओरडत होते, कोणी देवीच्या समोर येऊन रडत होतं, कोणी आक्रोश करत होतं, कुणी स्वतःच्या तोंडात मारून घेत होता. नेमकं या ठिकाणी चालू काय आहे हेच कळायला मार्ग नव्हता.

हे असं बराच वेळ चालू होतं, आणि जेव्हा हे सम्पल तेव्हा विरसेनने आरती म्हणायला सुरुवात केली.... खरंतर आरती म्हणजे एक प्रकारची देवीची स्तुतीच असते परंतु त्यांचा तो स्वर ऐकून देवीच्या वतीने ते पूर्ण जगाशी भांडण करताय असं वाटत होतं.

श्रवण या सगळ्याच बारिकीने निरीक्षण करत होता. आज एक वेगळीच संस्कृती त्याला बघायला मिळत होती. एक तास झाल्यानंतर सगळं शांत झाल... तो माठ ज्यात ज्वाला पेटत होत्या तो सगळीकडे फिरवला गेला आणि

त्याची उब सर्व जण माथ्याला लावत होते. विरसेन तिथूनच पूर्ण भक्तांवर नजर फिरवत होता, शेकडो जमलेल्या त्या आदिवासींमध्ये श्रवण ला शोधायला त्याला फारसा वेळ लागला नाही. आणि त्याने दुरूनच त्या दोघांना जवळ बोलावलं.

"या युवराज, तुम्ही भाग्यवन्त आहात जे पहिल्याच दिवशी तुम्हाला महाआरती मिळाली, महिन्यातून एकदा हि आरती होत असते, आज सर्व जण निर्जळी उपवास धरतात"

"महिन्यातून एकदाच भरते म्हणून एव्हढी गर्दी म्हणावी का??"

"हो, तस दररोज असतात बरेच जण पण आज संख्या जास्तच असते, पण तुम्हाला उपवास धरावा असं बंधन नाही हा, तुम्ही आमच्याकडे अतिथी आहात, "

"अतिथी काय म्हणता विरसेन, आता आम्हाला तुमचा छोटा भाऊच समजा, कदाचित आपल्या मैत्रितुन तुमच्यातील हा संघर्ष टळायचा"

"हा हा हा!!!, असं म्हणता, ठीक आहे आजपासून मी तुमचा थोरला भाऊ, "

आणि एव्हढं म्हणून त्याने श्रवनला आलिंगन दिल.. सगळेच जण आश्चर्याने बघत होते, कदाचित कालच्या प्रसंगा नंतर कुणाला वाटलही नसेल कि असही होऊ शकत.

"चला तर मग छोटे बंधू, आता सांगा आम्ही तुमची काय आणि कशी मदत करू!?"

"गोविंद पंत कुठे रहायचे?मला एकदा त्यांची वास्तू बघायची आहे"

"आपल्या डाव्या बाजूला या कड्या मागे ज्या पर्णकुट्या आहेत ना त्यातलीच एक त्यांची होती"

तेव्हढ्यात विरसेन ने त्याच्या एका सेवकाला आवाज दिला,

'युवराज हा माझा सेवक माधव, हा आजपासून तुमच्याच सोबत राहील, तुम्हाला काहीही गरज लागली तर हा तातडीने पूर्ण करेल, आणि काही अजून मदत लागलीच तर आम्ही नेहमीच हजर असू"

"धन्यवाद विरसेन!!"

"चला तर युवराज, आम्ही आता निघतो"

आणि असं म्हणून संपूर्ण दळभार घेऊन विरसेन माघारी फिरला, विरसेन जाताच तिथे जेव्हढा काही जत्था जमला होता तो काहीच क्षणात पसार झाला, जणू त्याने नजरेतुनच या सर्वांना आज्ञा दिली होती की आता इथून पसार व्हा. श्रवण ला हे जरा विचित्र वाटलं पण बहुतेक या ठिकाणी त्याचा धाक आणि आदर असल्याने असं झाल असावं म्हणून त्याने दुर्लक्ष केलं.

आता त्या ठिकाणी फक्त श्रवण, सेनापती, तो सेवक आणि काही पुजारी एव्हढेच लोक होते, काही वेळेपूर्वी आसमंत दणाणून जावा इतका आवाज होता आणि आता मात्र कुणी श्वास घेतला तरी आवाज होईल इतकी शांतता होती.

"सेनापती जी मला वाटत आता आपण पंतांच्या कुटी जवळ जावं"

"जस तुम्ही म्हणता, माधव आम्हाला रस्ता दाखवू शकतोस का?"

"हो मालक, त्यासाठीच तर मी इथे आहे, चला माझ्या मागोमाग या"

दोघेही माधवच्या मागेमागे चालू लागले, एका छोट्याश्या कड्याला वेढा घालून ते पूर्वेकडे आले, समोर येताच त्यांना दिसले ते उंचच उंच झाड, आणि त्यांच्यावर लटकणाऱ्या वेली वर फंदीपासून तर जमिनी पर्यंत टेकल्या होत्या... आणि त्या जाड आणि मजबूत वेलींचा वापर करून, त्यांना एकमेकांत गुंफून व त्यावर झावळ्या टाकून पर्णकुटी तयार केल्या गेल्या होत्या.

"अरे माधव, यातली गोविंद पंतांची कुटी कोणती?"

"ती जी सगळ्यात शेवटी दिसत आहे ना तीच"

शेवट म्हणजे जवळ जवळ  वीस एक झोपड्यांनंतर ती झोपडी दिसली. दोन वडाच्या झाडांच्या मधोमध तीच प्रवेशद्वार होतं.

"इथून तुम्हीच पुढे गेल पाहिजे, तुमचं काम संपेपर्यंत मी इथेच थांबेल"

"इथेच थांबशील म्हणजे, तु नाही येणार?"

"नाही युवराज, कोणत्याही व्यक्तीला देवकुटिंमध्ये जाण्याला परवानगी नाहीये, देवकुटीच काय जिथून या देवकुतींची मर्यादा सुरु होते तिथे सुद्धा आम्हाला प्रवेश निषिद्ध आहे, तुम्हाला तर महाराज विरसेन यांनीच परवानगी दिलीये म्हंटल्यावर तुम्ही जाऊ शकता"

"देवकुटी म्हणजे?"

"देवकुटी म्हणजे या सर्व झोपड्या जिथे मोठे मोठे महंत राहतात. हे सर्व दुरहून इथे येतात. खास कालीमातेची भक्ती करण्यासाठी. "

"काय?कालीमातेच्या भक्ती करण्यासाठी दूरवरून या दुर्गम भागात!"

"हो, आमच्या या पवित्र जागेत"

"हम्म, ठीक आहे तू थांब इथेच आम्ही  जातो. "

दोघेही चालत चालत जाऊ लागले, मध्ये अनेक कुट्या लागल्या, दोन कुतींमधे बरच अंतर सोडलं होतं, बरच अंतर चालल्या नंतर त्यांना ती शेवटची कुटी लागली, बाहेरून तर खूपच छोटेखानी होती, त्या दोघांनीही त्या कुटीत प्रवेश केला. बाहेरून खरंतर असं वाटलं होतं की चारच पावलात हि कुटी सम्पेल, पण अहो आश्चर्यम, आतमधे

बराच भाग होता. चक्क त्या वडाच्या झाडामध्ये सुद्धा कोरून कोरून जागा तयार केली होती... चार व्यक्ती उंच इतकं छप्पर होतं तिथे.... दोघांनीहि एकद सगळीकडे नजर फिरवली पण फक्त मोकळी जागा, एक माठ, आणि काही खुंट्या दिसल्या ज्यावर माळ, रुद्राक्ष, वगैरे एक साधू परिधान करेल इतकंच सामान होतं.

"सेनापतिजी, इथे तर काहीच नाहीये, निव्वळ एक अगडबम्ब झोपडी आहे ही"

"युवराज कदाचित इथलचं सर्व सामान हलवलं असावं"

"कोण हलवणार?विरसेनच्या परवानगी शिवाय कुणी आतमधे जाऊ नाही शकत. "

"युवराज कदाचित विरसेनने तर ... "

"नाही सेनापती, उगाच त्यांच्यावर शँका घेणं चुकीचं ठरेल. "

"मग आता पुन्हा माघारी फिरायचं?"

श्रवण ने सेनापतींच्या प्रश्नाचं उत्तर द दिल नाही त्याऐवजी तो पूर्ण कुटी ला न्याहाळू लागलं, एका झोपडीच्या मानाने ती खूपच प्रशस्त होती, अशा जंगलात एव्हढी प्रशस्त कुटी असं म्हणजे जरा विचित्र होतं, दोन वडाचे झाड स्तम्भा प्रमाणे भासत होते, एकूण चार भिंती होत्या, त्यापैकी तीन भिंती या झावल्यानी आणि झाडांच्या पानांनी बनल्या होत्या तर जी चौथी भिंत होती ती मात्र लाकडी होती आणि ती भिंत बरोबर दोन झाडांच्या मधोमध होती, आणि विशेष म्हणजे त्या भिंतीवर आठ ते दहा खुंट्या होत्या

"सेनापती तुम्ही एक निरीक्षण केलंय का?म्हणजे बघा ना इथलचे राहणारे लोक सर्व आदिवासी, त्यानि परिधान केलेलं वस्त्र सुद्धा तशाच प्रकारचे, पण त्यांच्या वास्तू इतक्या प्रगल्भ कशा??विरसेनच्या महल तर साक्षात कपारीत कोरून बनवला गेलाय, डोंगर उतारावर सुद्धा संरक्षक बुरुज आहेत, आणि असं जागेच्या अभावी

संतांसाठी चक्क झाडांमध्ये उभारलेली कुटी, आपल्या प्रतिष्ठान ला सुद्धा असं कधी बघण्यात नाही आलं "

"हो युवराज खटकलं तर मलासुद्धा आहेच, आणि असही नाही की हे या ठिकाणी अनेक पिढ्यांपासून रहात आहेत. कदाचित फक्त तिसरी पिढी असावी हि. "

दोघेही काही क्षणासाठी विचारात गढून गेले, श्रवण तर एकटक पूर्ण कुटीलाच न्याहाळत होता. आणि अचानक त्याचे डोळे चमकले

"सेनापती!!!!"

" काय झालं युवराज?"

"मला वाटत कि हे लोक वास्तुविशारद मध्ये खूपच पुढे असावेत"

"म्हणजे?"

"म्हणजे बघा ना या कुटीमध्ये एक लाकडी भिंत बनवण्याची काय गरज, आणि वरून एकाच भिंतीवर इतक्या खुंट्या?इंच भर जागा सुद्धा कसोशीने वापरणारे हे लोक कुठलीही गोष्ट उगाच नाही बांधणार ना"

सेनापतींना कदाचित श्रवण च्या बोलण्याचा रुख कळला असावा, ते लगेच समोर असणाऱ्या भिंतीकडे गेले, त्यांनी त्या भिंतीला कान लावला, आणि काहीच क्षणात त्यांचे डोळे चकाकले

"युवराज, एक पोकळी जाणवत आहे"

त्या दोघांनी एकवार खुंटीनकडे बघितलं आणि त्या उपसण्याचा प्रयत्न केला, पण असा भलताच प्रयत्न करताच ती भिंत सुद्धा त्याच दिशेने हलायला लागली..

सेनापतींनी एकदा श्रवण कडे बघितलं,

"युवराज, मला वाटत या खुंट्या भिंत हलवण्यासाठीच बनवल्या गेल्या आहेत, मला वाटत आपण याना वर उचलून बघावं"

"ठीक आहे"

आणि असं म्हणताच दोघांनी ती भिंत वर उचलली, आणि ती उचलताच त्यांना समोर जे दिसलं ते बघून दोघेही चकित झाले

त्यामागे होतं एक अर्ध वर्तुळाकार कोरलेलं अजून एक खोड. त्या खोडाच्या पायथ्याशी भुसा भरलेला होता, सेनापतींनी तो बाजूला करताच त्यांना खाली जाणाऱ्या काही पायऱ्या दिसल्या.

"युवराज!! हा बघा आश्चर्याचा अजून एक धक्का"

पायऱ्या बघताच दोघेही आतमधे शिरले... खाली किर्रर्र अंधार दिसत होता...

दोघांनीही अंधाराची पर्वा न करता आतमधे प्रवेश केला.

कालच्या पावसामुळे पायऱ्या ओलसर होत्या. एकमेकांना सहारा देत हळूहळू ते खाली उतरू लागले. तीस चाळीस पायऱ्या उतरल्या नंतर आता सपाट भाग लागला होता... जवळ जवळ घुडग्या पर्यंत पावसाचं पाणी सर्वत्र साचलं होतं, किंबहुना ते त्या गुहेचा भिंतींमधून ओघळत सुद्धा होतं.

दोघेही सरळ पुढे चालतच राहिले. पुढे एक उजवीकडे वळण आलं, आणि जस ते वळण पार केलं तस त्यांना एक अजस्त्र पोकळी दिसली, थोड्याफार प्रकाशात

असं वाटत होतं जणू कुणा राजवाड्याचं सभागृहच असावं ते.

ती पोकळी दिसताच दोघहि मध्ये शिरले, आणि अहो आश्चर्यम, आतापर्यंत घुडग्या पर्यंत असणार पाणी नकळत कुठेतरी गुडूप झालं होतं, बाहेरून पूर्णपणे अंधारात दिसणार ते  विशाल काय सभागृह आता पूर्णतः प्रकाशाने लखलखत होतं

तो नजर बघताच श्रवनचे डोळे दिपून गेले होते,

त्याने एकवार सेनापतींकडे नजर फिरवली आणि तो एकच वाक्य बोलला

"सेनापतिजी हे कार्य दिसत तेव्हढं सोपं नाही!!!!"

..............

***पाताळ***

श्रवण ने सेनापती कडे बघितलं आणि तो फक्त एकच वाक्य बोलला,

"सेनापतिजी, हे कार्य दिसत तेव्हढं सोपं नाहीये"

श्रवण आणि सेनापती पूर्णतः अचम्बित झाले होते. हे असलं काही आपल्याला बघायला मिळेल याचा कधी त्यांनी विचारही केला नसेल... आता प्रश्न हा होता की इथे काही पुरावे मिळतात का ते बघायचं होतं...

त्यांनी त्या सभागृहात नजर फिरवली, असं वाटत होतं की ते सभागृह सध्या तरी वापरात नव्हतं, पण पूर्ण सभागृहाचे लक्ख प्रकाश दिसत होता पण तिथे एकही मशाल किंवा किंवा दिवा तेवत नव्हता

"युवराज, आश्चर्याने भरलेलं हे दालन दिसत आहे, एकही मशाल नाही तरी जितका बाहेर दिसत आहे तितकाच प्रकाश या चाहुबाजूनी कसा?"

"हो सेनापतिजी, आश्चर्य तर आहेच, पण खरंच हे आदिवासी असं दालन तयार करू शकतात!"

"ते तर शक्य नाहीये, असं काही तर पूर्ण आर्यवर्तात नसेल"

"कदाचित आपण कुठल्या जाळ्यात तर नाही ना अडकलो, किंवा या आदिवासींची त्यामागील काही योजना??"

"तस काही असत तर त्यांनी आपल्याला जिवन्त सोडलं नसतं, मला वाटत आपण सध्या तरी इथे काही पुरावे मिळतात का याचा शोध घेतला पाहिजेल"

आणि त्यांनी लागलीच शोधाशोध सुरु केली,

पूर्ण सभागृहात समोर एक व्यासपीठ दिसत होतं, समोर जवळ जवळ शेकडोंनी आसन व्यवस्था केलेली दिसत होती.

"युवराज!!"

"काय झालं?"

"ते बघा, तिथून एक मार्ग नजरेत पडतोय, मला वाटत आपण त्याचा मागोवा घ्यावा", व्यासपीठाच्या जवळूनच एक मार्ग कुठंतरी जात होता, त्या दिशेने सभापतींनी रोख केला होता.

दोघेही तिथे गेले, आता या मार्गावर पुन्हा प्रकाश मंद झाला होता, दोघेही सावध रित्या चालत होते, जरा वेळ आतमधे चालल्या नंतर त्यांना त्या मार्गाच्या दोन्ही बाजूला काही कक्ष दिसू लागले,

छोटेखानी कक्ष होते ते, एक व्यक्ती आरामात जीवन व्यथित करेल एव्हढी जागा आतमधे होती. असं वाटत होतं की पूर्ण मार्ग हा या कक्षांनी भरलेला असावा.

"सेनापती, कदाचित हे यापैकीच एखादा कक्ष पंतांचा असेल?"

"यांची ठेवणं बघून तरी हे कक्ष राहण्यासाठी वापरत असावे असच वाटत आहे, पण यापैकी त्यांचा कक्ष कुठला असेल?"

"त्याचाच शोध घ्यावा लागेल असे वाटतंय, या कक्षांची अवस्था बघून वाटतंय कि इथे कित्येक वर्षे कुणी आलं नसावं, जो कक्ष चांगल्या अवस्थेत असेल तो त्यांचा असं समजण बरोबर ठरेल"

झालं तर मग, दोघांनीही एकूण एक कक्षात जाऊन शोधाशोध सुरु केली... बऱ्याच ठिकाणी धूळ, कचरा साठला होता, काही ठिकाणी कोळ्यांनी तर इतकी जाड जाळी तयार केली होती की आतमधे जाणही शक्य नव्हतं. शेवटी बरच सापडल्यानंतर त्यांना एक कक्ष सापडला, जो बऱ्यापैकी साफ वाटत होता. त्या कक्षात एका बाजूला खूप मोठमोठे ग्रंथांचे ढीग दिसत होते, आणि विशेष म्हणजे त्या ठिकाणी बऱ्यापैकी प्रकाश सुद्धा येत होता.

"हुश्श, युवराज चला शेवटी गोविंद पंतांचा कक्ष सापडलाच"

"इथलची परिस्थिती बघून असं वाटतंय कि इथे काहीतरी रहस्यमयी असावं, म्हणजे बघा ना अशा पर्वतात, जिथे प्रवास करून येन म्हणजे सुद्धा

महाकठीण, अशा ठिकाणी एव्हढी भव्य वास्तू आणि ते सुद्धा जमिनीच्या खाली, खूपच अचम्बित करणार आहे हे सगळं, नाही का!"

"बरोबर ओळखलं युवराज आणि सेनापतिजी"

अचानकच मागून एक करारी आवाज आला, ते ऐकून काही क्षणासाठी तर श्रवण आणि सेनापती स्तब्धच झाले.

मागे वळून बघितलं तर एक मनुष्य आकृती नजरेत पडली, सूर्यप्रकाशाच्या एकदमच विरुद्ध दिशेला असल्याने चेहरा तर काही व्यवस्थित दिसला नाही, पण कुणीतरी वृद्ध व्यक्ती आहे असं जाणवलं,

तो व्यक्ती जवळ येत आहे असं दिसताच दोघांनीही आपापल्या तलवारी बाहेर काढल्या,

"कोण .... कोण आहात तुम्ही?आणि आमचा पाठलाग का करताय?, एक पाऊल जरी पुढे आला तर आयुष्याला मुकशील"

"घाबरू नये युवराज, मी श्रीपाद, मला या ठिकाणचे लोक गुरुदेव सुद्धा म्हणतात, आपली भेट आधीच झाली आहे जेव्हा विरसेन ने तुम्हाला कैद केले होते, "

"गुरुदेव"

"आता ओळखलं वाटतं, "

"पण तुम्ही इथे कसे?"

माझी पण कुटी याच प्रदेशात आहे जीच्यातून एक मार्ग या भवनात उघडतो, तुम्हाला काय वाटलं फक्त गोविंद पंतच इथे येऊ शकतात"

"नाही गुरुदेव, तस नाही, पण इथे तुम्हाला बघणं अपेक्षित नव्हतं"

"असो, पण तुम्हाला तुमचं लक्ष तरी व्यवस्थित गाठता आलं हे चांगलं झालंय"

"गुरुदेव, हि जागा नेमकी आहे काय?आणि या पर्वतात कुणी बांधलं आहे हे?"

"हे प्रश्न अपेक्षितच होते मला, चला आपण एकदा या कक्षात बसून बोलूयात, तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरं देतो मी"

आणि असं म्हणून ते तिघेही त्या कक्षात गेले, 3 जण आरामात पुरतील एव्हढी जागा तर नक्कीच होती तिथे, शिवाय बाहेरच्या वातावरणापेक्षा उबदार सुद्धा होतं ते, सूर्यप्रकाश तर तसा तिथे येतच होता पण तरीही बाजूलाच असलेली मशाल तेवून गुरुदेवांनी बोलायला सुरुवात केली,

"मी तुम्हाला सर्व सांगतो परंतु तुम्हाला मला एक वचन द्यावं लागेल की मी जे तुम्हाला सांगेन ते इतर कुणालाही कळत काम नये, मान्य आहे?"

एकदा श्रवण ने सेनापतींकडे बघितलं आणि मग बोलला,

"हो, विश्वास ठेवा माझ्यावर, आपल्यात झालेलं सम्भाषण कुणालाच कळणार नाही"

"हा तर तुमचा प्रश्न हा आहे की या दुर्गम भागात अशी वास्तू कशी? याची पाळेमुळे भूतकाळात आहेत

खरतर हा पर्वत म्हणजे प्राचीन काळातील एक भव्य असं  गुरुकुल, इथे अनेक विद्वान ऋषि, वेदाचार्य आणि विशेषतः आयुर्वेदाचार्य घडले गेले आहेत. ' . अनेक व्याधींवर उपचार या ठिकाणी शोधले गेले, भूतकाळात हा पर्वत खूप प्रसिद्ध होता परंतु याची दिशा मात्र कुणालाच माहित नव्हती. इथे येण्याचे मार्ग सुद्धा माहित नव्हते, इथं येऊन आयुर्वेद शिकण्यासाठी प्रथम अदम्य साहस दाखवून सम्पूर्ण दंडकारन्य पार करावं

लागायचं, आणि मग इथे येऊन सर्वच प्रकारचं ज्ञानार्जन चालायचं

अनेक विषयांवर इथे अभ्यास केला जायचा, असंख्य ग्रन्थ इथे लिहिली गेली, कित्येक विषयांवर वादविवाद घडायचे, इथे येणार प्रत्येक शिष्य हा महर्षी म्हणून इथून बाहेर पडायचा, इथलच्या अनेक शिष्यानी इतर देशांमध्ये जाऊन तिथे गुरुकुल सूरी केले, इतकं महान असं हे विश्व गुरुकुल होतं.

त्याच काळी या ठिकाणी जमिनीच्या खाली एक भव्य सभागृह बांधलं गेलं जिथे सर्व जण ज्ञान अर्जित करायचे. त्याच सोबत शेकडो शिष्य मावतील अशी कक्ष सुद्धा उभारली गेली.. पण ही जमिनीच्या खाली बांधली गेली याच कारण म्हणजे इथे पावसाळ्यात पडणारा भयानक पाऊस, सोबत त्या काळात अनेक श्वापद

दिवस ढवळ्या वावरायचे, त्यांपासून रक्षण व्हावं हा त्या मागचा हेतू होता"

"असं आहे तर, मग आतासुद्धा इथे ते का होतं नाही??"

"आता!!! अहो शेकडो वर्षांपूर्वी हि जागा निर्मनुष्य झालीये, त्याचं कारण नाही माहित, पण अनेक पिढ्यांपासून आमचे पूर्वज इथे कालीमातेची पूजा करतात मी, गोविंद पंत सुद्धा एकाच कुळातले, भलेही आम्ही सख्खे नाही परंतु दुरून आमचं नातं लागतच, आम्ही सर्वच कालीमातेच्या भक्त, त्यामुळे गोविंद मलुक मधून तीन महिने इथे यायचे, त्यांनी इथे लुप्त असलेलं सर्व ज्ञान पुन्हा बाहेर काढण्यासाठी पूर्ण आयुष्य वेचल, त्यांना पुन्हा असच एक गुरुकुल सुरु करायचं होतं पण दुर्दैवाने त्या आधीच काळाने आपला घाला घातला. "

"इतकी भव्य अशी वास्तू, तरी या ठिकाणी इतकी शांतता कशी?कुणीच इथे येत नाही का"

"गोविंद आणि मी सोडलं तर कुणीच नाही, खरंतर आदिवासींना या जागेची माहिती सुद्धा नाहीये"

"काय?हे कसं शक्य आहे?ते तर इथे राज्य करतात ना!!"

"हो युवराज, पण आम्हीच त्यांना या प्रदेशात यायला मनाई केली आहे, विशेषतः माझ्या आणि गोविंदपंतांच्या कुटीत येण्यापासून"

"आणि ते का?"

"कारण असं आहे मला वाटत कि जे काही असामान्य ज्ञान या जागेत लपलेलं आहे ते कुणाही असक्षम व्यक्तीच्या हातात पडू नये"

"म्हणजे?"

"म्हणजे इथे जे काही शोध लागले, जे काही ज्ञान विद्वानांनी भूतकाळात प्राप्त केले ते कोणत्या ना कोणत्या पद्धतीने इथेच लपवलेलं आहे, त्याचंच संशोधन आमचे गुरु करत होते, गोविंदपंत करत होते आणि आता मी सुद्धा तेच करत आहे,

उदाहरण द्यायचं झालं ना तर या सभागृहात भिंतीवर तुम्ही बघू शकतात कि काहीतरी लिहून ठेवलंय"

ते ऐकताच श्रवण आणि सेनापती यांनी भिंतीकडे बघितलं, तर खरंच तिथे काहीतरी कोरून ठेवलेलं होतं,

"हा प्रकार तुम्ही पूर्ण वस्तूच्या प्रत्येक भिंतीवर बघू शकतात, आणि हे जे काही लिहिलेलं आहे त्याचा सरळ सम्बन्ध आहे वास्तुशास्त्राशी, म्हणजेच वास्तुविशारद कोरून ठेवलं गेलं आहे, ते माझ्या गुरूंनी एकत्र करून त्यावर एक ग्रन्थ लिहिला, आणि तोच ग्रन्थ आदिवासींना दिला आणि त्या बदल्यात असा करार झाला की ते या प्रदेशात येऊ शकणार नाही., त्यामुळेच तुम्ही इथं अनेक वास्तूंचे विचित्र पण अद्भुत प्रकार बघू शकतात जेणेकरून आदिवासी सुद्धा खुश राहिले आणि आम्हाला आमचं काम बिनविरोध करता येत"

"याचा अर्थ गोविंद पंत इथे ज्ञानार्जन करण्यासाठी येत असत?"

"हो तसही म्हणू शकतात, तुम्ही या कक्षात त्यांनी लिहिलेले ग्रन्थ सुद्धा बघू शकतात"

त्या कक्षात अनेक ग्रंथांचे ढीग लागलेलं होते, त्यातला एक ग्रन्थ श्रवण ने हातात उचलून बघितला, त्याच्या प्रथम पानावर कुठल्यातरी वृक्षाच चित्र रेखाटलेल होतं,

"हा ग्रन्थ कदाचित वनस्पती शास्त्रावर लिहिलेला दिसत आहे!"

"हो बरोबर ओळखलं"

"याचा अर्थ कि वनस्पती शास्त्र बद्दल या भिंतींवर कोरलेलं आहे आणि ती माहिती पंतांनी या ग्रंथात उतरवली तर!!"

"नाही युवराज, भिंतींवर कोरलेली माहिती हि वास्तुकलेशी सम्बंधित कारण भिंत हि वास्तूचाच एक भाग, जर का वनस्पती शास्त्राची माहिती घ्यायची तर सम्पूर्ण पर्वतात फिरावं लागलं असेल त्यांना, तुम्हाला येताना कदाचित जाणवलं सुद्धा असेल की पर्वताच्या विविध भागांत विशिष्ट पद्धतीचीच झाड आहेत भलेही मग ते जँगल का असे ना, नाहीतर सामान्यतः वनांमध्ये कुठलीही झाडे कुठेही येऊ शकतात पण इथे तस नाही... पण ते कस शक्य आहे याच उत्तर तर सध्या परमेश्वरच देऊ शकतो"

"आता लक्षात येत आहे, म्हणजे ज्ञानाचा खजिना इथे उपलब्ध पण तो मिळवणं म्हणजे खरी मेहनत, ज्याप्रमाणे या वास्तू मधे प्रकाश कसा येतो याचा जर का कुणी अभ्यास केला तर तो सुद्धा भौतिक शास्त्रात पारंगत होऊ शकतो"

"एकदम बरोबर... मला वाटत आता तुम्हाला तुमच्या प्रश्नांची उत्तरं मिळाली आहेत, तर मला आता परवानगी द्या मी माझ्या उर्वरित कामासाठी जातो"

"पण गुरुदेव, आम्हाला रमण विषयी माहिती कशी मिळणार?"

"याच उत्तर तुम्ही स्वतःच दिलंय युवराज, इथे ज्ञानाचा खजिना आहे पण तो मिळवायचा कसा हे मात्र तुम्हाला शोधावं लागेल, पण तुम्ही एकदा इथलचं ग्रन्थ धुंडाळून बघा, कदाचित गोविंद पंतांनी कुठेतरी त्याचा उल्लेख नक्कीच केला असावा"

आणि असं म्हणून ते निघून गेले.

"युवराज मला वाटत आपण लगेचच हे सर्व ग्रंथ चाळायला सुरुवात करूया, चालेल ना?"

"हो सेनापतिजी"

आणि ते दोघेही कामाला लागले, जवळ जवळ एक माणूस उंचीचे तीन चार ग्रँथाचे घड होते, त्याने हळूहळू एकेक बघायला सुरुवात केली... आयुर्वेद, भौतिकशास्त्र, पदार्थविज्ञान, खगोलशास्त्र इत्यादी विषयांवर लिहिलेले विविध प्रकारचे ग्रन्थ तिथे होते... कुणी स्वप्नातही कल्पना नसेल केली की एका मंदिराची निगा राखणारे एक सामान्य पुजारी इतके ज्ञानी असतील. जवळ जवळ एक प्रहर त्यांना ते ग्रन्थ चाळण्यात निघून गेला.

"युवराज मला तरी आतापर्यंत रमण विषयी काही माहिती मिळेल असा एकही ग्रन्थ मिळाला नाहीये, तुम्हाला काही सापडलं?"

"नाही सेनापतिजी, अजून तरी नाही"

"मला वाटत बराच वेळ झाला आहे, आता आपण इथून निघावं, वाटल्यास उद्या आपण पुन्हा येऊया"

"हो ठीक आहे, तसही काहीच वेळात आता सांज होईल, एकदा का बाहेर अंधार झाला तर इथेही लगेचच अंधात होईल"

आणि ते दोघेही माघारी वळले, तस इथे आले तर होते पण माघारी जातानाही त्यांची बरीच पंचायत झाली कारण ते दालन होतंच इतकं मोठं, कसातरी मार्ग काढत काढत शेवटी ते गोविंद पंतांच्या कुटीत पोहोचले. त्यांनी लगबगीने ती लाकडी भिंत पुन्हा जशास तशी लावली आणि ते बाहेर आले... माधव म्हणजेच तो सेवक दूर एका झाडाखाली विश्रांती घेताना त्यांना दिसला...

त्यांनी आजूबाजूला नजर टाकली तर संध्याकाळ तर जवळ जवळ झालीच होती... आभाळ आताही दाटून आलेलं होतं, कधीही जोरदार पाऊस कोसळेल अशी चिन्ह होती. ते वेगाने माधव कडे गेले आणि त्याला उठवलं,

"अरे माधव, चल आता सांज झाली आहे आपण पुन्हा महालाकडे निघालं पाहिजे"

डोळे चोळत माधव उठला,

"महाराज, सेनापतिजी तुम्ही इतक्या वेळ कुटीत काय करत होता"

"अरे काही नाही, तिथे फारच प्रसन्न वाटत होतं, शिवाय गोविंद पंतांची काही ग्रन्थ आम्हाला कुटीत मिळाली ती वाचण्यात आम्ही दन्ग झालो होतो, संध्याकाळ कधी झाली हे कळलंच नाही बघ.. पण आता आपण निघायला हवं नाही का!!"

"हो हो, लगेच निघूयात, नाहीतर तिकडे आमचे महाराज तुमची वाट बघतच असतील"

माधव पुढे पुढे आणि श्रवण आणि सेनापती त्याच्या मागे चालत होते, जवळ जवळ अंधार झालंच होता, आता तर आभाळात वीजा पण कडाडत होत्या, त्यांनी तो छोटासा कडा पार केला आणि त्यांना तो पार करत असताना त्यांना एक दुसरी पर्वतरांग नजरेत पडली.

"माधव, हि समोरची पर्वतरांग कुठली?"

"युवराज, याला मृगपर्वत म्हणतात"

मृगपर्वत ऐकताच श्रवनला काहीतरी आठवलं

"सेनापतिजी, शशिकान्त पंत सुद्धा याच पर्वता जवळ राहायचे ना?"

"हो युवराज, कुठल्या तरी सरोवराजवळ ते वास करायचे, आणि एका शिवलिंगाचे ते पुजारी होते"

सरोवर असं ऐकताच माधव बोलला,

"तुम्ही मृग सरोवरबद्दल बोलत आहेत का जिथे शिवलिंग आहे?"

"बरोबर ओळ्खलस"

"युवराज, ते शिवलिंग असं तस नाहीये, असं म्हणतात साक्षात महादेवचं आकाशातून तिथे एका

विशाल काय दगडाच्या रुपात कोसळले, याच विशाल काय दगडामुळे तिथे एक सरोवर तयार झालं आणि त्याच दगडाचा एक भाग तुटला आणि त्याला शिवलिंगाच रूप प्राप्त झाल, त्याची पूजा करणं कुना महान ऋषीलाच  शक्य आहे, आणि अशा ऋषींची छाया लाभण म्हणजे साक्षात इशवराची छत्रछाया असण्या सारखंच आहे"

माधव चे ते बोलणं ऐकून श्रवण च्या डोळ्यानं समोर शशिकांत पंतांची छाया आली, त्यांनी त्याला केलेला उपदेश आठवला, त्यांनीच तर त्याला या पर्वतावर पाठवलं जेणेकरून त्याला पुढचा मार्ग मिळेल,

त्यांनी अल्हाद डोळे बंद केले, त्यांचं स्मरण केलं आणि मनोमन प्रार्थना केली,

"पंत, पुढचा मार्ग दाखवा"

..............

कशीतरी वाट काढत काढत शेवटी ते महाला पर्यंत पोहोचलेच. विरसेन कदाचित त्यांचीच वाट बघत बसला असावा... ते महालात आले, विरसेन सोबत काही चर्चा झाल्या, त्यानंतर रात्रीच जेवण उरकलं आणि सर्व जण शयनगृहात परतले. आज श्रवण आणि सेनापती यांची राहण्याची व्यवस्था महालाच्या तिसऱ्या मजल्यावर आणि कालपेक्षा विरुद्ध दिशेला केली गेली होती. हि जागा कालपेक्षा जरा प्रशस्थ आणि उबदार वाटत होती... बघता बघता रात्र झाली, बाहेर काल सारखाच जोरदार पाऊस कोसळत होता, हवेत खूप गारठा जाणवत होता, अशा परिस्थितीतही श्रवण सज्जावर येऊन बाहेरचा आसमंत न्याहाळत होता,

"युवराज, काय न्याहाळत आहात, मला वाटत आता तुम्ही झोपून घ्यावं"

"डोक्यात चाललेले विचार इतक्या सहज पद्धतीने झोपू नाही देणार, मला वाटलं होतं एकदा का इथे आलो की आपल्याला पुढचा रस्ता लगेच कळेल पण तसं काहीच नाहीये. अजून किती दिवस आपल्याला उत्तर सापडण्यात लागतील देव जाणे"

"चिंता नका करू, त्या परमेश्वराला काळजी असतेच. ज्या प्रमाणे त्याने इथे आणलं आहे त्याच पद्धतीने पुढचा रस्ता पण तो दाखवेलच. "

असं बोलत असताना तेव्हढ्यातच एक वीज दूरवर कडाडली. आत्तापर्यंत पडलेला दाट काळोख चिरत पुढचं दृश्य स्पष्ट दिसत होतं... त्याच दृश्यात त्यांना एका नदीचं पात्र दिसलं

"सेनापतिजी हि आपली श्रावणी नदी का?"

"नाही युवराज, आपण सध्या पर्वताच्या विरुद्ध दिशेला आहोत, हि आहे कृष्णा नदी, या प्रदेशातील सर्वात मोठी नदी, पुढे जाऊन हीच पात्र तर गोदावरी नदी इतकंच मोठं आहे. "

"कृष्णा नदी??",

आणि ते नाव ऐकताच चकित झाला, त्याच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह साफ दिसत होतं

"काय झालं युवराज, कृष्णा नदीचं नाव ऐकताच असे गम्भीर का झालात?"

"तर ही आहे ती कृष्णा नदी, चला म्हणजे अजून एक रहस्य उलगडलं, अजून किती रहस्य समोर येणार आहेत काय माहित!"

"रहस्य??"

"हो अजून एक रहस्य उलगडलय, खरंतर आता रहस्यांना थकलो आहे मी"

" इतक्यात कंटाळले आहात काय?मला वाटत अजून आपल्या समोर बरच काही उलगडायचं बाकी आहे"

"कंटाळलो तर नाही, पण व्यथित झालोय, म्हणजे बघा ना प्रत्येक रहस्य उलगडायच्या आधीच एक वेगळं रहस्य कळतंय. प्रश्न पडलाय पण उत्तर कशासच मिळत नाहीये. आज त्या प्रशस्त वास्तूच रहस्य कळालं

पण ते आतापर्यंत या आदिवासींपासून लपून कस राहीलं याचा काही पत्ता लागला नाही"

"युवराज या असल्या जमाती फार देवभोळ्या असतात, एकवेळ ते मरणाला घाबरणार नाही पण देवीच्या प्रकोपाला घाबरतात, असाच देवीच्या एखाद्या प्रकोपाची भीती दाखवत त्यांना दूर ठेवल असणार, मला तर वाटत सामान्य लोक तर तिथे येण्यास सुद्धा घाबरत असावे, आठवत का सकाळी विरसेन जसा त्या ठिकाणाहून निघाला तस आलेली सगळी मंडळी काहीच क्षणात गायब झाली. "

"तुमच्या बोलण्यात तथ्य वाटतय खरं, पण मला हा सुद्धा प्रश्न पडलाय, ठीक आहे बघू पुढे काय होतं ते"...

दुसऱ्या दिवशीही पहाट उजाडली, वातावरण तसंच होतं, सर्वदूर इतकी धुकं पसरली होती की हातभार दुरीवरचा व्यक्ती सुद्धा दिसणं कठीण. श्रवण ने प्रातःविधी आटोपले आणि बाहेरचे धुके जसे ओसरले त्याच क्षणी दोघांनीही महाल सोडला. सोबत माधव येत होता.

"माधव आज तू नाही आलास तरी चालेल, तसही आम्हाला आता वाट कळलेली आहेच"

तसा माधव फारच आळशी होता, काम करण्यापेक्षा झोपणं त्याला कधीही चांगलं वाटायचं, आणि या वेळी तर समोरून संधी चालून आली होती आणि त्याने लगेचच होकार दिला.

"महाराज तुमचा शब्द मी कसा डावलनार, पण जर का विरसेन महाराजांनी विचारलं तर कृपया मी तुमच्या सोबत होतो असंच सांगा, धन्यवाद"

श्रवण ने एक स्मित हास्य केलं आणि त्यांनतर दोघेही निघून गोविंद पंतांच्या कुटीकडे निघाले... मध्ये कालीमातेच्या मंदिरात त्यांनी डोकं टेकावल, आज काल सारखा खास दिवस नसल्याने गर्दी नव्हती... हो पण तिथे पुजारी म्हणून गुरुदेव बसलेलं होते.. श्रवण ने त्यांचा सुद्धा आशीर्वाद घेतला, तेव्हढ्यात ते काहीतरी पुतपुटले

"धैर्य ठेवा, प्रत्येक गोष्टीचा एक वेळ असतो"

श्रवनने मान डोलावली आणि तो कुटीकडे निघाला.

जाताना मात्र आजूबाजूचा प्रदेश न्याहाळत होता. तो पर्वत खरंच फार सुंदर होता, आता थोडंफार उनही पडलं असल्याने त्याचं सौंदर्य अजूनच खुलल होतं... आजूबाजूला असणाऱ्या डोंगररांगा सुद्धा फार सुंदर दिसत होत्या, ठिकठिकाणाहून धबधबे वाहत होते,

श्रवनने एकदा सर्वदूर नजर भिरकावली तेव्हढ्यात पुन्हा मुंग पर्वत नजरेत पडलं, एकदमच सुल्यासारखा त्याचा आकार होता... त्या डोंगररांगेत तो एकटाच शोभून दिसत होता, श्रवण त्याला न्यहाळात असतानाच ते सरोवर सुद्धा त्याच्या नजरेत पडलं

त्याने पुन्हा एकदा मनोमन प्रार्थना केली, किमान आज तरी काही यश मिळावं.

..............

(तिकडे श्रवण रमण ला थांबवण्याचा नेमका मार्ग सापडत होता, आणि इथे मलुक मध्ये मात्र अराजकता माजली होती, त्या रात्री जे घडलं होतं, त्यामुळे पूर्ण नगरात भीतीच वातावरण होतं, अशावेळी श्रवण ने लोकांना आधार देण गरजेचं पण परिस्थिती अशी ओढावली होती की त्याला मलुक सोडणं भाग

होतं. या परिस्थिती मधे आता सामंत आणि सतीची जबाबदारी होती की मलुक मध्ये शांतता प्रस्थापित केली जावी. )

मलुक नगरात महालामध्ये सभागृह पूर्णतः भरलेला होता, समोर सती बसलेली होती, तिच्याच उजव्या बाजूला सामंत सुद्धा होते. जमलेल्या लोकांमधे कुजबुज चालू होती, दोन दिवसांपूर्वी जे काही शहरात झालं त्यामुळे सगळ्यांनाच एक मोठा धक्का बसला होता.

तेव्हढ्यात सामंत हळू आवाजात सतीला म्हणाले,

"युवराज्ञी, मला वाटत आज तुम्ही हि सभा बोलवायला नको होती, बघा ना सगळेच लोक आधीच त्या प्रसंगामुळे तणावात आहेत, त्या दैत्य रमण ने जे

काही केलं आहे त्यामुळे कित्येक घर अजूनही शोकाकुल आहेत. आता याना आपण उत्तर काय देणार?सगळे जण आपल्याकडे आशा लावून बसलेले आहेत"

"सामंत, मला वाटत त्यांच्यासोबत जे काही झालं आहे ते सर्व त्यांना सांगावं"

"काय!!युवराज्ञी असं जर का तुम्ही केलं तर शहरात अराजकता माजेल"

"बरोबर आहे सामंत तुमचं, पण मला वाटत प्रत्येक व्यक्तीच्या हा अधिकार आहे की त्यांच्यासोबत जे काही होतं आहे त्याचं कारण त्यांना कळलंच पाहिजे"

"अहो पण अशाने ते उलट राजघराण्याच्या विरोधात उभे होतील, कारण त्या मंदिरातील घटना हि आपल्याला आधीच कळली होती मग त्यावर उपाय का नाही केला याचा जाब मागतील ते, हि घटना संपूर्ण दंडकारण्यात वनव्या सारखी पसरेल, राज्यातले राजघराण्याची निंदा करणारे बंड करतील, आणि जर का असं झालंच तर आपल्या बाहेरील शत्रूंना तर आयती शिकार मिळेल, जे राज्य आतूनच पोखरल गेलं असतंय त्याला बाहेरून खिंडार पडायला वेळ लागत नाही युवराज्ञी, म्हणून तुम्ही जे काही बोलाल या सर्वांचा विचार करून बोला, तुमची एक चूक पूर्ण दण्डकारण्यावर भारी पडेल शिवाय रमण ला कैद करणंही दूरच राहून जाईल"

सामंतानी स्वतःची बाजू मांडली होती, आणि त्यांच्या जागेवर ते बरोबर सुद्धा होते. सती अजूनही

तेव्हढीच स्थिर वाटत होती, कदाचित तिने या सर्व गोष्टींचा विचार आधीच केला असावा.

"मला सांगा सामंत हे  जे लोक जमले आहेत ते मलुक मध्ये कधीपासून राहतात हो?"

"युवराज्ञी हे सर्व पिढयनपिढ्या इथे राहनारे आहेत"

"धन्यवाद सामंत!!, तुम्हाला एक सांगू का?"

"बोला युवराज्ञी"

"मला तुमच्यापेक्षा राजनीती चा फार कमी अनुभव आहे, राजगादीचे डावपेच मला कधी माहित नाहीये, पण मला एक गोष्ट माहित आहे, 'ज्या गोष्टीवर

कुठल्याही मनुष्याच प्रेम असत त्या ठिकाणी जर का तुम्ही स्वाभिमान जागवला ना तर तो मनुष्य कुठल्याही समस्येचा समुद्र तरून जाऊ शकतो"

"म्हणजे मला समजलं नाही!!"

सती ने एक तीक्ष्ण नजर सामंतांकडे टाकली आणि उठून उभा राहत बोलायला सुरुवात केली

सती उभी राहताच संपूर्ण सभागृहातएकच शांतता पसरली. तिने सगळीकडे नजर फिरवली,

"परवा रात्री जे काही झालं ते खूप दुर्दैवी होतं, मलुक वासियानो माहित आहे आपण सध्या फारच कठीण काळातून जात आहात, पण विश्वास ठेवा काहीच दिवसात सगळं व्यवस्थित होईल..,

सती बोलत असतानाच अचानक तीच बोलणं काटत एक स्त्री ओरडायला लागली,

"पण माझी मुलगी दगावलीये, एव्हढीशी होती ती, कोणाची बाधा झालीये माहित नाही, सगळे जण म्हणताय त्या मंदिरात एक राक्षस राहतो आणि आता तो मुक्त झालाय, त्यांनीच मारलं आहे माझ्या पोरीला", आणि असं बोलून तिने टाहो फोडला.

आतापर्यंत कुणीच हि गोष्ट उघडपणे बोलत नव्हतं, पण त्या स्त्री ने ते बंधन तोडलं, अचानक सगळीकडे कुजबुज सुरु झाली, हळूहळू जमलेल्या समुदायातील लोकांचा आवाज वाढू लागला, त्यातलाच एक व्यक्ती सामंताना उद्देशून बोलला,

"सामंत, हे खरं आहे का?त्या मंदिरातला राक्षस मुक्त झालाय?"

सामंताना आता घाम फुटला होता, उत्तर काय द्यावं हे कळत नव्हतं,

सामंत काही बोलत नाही हे बघून शेवटी सतीच बोलली

"हो, हे खरय, त्या मंदिरात जी काही दैत्य शक्ती आहे ती मुक्त झालीये"

"आता कळलं, साक्षात युवराज आणि युवराज्ञी मलुक ला का आलेत!!पण हे आम्हाला कळवलं का गेलं नाही, का आम्हाला बळीचा बकरा बनवलं गेलं, तुमच्या चुकीमुळे अजून किती दिवस आम्ही बलिदान देणार आहोत?"

तेव्हढ्यात दुसरा व्यक्ती ओरडला,

"मलुक वासियानो, आता या ठिकाणी आपल्या जीवाची काही खात्री नाही, लवकरात लवकर गाव सोडा, इथे राहून आपल्या राशीत एकच गोष्ट लिहिली जाईल आणि ती म्हणजे मृत्यू!!"

असं म्हणताच सभागृहात खळबळ माजली, आधीच घाबरलेली प्रजा आता क्रोधीत पण झाली, प्रत्येक जण वेगवेगळ्या सुरात प्रश्न विचारू लागला, असं वाटत होतं की बऱ्याच दिवसांपासून साचून राहिलेला राग एकदाच बाहेर निघत होता.

"युवराज्ञी मला वाटत तुम्ही तुमच्या कक्षात जावं, तुमच्या सुरक्षिततेला धोका आहे, मी सैनिकांसह सगळं सम्भाळून घेतो"

"नाही सामंत, मी जर का इथून गेले तर या लोकांनी कुणाकडे बघावं?मान्य आहे ते क्रोधीत झाले आहेत पण त्यांचा क्रोध शांत करण्यापेक्षा इथून निर्गमन करणं मला योग्य वाटत नाही"

"समझुन घ्या राणीसाहेब, यातले सगळेच लोक हे प्रजेचा भाग नाहीये, काही लोक हे इतर राज्यातले हेर सुद्धा असू शकतात जे प्रजेला तुमच्या विरोधात भडकावत आहेत, ते तुम्हाला इजा करण्यात सुद्धा मागेपुढे बघणार नाहीत आणि सम्पूर्ण दण्डकारण्याच्या भावी महाराणी सोबत असं मी होऊ देणार नाही, म्हणून तुम्ही लगेच निघून जा, आणि हि माझी विनंती नसून आज्ञा आहे असं समझा"

सामंतांच बोलणं ऐकून सती अचानक भानावर आली, तिला कळून चुकलं की आपल्या बोलण्याने

परिस्थिती अजूनच खराब झालीये. तेव्हढ्यात सामंतांच्या आज्ञेवरून दोन सैनिक आले आणि ते सती ला घेऊन जाऊ लागले.

अचानक गर्दीतुन आवाज आला,

"युवराज्ञी तुम्ही असं सुटू शकत नाही", "हे सगळं राजघराण्यामुळे झालंय, याची शिक्षा त्यांनाही झालीच पाहिजे", "त्यांना पकडा, आज आपल्या प्रश्नांची उत्तरं द्यावीच लागतील याना"

गर्दीतला तो आवाज ऐकून सामंत सावध झाले, त्यांनी त्यांची तलवार बाहेर काढली आणि जोरात ओरडले,

"मी आताच जमलेल्या प्रजेला आज्ञा देतो कि त्यांनी लगेचच सभागृह सोडावं, आणि जो कुणी सुरक्षा तोडून पुढे येण्याचा प्रयत्न करेल त्याला माझ्या

तलवारीचा स्वाद घ्यावा लागेल. तुम्हाला इजा देण्याचा माझा हेतू नाही पण जर का तुम्ही ऐकत नसाल तर माझ्याकडे दुसरा उपाय नाहीये, "

ती गर्जना ऐकून सगळेच जण शांत झाले, त्यांचा तो अवतार बहुदा प्रजेने पहिल्यांदाच बघितला असावा, कुणीच काहीच बोलत नव्हतं, सती हळूहळू तिथून जात होती, आणि तेव्हढ्यात प्रजेतून एक व्यक्ती ओरडला.

"अरे घाबरलात काय, आपण आज शेकडो आहोत, यांच्या तलवारी आज आपल्याला थांबवू शकत नाही, आज जर का शांत बसलो तर न्याय कधीच मिळणार नाही", आणि असं म्हणत तो पुढे सरसावला

त्याला पुढे येताना बघताच सामंतांनी तलवार काढून सपासप फिरवली, क्षणार्धात त्या व्यक्तीच्या हातावर आणि  पायावर अनेक ठिकाणी वार झाले होते.

पण सामंतांनी खबरदारी घेत एकही जीवघेणा वार केला नव्हता.

सती सह संपूर्ण लोक त्या व्यक्तीकडे बघत होते,

त्या व्यक्तीकडे बघून सतीच्या मनात विचारांचा कल्लोळ सुरु झाला,

'आपण आज जर का सभा बोलावलीच नसती तर हे झालंच नसत, कदाचित आपण सामंतांच ऐकायला हवं होतं, श्रवण पूर्ण राज्याची जबाबदारी आपल्यावर टाकून गेला असताना आपण इतकं निष्काळजी पणे कस वागू शकतो, पण त्याची गरजही आहे,

आपण पूर्ण लहानपण सामदेशा त घालवल, मान्य आहे सामदेशा पेक्षा मलुक वेगळं आहे, पण प्रत्येक जण इथे घाबरलेला, भयभीत, आतापर्यंत मी जो काही काळ या नगरात घालवला त्यावरून एक

कळलंय, या लोकांनी मनोधैर्य गमावलं आहे, कुठल्याही संकटाला सामोरे जाण्यासाठी ना कुठली ताकद लागते ना कुठली हि फौज ना सम्पत्ती, एकच गोष्ट लागते ते म्हणजे मनोधैर्य, आत्मविश्वास... लहान असताना सामदेशावर उत्तरेतून अनेक संकटांचा सामना करावा लागला. पण आम्ही त्यातून आम्ही नेहमीच तरुन गेलो, फक्त तरूनच नाही गेलो तरी यशस्वी झालो. ना आमच्याकडे प्रतिष्ठान सारख्या भक्कम संरक्षक भिंती होत्या ना लाखोंची फौज, ती तर सामान्य कष्टकऱ्यांची भूमी आहे, पण आम्ही जिंकलो याच कारण म्हणजे जे काही संकट उत्तरेतून आमच्या राज्याला धडकायच त्याचा सामना फक्त सैनिकच नाही तर संपूर्ण प्रजा करायची, प्रजेला त्यांच्या परीने जे काही करता येईल ते करायचे, कित्येकदा शत्रू येऊन पूर्णच्या पूर्ण शेत जाळून टाकायचे पण प्रजेने मानसिक धैर्य सोडलं नाही... याचाच अर्थ कुठलही संकट फक्त राजाने सोडवायच नसत तर त्याला सम्पूर्ण राज्याने तोंड द्यायचं असत,

मान्य आहे दोन्ही नगरांत फरक आहे, पण मनुष्य भावना खरंच वेगळ्या असतील का?? आज जर का मी मलुक ला या अमानवी संकटांपासून अनभीद्न्य ठेवलं तर फक्त श्रवण यावर विजय मिळवू शकेल, नाही!!! सती तू जे करत आहे त्यात काहीच चूक नाही, या सर्वांनाच सांगावं लागेल की ते कोणत्या स्थितीत आहेत आणि पूढे अजून काय होणार आहे...

असा विचार करून तितक्यात सती ने मोठ्या आवाजात बोलायला सुरुवात केली

"हो, राजघराण्या मुळे तुम्हाला हे सर्व समजलं नाही, मान्य आहे तुम्ही हे नगर सोडू नये म्हणून आम्ही हे सर्व केलं, पण मला एकच प्रश्न विचारायचा आहे तुम्हाला वाटत का यात आमचा स्वार्थ होता... तुम्हाला माहित नसावं पण युवराज श्रवण याच गोष्टीचा तोडगा

काढायला त्या आदिवासींच्या प्रदेशात गेले आहेत, हो तोच प्रदेश जिथे मलुक चा कुणीही व्यक्ती विना सैन्याचा गेला तर पुन्हा जिवन्त येत नाही तिथेच ते आणि सेनापती गेले आहेत आणि ते फक्त याच गोष्टीच उत्तर शोधायला"

आदिवासींच नाव ऐकताच लोकांमध्ये पुन्हा कुरबुर सुरु झाली, आतापर्यंत आक्रमक झालेले मलुक वासी अचानक स्थिर झाले होते

"तुम्ही या संकटा पासून वाचण्यासाठी गाव सोडायचं म्हणत आहेत, ज्याला जायचं ते जाऊ शकतात. पण खरंच यातून तुमची सुटका आहे का!! आज अशक्त असलेला रमण काही काळाने पुन्हा शक्तिवान बनेल, मग तुम्ही दण्डकारण्य च काय आर्यवर्तात कुठेही गेला तरी तुमचं जीवन सुरक्षित नाहीच.... "

तितक्यात जनतेतून एक व्यक्ती बोलला,

"युवराज्ञी, जर का पूर्ण आर्यवर्तात आम्ही सुरक्षित नसलो तर काय करावं??नेमकं कुठे जावं?"

"मलुक सोडून कुठेही जाण्यापेक्षा एक उपाय आहे, तो म्हणजे तुम्ही मलुक मध्ये राहूनच त्याचा सामना करा"

सामना करा असं बोलताच पूर्ण प्रजा स्तब्ध झाली, सर्वच जण चकित झाले होते

"का काय झालं?मलुक ची प्रजा एव्हढी अशक्त, हे तेच मलुक ना जिथे मारुत राजा होऊन गेला ज्याने

अश्वमेध केला होता, याच भूमी वर उमा राणीने स्वतःच बलिदान देऊन पूर्ण दण्डकारण्य वाचवलं, आणि आज तेच मलुक लढायला तयार नाही??लक्षात ठेवा जी ऊर्जा पळून जाण्याचा व्यर्थ घालाल तीच ऊर्जा त्याच्याशी लढण्यास वापरा, जीवास मुकलो तरी लढताना मरू, ज्यावेळी तुम्ही सर्व सशक्त होऊन लढशाल त्यावेळी रमण सुद्धा  रणभूमी सोडून पळेल. आहात तुम्ही तयार?द्याल माझी साथ?युवराज तिकडे गेले आहेत आणि ते यशस्वी होऊन परततील याची मला खात्री आहे, धैर्य ठेवा विजय आपलंच होईल"

तिच्या त्या छोटेखानी भाषणामुळे एका एकी टाळ्यांचा गडगडाट सुरु झाला, आतापर्यंत शिव्या देणारेच आता कौतुक करू लागले, असं वाटत होतं त्यावेळी एक वेगळीच ऊर्जा तिथे वाहत होती.

सती त्याच व्यासपीठावरून सर्वांवर नजर फिरवत होती, सामंत चकित झाले होते, त्यांच्या मनातील सतीचा आदर अचानक वाढला होता, आणि प्रजा, येताना तर ते सर्वेच भयभीत होऊन आले होते पण जाताना नकळत सतीने एक आत्मविश्वास त्यांच्यात फुंकला होता.

## *कवाड उघडली*

इकडे पर्वतावर सेनापती आणि श्रवण पंतांच्या कुटीत आले होते, त्याने अल्हाद त्या खुंट्या बाजूला केल्या आणि त्यानंतर त्या दालनात प्रवेश केला, काल रात्री पडलेल्या पावसाने आज बराच चिखल झाला होता, त्यात कशीबशी वाट काढत ते हळूहळू सभागृहात पोहोचले, जसा त्या सभागृहात प्रवेश झाला तसा तो पाण्याचा प्रवाह आणि चिखल सर्वच नाहीस झालं... त्या ठिकाणी वातावरण सुद्धा उबदार होतं.

"सेनापतिजी हे दालन म्हणजे खरंच एक आश्चर्य आहे हो, ज्यांनी कुणी हे बनवलं त्यांच्यावर साक्षात ब्रह्मदेवाची कृपा असावी बघा"

"नक्कीच, या ठिकाणी उजेड कसा येतो ते कळत नाहीये, उब कशी निर्माण होते हे हि कळत नाहीये, म्हणजे असं वाटत आहे की जणू आपण वेगळ्या विश्वातच आलोय"

"हो आणि एक परिपूर्ण पण अनभिद्न्य विश्वात, चला आपण पंतांच्या कक्षात जाऊयात, काल बरीच ग्रन्थ धुंडाळायची बाकी होती, आज ते काम पूर्ण करूयात म्हणजे आपलं ध्येय गाठता येईल"

ते दोघेही तडक पंतांच्या कक्षाकडे निघाले, तसा कालचा अनुभव लक्षात घेता त्यांनी जाताना जागोजागी काही निशाण बनवून ठेवले जेणेकरून परत येताना वाट चुकू नये म्हणून. पंतांच्या कक्षात आता बऱ्यापैकी उजेड होता, एका बाजूला ग्रँथाचे ढीग होते जे कि त्यांनी काल तपासले होते आणि दुसऱ्या बाजूला तितकाच मोठा पण न तपासलेला ढीग होता. दोघांनीही कम्बर कसली आणि प्रत्येक ग्रन्थ पडताळण सुरु केलं.

तस हे वाटत तेव्हढं सोपं काम नव्हतं, कारण तो ग्रँथांचा ढीग म्हणजे एक सबंध पानांचा खच होता. त्यात

कुठला कुठे सुरु होईल आणि कुठे सम्पेल हे सांगणं त्यामुळे सोपं नव्हतं, बऱ्यापैकी पान वाचावी लागायची.

आणि रमण विषयी पंतांनी वेगळं काही लिहिलं असावं याची शक्यता पण फार कमी होती, कदाचित त्यांनी त्याबद्दल ची माहिती विविध ग्रँथांत वेगवेगळ्या ठिकाणी लिहिलेली असावी.

पण कदाचित श्रवण फार नशीबवान होता. असाच पानांचा गठ्ठा बाजूला करता करता त्याला अचानकच एक कृष्णवर्णीय पानांचा गठ्ठा हाती लागला.

"सेनापतिजी, हे बघा हे काय आहे, "

"काय झालं युवराज?"

"म्हणजे बघा ना बाकीचे सर्वच कागद पण शुभ्र असताना हा एव्हढाच भाग काळ्या रंगाचा कसा?"

"आतमधे उघडून बघुयात?"

आणि ती पानांचा गठ्ठा हातात घेऊन श्रवनने पहिलं पण उलटलं, आणि पहिलंच पान चमत्कारिक होतं, त्यावर वरच्या बाजूला लाल शाईने किंवा बहुतेक रक्ताने एक शब्द लिहिलेला होता, 'घोरेसू'

युवराज घोरेसू म्हणजे?

"घोरेसू म्हणजे भयावह, असं काहीतरी ज्याला आपण घाबरल पाहिजे"

"काय?आणि अशा अभद्र शब्दावरून पंतांनी ग्रन्थ लिहिला आहे!!"

"हो सेनापतिजी, कदाचित या ग्रँथांत अशाच सर्व गोष्टींचा उल्लेख असावा"

"चला म्हणजे कमीत कमी यामध्ये तरी आपणाला त्या दृष्ट रमण ला मारण्याचा पर्याय मिळेल"

"मलाही असच वाटत आहे सेनापतिजी, पण त्यासाठी हा ग्रन्थ पूर्ण वाचावा लागेल"

श्रवनने सहजच पुढचे पान चाळायला सुरुवात केली, तिथे फारच चित्र विचित्र गोष्टींचा उल्लेख होता, अनेक दैत्यांच्या आकृती काढल्या होत्या.

काहींमध्ये वर्तुळ, चौरस, आणि त्यांमध्ये विविध प्रकारचे अंक होते.

"आपण बरोबर आहोत, हा ग्रन्थ दैत्य शक्तींची माहिती देणाराच आहे, मला वाटत कि यात रमण चा उल्लेख नक्कीच केलेला असावा"

"चला, म्हणजे देवाची कृपा झालीच "

"सेनापतिजी गैरसमज नका करून घेऊ पण मला वाटत कि हा ग्रन्थ मी एकांतात वाचावा, जेणेकरून त्यातील माहिती नीटपणे समझुन घेता येईल"

"ठीक आहे युवराज, तुम्ही इथेच कक्षात थांबा, मी बाहेर जातो, तुम्हाला कसलीही गरज लागल्यास लगेचच आवाज द्या".

आणि असं म्हणून सेनापती बाहेर सभागृहात निघून गेले, आता तिथे फक्त आणि फक्त श्रवनच होता. त्याने एक

दीर्घ श्वास घेतला, आणि तो ग्रन्थ समोर ठेऊन वाचन सुरु केलं.

सुरुवातीला कुना 'त्रिशम्भू' नावाच्या शक्तीची माहिती होती. त्याची ताकद, मानवावर ती करू शकत असलेला प्रभाव आणि शेवटी त्याला आटोक्यात कस ठेवता येईल यासाठीची कार्यपद्धती पण दिलेली होती. साधारण वीस ते पंचवीस पान त्यासाठी लागले होते... त्रिशम्भू सम्पताच मधेच एक अनुक्रमणिका होती.

असं मधेच एखादी अनुक्रमणिका असण म्हणजे जरा विचित्रच होतं, श्रवनने लक्ष देऊन ती अनुक्रमणिका न्याहाळली .

त्याने वरून खालपर्यंत दैत्यांची नाव वाचायला सुरुवात केली, एकूण नऊ दैत्य होते, आणि त्यांच्या नावासमोर काहीतरी उल्लेख होता

त्रिशम्भू  - अहम्, लोभ।

शनका - हवस्, इर्षय्।

त्रिवार - क्रोध, ।

अकाथी - निरुद्योगीन, इर्षय्।

मनस् - लालसा।

जम्बुह - निरुद्योगीन, इर्षय्।

परस्थि - अहम्, क्रोध, ।

अर्थकव - लालसा, अहम्, इर्षय्, ।

कामक - अहम्, इर्षय्, क्रोध, लालसा, हवस्, निरुद्योगीन, श्राप।

श्रवण ने कामक च नाव वाचताच त्याच्या डोळ्यात एक चमक उठली. सध्या त्याचा आनंद मावेनासा झाला होता, कारण इतक्या अथक परिश्रमा नन्तर त्याला शेवटी

कामक बद्दल माहिती मिळणार होती. पण कामक च्या नावासमोर एव्हढं मोठा जो उल्लेख होता त्याचा अर्थ काय?

त्याने पुढे वाचायला सुरुवात केली, त्या ठिकाणी स्पष्ट लिहिलं होतं कोणत्याही दैत्या कडे जाण्यापूर्वी पुढची काही पाने वाचन बंधनकारक आहे!!!

असं वाचताच त्याने पुढची जी काही तीन चार पान आहेत ती वाचायला सुरुवात केली, त्या पानांवर वर उल्लेख केलेल्या प्रत्येक शब्दाच स्पष्टीकरण दिलेलं होतं.

अर्थात ती सगळी शब्द या जगात असणाऱ्या दृष्ट भावना दर्शवित होत्या.

वर दर्शवलेले हे सर्व मानवी स्वभावाच्या दृष्ट भावना होत्या. अशा दृष्ट भावना ज्या नेहमीच कुठल्याही मनुष्याला दुरबल बनवतात, ज्यांच्यावर ताबा मिळवल्या शिवाय मोक्ष हा निव्वळ अशक्य, श्रवण ला त्या शब्दांबद्दल जी काही

माहिती अपेक्षित होती तीच माहिती पहिल्या तीन पानांवर वाचायला मिळाली, अर्थात प्रत्येक वाईट भावना हि रंगवून उदाहरण देत स्पष्ट केली होती पंतांनी, ते सर्व वाचल्यानंतर त्याने चौथ पान उघडलं, त्यात असं लिहिलेलं होतं

'शत शत नमन, मी गोविंद, ऋषी भार्गव आणि गार्गीचा पुत्र, ऋषी मित्रांचा शिष्य। या गिरीवर अध्ययन करण्यासाठी त्रिमास इथे येतो, इथे अनेक शास्त्रांचा अभ्यास करताना या दृढ निसर्गाचा अभिमान वाटतो, पण याच निसर्गात देवाची निंदा करणाऱ्या शक्ती सुद्धा वावरतात, जरी मानवी बुद्धीला आणि तर्काला, विज्ञानाला पटत नसतील तरी त्यांच अस्तित्व आहेच. त्याचा अभ्यास करताना फार मेहनत घ्यावी लागली, जवळ जवळ आयुष्यतली अनेक वर्षे उलटल्यानंतर या नऊ दैत्यांची माहिती कमावता आली आहे, मनुष्य जातीला यातील प्रत्येक दैत्याचा सामना करावा लागला आहे किंबहुना भविष्यात करावा लागेल.

यापैकी त्रिशम्भू चा नाश झाला आहे, बाकी दैत्य भूतकाळात येऊन गेले आहेत आणि पुन्हा भविष्यात येतीलच.

प्रत्येक दैत्यासमोर त्यांना समृद्ध करणाऱ्या भावनांचा उल्लेख आहे. यापैकी कामक हा माझ्यामते सर्व शक्तिवान असावा, कारण तो मनुष्याच्या कामवासनेचा उत्पाद आहे, जी सर्वच अवगुणांनी भरलेली आहे. जनमानसांत असणाऱ्या या भावना त्याला अजून शक्तिशाली करतात.

ज्याप्रमाणे लोखंडाला दुसरा धारधार लोखंड कापू शकतो त्याचप्रमाणे या दृष्ट भावनानी बनलेल्या दैत्यांना इतर दृष्ट भावनांचा आधार घेऊन संपवता येईल. म्हणजे जसा त्रिवार हा क्रोधापासून बनलेला आहे, जर का त्याला आटोक्यात आणायचं तर इतर वाम गुण त्याला आवरू शकतात, पण कामक मात्र प्रयेकच अवगुणांनी भरलेला आहे, म्हणून त्याला सम्पवन मात्र निव्वळ अशक्य.

जो पण मनुष्य या ग्रँथाच अध्ययन करत आहे त्याने स्वतःच्या वैयक्तिक कारणांसाठी वापर करण्याचा अमंगळ विचार म्हणजे स्वतःच्या मृत्यूला आमंत्रण देणे आहे...

शेवटी एक सुचवायचं आहे, खरं तर यातील दृष्ट दैत्यांचाच नाश आपण करू शकतो, पण दृष्टतेचा कधीही नाही, ज्या प्रमाणे सत्य हे चिरकाल टिकणार आहे त्याच प्रमाणे असत्य सुद्धा हे न सम्पणार, प्रत्येकच मनुष्यात या दोन गोष्टी नेहमीच राहतील, आणि या मनुष्यातील गोष्टींचीच प्रचंड प्रतिमा म्हणजे देव आणि दैत्य||

श्रवण ने ते सर्व वाचलं, आणि आता तो पुढे जाऊ शकत होता. त्याने लागलीच ज्या ठिकाणी कामक ची माहिती होती त्या पानावर झेप घेतली... पहिल्या पानावर लाल रंगाने कदाचित रक्ताने कामक असं लिहिलेलं होतं, त्याचसोबत तिथे एक चित्रही रेखाटलं होतं. त्या ठिकाणी एक साधू दाखवला होता आणि त्याचं खाली पाण्यात प्रतिबिंब म्हणून एका असुराची आकृती होती... कदाचित तीच

आकृती कामक ची असावी, परंतु एका साधुची प्रतिमा म्हणजे कामक हे कोड मात्र त्याला उमगलं नाही.

थोडा वेळ विचार केल्यानंतर त्याने पुढील पान उघडलं, आणि बघतो तर काय पुढील पान काळ्या रंगाने रंगवलेल होतं, एव्हढंच नव्हे तर सलग चार ते पाच पाने ही गडद काळ्या रंगाने रंगवलेली होती, ते बघून श्रवण ची पारणेच फिरली, असं वाटत होतं कुणीतरी किंवा पंतांनी मुद्दाम हे सर्व खोडल होतं जेणेकरून हि माहिती कुणाला कळू नये, आता काय करावं?

एव्हढे कष्ट केल्यानंतर आता जाऊन कुठे समोरचा रस्ता दिसणार होता आणि त्यातही हे अस. त्याने डोक्याला हात लावला. आणि हळुवार पाने पुढे चाळायला सुरुवात केली. तीन चार पान चाळल्यानंतर एका पानावर 'रमण' असं मोठ्या शब्दात लिहिलेलं होतं, ते बघताच श्रवण चे डोळे चकाकले आणि त्याने वाचायला सुरुवात केली, आणि

तिथे एका मोठ्या वाक्य रचनेत लिहिलेलं होतं, रमण हाच नश्वर

आणि ह्या वाक्यानंतर आता मात्र शाई बदलली होती, पुन्हा त्याच लाल रंगात पुढील माहिती होती.

'मनीरस आणि रमण, अर्थात मणी रस वापरून त्याला कैद करूच शकतो, मनिरसाची विधी काय याचा सुद्धा मी एक ग्रन्थ लिहिला आहेच त्याद्वारे जाणून घेणं योग्य राहील.

पण रमण ला कैद करणं हे इतर कोणत्याही सामान्य आत्म्याला कैद करण्यासारखं सोपं नाहीये. हे काम फक्त मलुक च्या राजवाड्याची स्वामीनीच करू शकते याच भान राखाव... तिच्या व्यतिरिक्त कुणीही हे काम करणं म्हणजे मृत्यू ला आमंत्रण हे ध्यानात असू द्यावं.

रमण हा कुणी दैत्य नाही, तो सध्या तर केवळ एक आत्मा आहे, आणि आत्मा म्हणजेच त्या सर्वोच्च परमात्म्याच एक सूक्ष्म रूप, ज्यप्रामाणे परमात्मा कुणी सम्पवू शकत नाही त्याच प्रमाणे आत्म्याला सुद्धा कुणी सम्पवू शकत नाही.

पण हो त्याला कैद करू शकतो किंवा या संसारातून मुक्त करूच शकतो.

आणि जर का हे करायचं असल्यास स्मरणाहूती पूजा करावी लागेल... हि पूजा करून एक तर आपण त्याला कुठल्या भौतिक गोष्टीत कैद करू शकतो, पण कैद करणं म्हणजे त्याची पुन्हा मुक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही, किंवा त्याला याच पूजेच्या आधारे आपण मुक्त करू शकतो अर्थात याच निसर्गात विलीन करू शकतो.

श्रवण आता पूर्णतः गोंधळून गेला होता, पंतांनीच वर एका मोठ्या वाक्यात लिहिलं होतं की रमण हाच नाश्वर आहे

आणि पुन्हा तेच खाली लिहितात कि रमण ला नष्ट करण हे निव्वळ अशक्यच, पंतांना नेमकं सांगायचं काय आहे?

त्याने बराच वेळ विचार केला पण त्याच्या ध्यानात ते काहीच आलं नाही,

'यात वेळ दवडून फायदा नाही, त्यापेक्षा तो मनीरस चा ग्रन्थ वाचला की किमान स्मरणाहूती पूजा तरी शक्य होईल

आणि कमीत कमी रमण ला तरी कैद करणं तरी शक्य होईल. शेवटी रमण म्हणजेच कामक च पात्र, जर का त्यालाच कैद केल तर कामक सुद्धा आपोआपच कैद होईल... पण आता एक मोठा प्रश्न होता, कि मनिरस तयार करण्याची कृती असणारा ग्रन्थ शोधावं लागणार होता...

श्रवण ने लागलीच जाऊन सेनापतींना पाचारण केले. मग दोघांनीही मिळून तो पुस्तकांचा ढीग पुन्हा चाळायला

सुरुवात केली, पण आज नशीब बलवत्तर होतं म्हणून कि काय काहीच वेळात तो ग्रन्थ सापडला...

'मनिरस', असं ठळक शब्दात लिहिलेला ग्रन्थ वाचायला सुरुवात झाली, तसा त्या छोटेखानी ग्रँथावर फार धूळ साचली होती, कदाचित तो ग्रन्थ लिहिल्यानंतर स्वतः पंतांनी पण उघडला नसावा असं वाटत होतं, ग्रन्थ त्या मानाने बराच मोठाही होता. जवळ जवळ अनेक तास वाचत बसल्यानंतर शेवटी मनिरस म्हणजे काय हे त्याला उमगलं, त्याने काहीच वेळात थोडक्यामध्ये त्याबद्दल ची सर्व माहिती एका कागदावर उतरवून काढली,

**************

**मनीरस **

मनीरस, एक अद्भुत द्रव्य, जीवक ऋषींनी अथक परिश्रमानंतर तयार केलेलं द्रव्य, एक अशी औषधी जी

प्रत्येक व्याधींचा तोडगा काढू शकते. एकवेळ अमृत सुद्धा व्यर्थ होईल परंतु मनीरस कधीच चुकीच ठरणार नाही.

हे द्रव्य तयार करण्यासाठी मुख्य पाच वनस्पतींची आवश्यकता असते आणि अधिक म्हणून एक वनस्पती सुद्धा गरजेचा असतो. अधिकचा वनस्पती मात्र परिस्थिती नुसार बदलतो.

हे पाच वनस्पती म्हणजे संजीवनी, पुष्णपतिका, इंद्रनील कमळ, अष्मवेल, सेरफल.

संजीवनी हि वनस्पती हिमालयातून आणली गेली होती, हीच वैशिष्ट्य म्हणजे या वनस्पतींचे फुल हे दिवसा नाही तर रात्री उमलतात, आणि चंद्रप्रकाशात हे चमकून उठतात. या वनस्पतीच्या प्रत्येकच भागाचं काही ना काही औषधी गुणधर्म आहे परंतु जर का मनिरस तयार करायचा तर या वनस्पतीचे फुल अतिअवश्यक.

पुश्नपतिका अति पूर्वेकडे म्हणजेच ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यातून आणलं गेलं. या वनस्पतीच फुल उपयोगी आहे.

इंद्रनील कमळ हे कमळ दक्षिणेकडील निलगिरी पर्वताच्या उत्तर पायथ्याशी उमलतो, निळ्या रंगाच हे कमळ फार उपयोगी आहे.

अष्मवेल हि आपल्याच सह्याद्री मध्ये सापडते. अतिप्रचंड झाडांवर विळखा घालून बसलेली हि वेल उगवते सुद्धा त्या झाडांच्या फांद्यांवरच.

सेरफल हे एक कंद असून घनदाट जनगलांमध्ये सापडल्यास सहजरित्या सापडते.

तर अशा या पाच वनस्पती, जीवकांनी आयुष्यातले अनेक वर्षे याना सापडण्यात आणि त्यांच्यापासून मनीरस तयार करण्यात खर्च केले. हो पण हा मनीरस म्हणजे रामबाण म्हणावा लागेल.

या पंचवनस्पती शिवाय अश्वगन्ध, कलनडुल, खुस, रानपासू, यापैकी एक सहावा वनस्पती म्हणून वापरता येतो.

मनीरस काम कस करतो हे सांगायचं झालंच तर एखादी व्याधी जर का एका व्यक्तीला जडली असेल तर त्या व्यक्तीच काही रक्त जमा कराव(जर का ती व्याधी शरीरातील इतर द्रव्यांद्वारे पसरत असेल तर ती द्रव्ये सुद्धा चालतील)

रक्तामध्ये त्या व्याधीचा 'व्याधीजनक' अस्तित्वात असतो, उदाहरण द्यायच झालंच तर क्षयरोग, क्षयरोग हि व्याधी किंवा रोग ज्या कुना जिवामुळे होतो तो जीव म्हणजे या ठिकाणी व्याधीजनक.

आपण ज्यावेळी मनीरस त्या रक्तात मिसळतो त्याच क्षणी आपल्याला दोन उत्पाद मिळतात, त्यातला एक म्हणजे व्याधीक्षमक आणि दुसरा उरतो तो म्हणजे चोथा.

मनीरस + रोगीच रक्त (ज्या मध्ये व्याधीजनक आहे)

= व्याधीक्षमक + चोथा

आता जे व्याधीक्षमक तयार झालेलं आहे तेच जर का पुन्हा त्या रोगी ला दिल ज्यात व्याधी आहेत, तर तो बरा होऊ शकतो... व्याधीक्षमक त्याच्या शरीरातील व्याधीजनकाना पूर्णतः सम्पवून टाकतो.

व्याधीक्षमक + रोगी = व्याधीजनकाचा नाश (म्हणजेच रोगी बरा होऊन जातो)

पण याचा एक दुष्परीणाम म्हणजे चोथा, ज्या क्षणी मनीरसाची रासायनिक क्रिया व्याधीजनक सोबत होते त्यावेळी मनीरसाचे दोन भाग होतात, दोन भाग ज्यांचे गुणधर्म एकमेकांपेक्षा पूर्णपणे उलट. म्हणून ज्यप्रामाणे व्याधीक्षमक व्याधी ला सम्पवतो त्याचप्रमाणे चोथा तीच व्याधी उत्पन्न करू शकतो, म्हणून मनीरस ज्यप्रामाणे अमृत आहे त्याचप्रमाणे काळाच सगळ्यात घातक विषसुद्धा आहे.

( जर का वाचकांना हि पद्धत समजण्यास अवघड झाली असेल तर त्यांनी antigen antibody याची concept बघावी, जय प्रमाणे कुठल्याही जिवाणू मुळे शरीरात antigen तयार होतात आणि मग त्या विरुद्ध आपलं शरीर antibody तयार करत... vaccine सुद्धा

असच काम करतंय, जेव्हा हे antigen आपण घोड्यामध्ये देतो तेव्हा घोडा त्याविरुद्ध antibodies तयार करतो, आणि त्या तयार झालेल्या antibodies मग आपण patient ला देतो. )

मनीरस हे फक्त भौतिक व्यधींवर काम करतो असं नाहीये, तर तो एका मानसिक, भावनिक व्याधी ला सुद्धा दूर करू शकतो. ज्याप्रमाणे जीवकांनी कामक प्रवृत्तीचा ताबा मिळवण्यासाठी काम याच वृत्तीचा उपयोग केला होता, आणि त्यातून जे व्याधीक्षमक बनलं त्यालाच मग वापरात आणलं गेलं, आणि हो आपल्याला माहीतच आहे, जरी या द्रव्याने ती व्याधी क्षमवली तरी त्याचा जो उरलेला चोथा होता त्यातूनच कामक ची उत्पत्ती सुद्धा झाली, आणि जर का उमा राणीने वेळीच बलिदान दिलं नसत तर दण्डकारण्याचा ऱ्हास अटळ होता.

**************

बघता बघता काही तास असेच निघून गेले, सम्पूर्ण माहिती वाचून झाल्यानंतर श्रवण ने एक मोठा आळस दिला. तो तिथून उठला, आता पुन्हा संध्या झाली होती. त्याने ग्रंथांचा ढीग एका बाजूला लावला, आणि त्याने कक्ष सोडला. काहीतरी लाभलं आहे असं समाधान तर त्याला होतंच पण ते मिळूनही तो व्यथित झाला होता. कारण स्मरणाहूती पूजेद्वारे रमण ला अटक करायचं म्हणजे त्यासाठी मनीरस अनिवार्य होता, आणि त्यासाठी लागणारी सामग्री मात्र जमा करणं म्हणजे महाकठीण. हिमालय, निलगिरी, ब्रह्मपुत्रा या ठिकाणी एकाच वेळी जण म्हणजे वर्षाचा कालावधी लागणारं होता, तोपर्यंत टिकाव लागण च कठीण.

तसाच हताश होतं तो बाहेर आला, बाहेर सेनापती तसेच अचल उभे होते... त्यानी श्रवनच्या चेहऱ्यावरचे हावभाव बघून काहीच विचारलं नाही, त्या कक्षातून ते बाहेर आले. बाहेर येऊन बघितलं तर सध्या आभाळ साफ झालं

होतं, आज खूप दिवसा नंतर त्यांना सूर्यदेवाच व्यवस्थित दर्शन झालं, श्रवनकडे काही पृष्ठ होती ज्यावर त्याने मनीरसाची विधी लिहिलेली होती... ती विधी आणि हताश मन घेऊनच तो पुन्हा महाला कडे निघाला. जाताना वाटेतच गुरुदेव भेटले. अर्थातच त्याचा हताश चेहरा बघून त्यांनी विचारलं,

"युवराज, जे पाहिजे होते ते तुम्हाला मिळालं नाही वाटत!!"

"नाही गुरुदेव, मिळालं तर आहे, पण ते प्राप्त करन अवघड आहे"

"मी काही मदत करू शकतो?"

"कदाचित कुणीच यात मदत करू शकत नाही, पण हो तुम्ही मला स्मरणाहूती पूजा कशी करायची हे शिकवू शकतात. "

"काय, समरणाहूती पूजा, आणि ती कशासाठी?"

"रमण ला थांबवण्याचा तो एकमेव मार्ग आहे"

"युवराज, स्मरणाहूती पूजा हि कुणीही करू शकत नाही, फक्त या कालीमातेचा एक खरा पुजारीच ती पूजा करू शकतो"

"तुम्हीच आहात ना कालीमातेचे पुजारी!!"

"नाही, मी बोललो एक खरा पुजारी, मी तर फक्त रोजची पूजा करतो, पण याचा खरा पुजारी म्हणजे  विरसेन, त्यालाच या स्मरणाहूती पूजेची विधी माहित आहे, आणि ती पूजा करण्याची क्षमता पण फक्त त्याच्यातच आहे, जर का तुम्ही विरसेन ला राजी करू शकला तर मात्र तुमचं काम होईल"

"विरसेन!!! म्हणजे काम अवघडच आहे, असो, धन्यवाद गुरुदेव, तुम्ही आम्हाला मार्ग दाखवला"

"सर्व काही नियोजित आहे श्रवण, सर्व काही सुरळीत होईल, खात्री ठेवा"

आणि मग श्रवण आणि सेनापती पुन्हा महालाकडे निघाले.

आज महालात पुन्हा काल प्रमाणेच भोजन विधी उरकले, आज मात्र श्रवण ला विरसेन ला त्या पूजेसाठी तयार करायचा होतं. जसे भोजन विधी उरकले तसाच श्रवण ने त्या विषयात हात टाकला,

"विरसेन, ज्या कामासाठी आम्ही इथे आलो होतो, ते काम अर्ध सम्पलच आहे. "

"चला, म्हणजे या भूमीचा तुमच्या कार्यात फायदा, झालाच तर"

"पण हे काम पूर्ण करण्यासाठी मला तुमची मदत हवी आहे"

"माझी मदत?? बोला युवराज आम्ही काय करू शकतो तुमच्यासाठी?"

"विरसेन, जर का रमण ला थांबवायचं असेल तर स्मरणाहूती पूजा करावी लागेल, आणि ह्या पूजेची विधी आणि क्षमता फक्त तुमच्या कडेच आहे, तुम्ही यात आम्हाला मदत करू शकता!"

"स्मरणाहूती पूजा!! हम्म, आता कळतंय कि पंतांनी हि पूजा मला का शिकवली होती तर!! पण ही पूजा मला मलुक ला करावी लागेल का?"

"हो!! तिथेच तर खरं संकट आहे"

"मला क्षमा करा श्रवण, पण मी मलुक मध्ये येऊ शकत नाही, किंबहुना मी तयारही झालो तरी मला मलुक मध्ये येण्यास परवानगी नाही. मागच्या वेळी जेव्हा मलुक आणि आमच्यात जी लढाई झाली होती त्यात झालेल्या तह नुसार आमचा प्रतिनिधी मलुक मध्ये पाय ठेवू शकत नाही"

"विरसेन, त्याची काळजी तुम्ही नका करू, तुम्हाला मलुक मध्ये येण्यास कुणीही अडवणार नाही"

"हो पण जर का येण्यास मी तयार असलो तर ना!! त्या मलुक ने आम्हाला प्रत्येक स्तरावर हिणवल आहे, नेहमीच आमचा अपमान जिथे झालाय तिथे का यावं?? आमची जी प्रथम पिढी मलुक च्या आश्रयाला अली होती त्यांना केवळ रानात राहणारे म्हणून मलुक मध्ये प्रवेश नाकारला, आज त्याच मलुक मध्ये मी जायचं, ते शक्य नाही"

"असं नका म्हणू विरसेन, जे काही भूतकाळात झालं ते दुर्दैवी होतं, पण हे कुणीतरी बदललं पाहिजे ना! आपण पाऊल उचलू शकतो, आणि हे तुम्हालाही माहित आहे की उद्या जर मलुक चा ऱ्हास झाला तर त्यानंतर ते संकट इथेही धडकेत, तेव्हा तुम्ही काय करणार?"

"तुम्ही जरी आम्हाला प्रवेश दिला तर मलुक चे लोक, मलुक चे सामंत आम्हाला स्वीकारतील!!हि पूजा अशीतशी समझु नये, एका अप्रतिम योग्यतेचा विश्वास तिथे पाहिजे, थोडाही अविश्वास पूर्ण पूजेला फसवू शकतो, "

"त्याची काळजी तुम्ही नका करू, मी ते सगळं तुमच्यासाठी करेल, मी मलुक ला समजावून सांगेन, फक्त तुम्ही या, मलुकसाठी या, माझ्यासाठी या, नाहीतर किमान तुमच्या लोकांसाठी या, कारण त्या रमण ला थांबवण्याची क्षमता फक्त राजवाड्याची स्वामिनी म्हणजे माझी पत्नी

सतीच करू शकेल, त्यांनतर कुणीही त्याला थांबवले असं शक्य नाही"

"काय, फक्त सतीच?"

"हो"

"म्हणजे माझ्याकडे दुसरा पर्याय सुद्धा नाही तर!!ठीक आहे युवराज, मी तयार आहे तिथे येण्यासाठी, पण मला त्याची तयारी करण्यासाठी काही वेळ लागेल, साधारण पंधरा दिवस तरी"

"पंधरा दिवस म्हणजे अमावस्येच्या आधी, चालेल, तुम्ही तुमचा वेळ घ्या, मी तोपर्यंत मलुक मध्ये सर्व तयारी करेन"

"अजून काही मदत करू शकतो का मी?"

"हो!! त्या पूजेत  मनीरसाचा वापर करावा लागेल!त्याबद्दल तुम्हाला काही माहिती असेल तर मला सांगावी"

"मनीरस, त्याबद्दल मला काहीच माहिती नाही"

"म्हणजे अजून सुद्धा व्याप आहेच तर, असो विरसेन तुम्ही त्या पूजेची तयारी करा, मनीरस कसा तयार करावा याच मी बघतो, धन्यवाद"

आणि असं सम्भाषण करून मग ते आपापल्या शयन कक्षात गेले. श्रवनचा त्रास सम्पतच नव्हता, एक उपाय

सापडला कि त्यानंतर अनेक प्रश्न उभे ठाकत होते. आणि याच तणावामुळे आज सुद्धा त्याला झोप आली नव्हती. तो पून्हा येऊन सज्जावर येऊन उभा राहिला, उत्तरेकडे तोंड करून तो उभा होता, आज आकाश निरभ्र होतं, बऱ्यापैकी चांदणं होतं, त्या भयाण रात्री नन्तर आज प्रथमच चांदणं बघायला मिळत होतं.

श्रवनची ती अवस्था बघून सेनापती ना रहावंल नाही

"युवराज तुमचा काही तणाव मी कमी करू शकतो का?"

"कदाचित नाही सेनापती, मुख्य प्रश्न आहे तो हा मनीरस, याची विधी म्हणाल ना तर त्यासाठी चे वनस्पती हे हिमालय, ब्रह्मपुत्रा, निलगिरी अशा पर्वतात आहेत, आणि इतक्या कमी कालावधीत ते इथे आणण म्हणजे अशक्यच"

श्रवनच्या हातात असलेला तो कागद सेनापतींनी घेतला आणि ते तो वाचू लागले.

संजीवनी, पुष्णप्तीक, इंद्रनील, सेरफल अशा वनस्पतींची नाव तिथे होती.

"युवराज इथे लिहिलंय कि संजीवनी हा वनस्पती रात्रीच्याच चांदण्यात चमकून उठतो"

"हो सेनापती, असं म्हणतात की सम्पूर्ण पृथ्वीतलावर फक्त हि एकच वनस्पती आहे जी रात्री चांदण्यात चमकते, पण ही आढळते ती हिमालयात, तिथे जाणही शक्य नाही"

"पृथ्वी तलावरची फक्त एकच वनस्पती, युवराज... !!"

"काय झालं सेनापती असे आश्चर्य चकित का झालात?"

"मी हि वनस्पती बघितली आहे"

"काय... आणि ती कुठे"

"याच पर्वतावर"

"या पर्वतावर, ते कसं शक्य आहे"

"हो युवराज ज्या वेळी तुम्ही विरसेन सोबत सम्भाषण करत होता त्यावेळी मी उत्तरेकडे जी दरी आहे ती न्याहाळत असतानाच मला असे वनस्पती दिसले जे या चांदण्यात

चमकत होते, आणि नवल म्हणजे मी काळ जेव्हा तिथे गेलो तर एकही वनस्पती चमकत नव्हती, कदाचित काल आभाळ असल्याने"

"काय म्हणताय सेनापती, असं असेल तर आपण जाऊन बघितलं पाहिजे"

आणि असं म्हणताच त्यांनी हातात मशाल घेतली आणि तडक त्या दरीकडे निघाले, वरून बघताच खरोखर तिथे काही वनस्पती चमकत होते, कसतरी त्या कचाट्यातून वाट काढत काढत त्या दोघांनीहि फक्त मशालींची सहारा घेत त्या दरीत प्रवेश केला, बरीच वाट चालल्या नन्तर त्या वनस्पतींकडे ते आले, जवळ आल्यावर खरोखर त्या वनस्पती त्या मशाली पेक्षा पण जास्त तेजस्वी भासत होत्या,

श्रवण ने त्यातील एक फुल तोडलं, आणि हातात घेतल, आणि काही क्षणासाठी त्याने डोळे बंद केले आणि तोंडातल्या तोंडात तो काहीतरी पुटपुटत होता

"युवराज काय झालंय?"

"सगळं काही कळतंय आता, सर्व काही उलगडलय"

"काय उलगडलंय...??"

"उत्तरेत संजीवनी वृक्ष, ते भव्य जमिनी खालील दालन, पूर्वेकडे वाहणारी कृष्णा नदी, सगळं काही कळलंय"

"काय कळलंय युवराज?"

"सेनापती हा तोच पर्वत आहे जिथे जीवक ऋषींनी मनीरस तयार केला, तुम्हला आठवत प्रधानांनी जी कथा सांगितली होती त्यात असं दिल होतं की मनीरस तयार करण्यासाठी कृष्णा नदीच पाणी सर्वात अनुकूल आहे

जीवक ऋषींनी ते इथेच तयार केलं, आणि एव्हढंच नव्हे तर त्यांनी त्या सर्व वनस्पतींची लागवड सुद्धा केली, जस संजीवनी उत्तरेत आहे त्याचप्रमाणे इतर वनस्पती हे पूर्वेकडे, दक्षिणेकडे आणि पश्चिम भागात असतील...

गुरुदेव बोलले हि होते की या पर्वतात सर्व वनस्पतींचा अभ्यास करता येईल, संशोधन करता येईल इतक्या मुबलक प्रजाती आहेत,

ते दालन सुद्धा जीवक ऋषींनीच तयार केलं, त्यांनीच त्यांचे शिष्य घडवले, आणि एक विश्वविद्यालय बनवलं, आता सगळंच उलगडलंय सेनापती".

आणि एव्हढं बोलून तो जोरजोरात हसू लागला,

"शशिकांत बोललेच होते एकदा का इथे आलो तर सर्व प्रश्नांची उत्तरे मिळतील, आणि ते बरोबर होते, सेनापतिजी आता मलुक चा ऱ्हास कुणीच करू शकणार नाही, रमण ला आपण पुन्हा कैद करू"..

त्याने पुन्हा एकदा डोळे बंद केले आणि मनोमन शशिकांत पंतांच स्मरण केलं, आणि ज्या क्षणी डोळे उघडले त्याच क्षणी त्या चंद्रा एव्हढंच तेज त्याच्या डोळ्यात दिसत होतं, काहीतरी गवसलं आहे याचा आत्मविश्वास चेहऱ्यावर झळकत होता,

हो पण समस्या सोडवण्यासाठी हे पुरेसं होतं का??

▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪▪

*मृत्युंजय*

पर्वताच्या उत्तरेकडे संजीवनी वनस्पती मिळाल्याने अनेक कोडी उलगडली होती. श्रवण ला तर वाटत होतं की मलुक ला वाचवण्याचा हा मार्गच आहे जणु. त्या संजीवनी वनस्पती च फुल त्याने अलगद तोडलं... एका वनस्पती वर अनेक फुल होती. आणि त्या ठिकाणी अनेक वनस्पती दिसत होते, श्रवण आणि सेनापतींनी मिळून जेव्हढे जमा करता येईतो तितके जमा केले आणि ते फुल घेऊन ते पुन्हा महालात आले... नैराश्या ने ग्रासलेल्या त्या महिन्यात प्रथमच काहीतरी चांगलं घडलं होतं. आता यापूधील सर्वच विधी आरामात उरकता येणार होते.

दुसरा दिवस उजाडला. श्रवण आणि सेनापती उर्वरित वनस्पती शोधण्यासाठी निघाले. त्यांनी एकदा त्या वनस्पतींची यादी बघितली.

यातील संजीवनी तर मिळाली होती, आता राहीलं होतं ते म्हणजे अष्मवेल, इंद्रनील कमळ, सेरफल, आणि पुश्नपतिक

"सेनापतिजी, ज्याप्रमाणे संजीवनी हे आपल्याला उत्तरेकडे मिळालं कारण कि मूळ संजीवनी हे हिमालयात येते, आता मग त्याचप्रमाणे अष्मवेल हि पश्चिमेकडे मिळाली पाहिजे, इंद्रनील कमल दक्षिणेला तर पुश्नपतिक हे पूर्वेकडे"

"हो अंदाज तर तोच वाटत आहे, चला तर मग आपण पश्चिमेकडे सुरुवात केली पाहिजे, कारण हे अष्मवेल या फार उंच झाडांना वेटोळे घालून असतात, आणि पश्चिमेकडे अशी बरीच झाड आहेत बघा"

"मलाही तसंच वाटत".

त्यांनी लगेच विरसेन ला तशी सूचना केली आणि ते पश्चिमेकडे जाण्यास निघाले, पश्चिमेकडे जात आहेत असं कळताच विरसेन ने मग यांच्यासह काही सैनिक सुद्धा दिले, कारण त्या ठिकाणी अत्यन्त घनदाट अशी झाडी होती, शिवाय रानटी प्राण्यांचा हैदोस सुद्धा असायचा.

तसे सेनापती सोबत असताना कुणी वाकडी नजर टाकनही शक्य नव्हतं, एक कसलेले सेनानी होते ते, त्यांचं वय जरी पन्नाशी जवळ आलं होतं तरी त्यांचं शरीर मात्र जराही सुस्त पडू दिला नव्हत त्यांनी, कुठल्याही तरुण सैनिका एव्हढेच चपळ होते ते, त्यांच्या म्यानात असलेली तलवार जीच वजन जवळ जवळ 5 मण इतकं होतं आणि जी शिस आणि लोखंड यांच्या मिश्रणाने तयार झाली होती ती चालवण्याच कसब सुद्धा खूपच निराळ होतं, त्यांनी

जीवनात लढलेल्या अनेक लढाईचे पुरावे सुद्धा शरीरावर ठिकठिकाणी दिसत होते, खरंतर त्यांना ज्यावेळी विरसेनच्या सैनिकांनी पकडलं त्यावेळी त्यांचा सामना करणं सेनापतींसाठी अवघड नव्हतं, पण श्रवण ने हलकेच दिलेल्या इशाऱ्याने मग त्यांनी प्रतिकार केला नाही.

असे मुरलेले सेनानी आणि विरसेन चे काही सैनिक घेऊन श्रवण पश्चिमेकडे निघाला, हि वाट तीच होती जिथून ते दोघे मलुक हुन त्या पर्वतावर आले होते. बघता बघता घनदाट झाडी सुरु झाली. घनदाट म्हणण्यापेक्षा त्यांची उंचीच इतकी होती आणि त्यात त्यांच्या फांद्या एकमेकांत गुरफटल्या होत्या त्यामुळे सूर्यकिरण खूपच अंधुक पने जमिनीवर पोहोचत होते...

अनेक झाडांवर निरनिराळ्या माकडांच्या टोळ्या होत्या, श्रवण आणि इतर माणसं दिसताच त्यांनी दात विचकायला सुरुवात केली. कुणी वरूनच कलकलाट करत होतं तर कुणी खाली येऊन पण एका सुरक्षित अंतरावरून

त्या सर्वांचा अंदाज घेत होतं. श्रवण ने तितक्यात त्या सैनिकांपैकी एकाला विचारलं,

"हि वानरसेना अशी प्रतिक्रिया का देत आहेत?आपण इथे आलेलं याना रुचलेलं दिसत नाही"

"हो युवराज, यांना इथे इतर मनुष्यांच येन खपत नाही, हो पण आमचं येन मात्र चालत"

"ते कसं?"

"तीन पिढ्यांपासून चे सम्बन्ध आहेत, इथे आम्हा सैनिकांची एक तुकडी तैनात असते, या तुकडीच्या बाहेर चा आदिवासी सुद्धा ते मान्य नाही करत, त्यामुळेच विरसेन ने मग आम्हाला तुमच्या सह इथे धाडल आहे, ".

"तुम्ही असताना सुद्धा ते अशी प्रतिक्रिया देतच आहेत पण??"

"हि फारच सामान्य आहे युवराज, जर का आम्ही नसतो तर कदाचित तुमचा आणि त्यांचा सामना झालाच असता, असो मला वाटत आपण आता या वृक्षावलीच्या मध्यात आलोय, मला इतरांना एकदा सावध केलं पाहिजे!!"

"इतरांना!!"

"हो, ते सैनिक जे सध्या इथे तैनात आहेत, "

आणि त्याने एकाकी तोंडात एक बोट टाकला आणि तो आरोळी ठोकायला लागला, त्याचं ते वर्तन जरा विचित्रच

होतं, त्याने ठोकलेली ती आरोळी ला उत्तर म्हणून दुरून एक तशीच आरोळी आली,

आणि ती आरोळी येताच जवळूनच एका झाडांतून एका वानराने सरळ उडी खाल्ली आणि ते वानर त्या सैनिकाच्या बाजूला आलं.

श्रवण ल कळून चुकलं कि हे काही वानर नाही तर यांचेच सैनिक आहेत, तेच सैनिक ज्यांनी सुरुवातीला श्रवण आणि सेनापतीला कैद केली होती.

त्या वानराचा वेष केलेल्या सैनिकाने श्रवण ला लागलीच प्रणाम केला,

हा तोच होता ज्याने त्या दिवशी जेव्हा श्रवण आणि सेनापती कैद झाले होते तेव्हा सबंध टोळीच प्रतिनिधित्व

केलं होते, त्यावेळी जरी तो खूप आक्रमक होता तरी आज मात्र तितकाच विनम्र दिसत होता,

"प्रणाम युवराज, इथपर्यंत येण्यास तुम्हाला जास्त त्रास तर नाही ना झाला?"

"नाही, या काही सैनिकांना बरोबर मार्ग दाखवला"

"तुमचं इथे येण्याचं प्रयोजन मला माहित आहे, तशी माहिती मला महाराज विरसेन यांनी कळवली, तस या वनांत अनेक बळकट वेली उंच वृक्षांना वेटोळे घालून असतात, त्यापैकी अष्मवेल कोणती हे मात्र आम्ही सांगू शकत नाही"

"त्याची काळजी नसावी, मला त्याचं स्वरूप माहिती आहे, त्यानुसार सापडणं सोपं होईल"

श्रवण ने घोरेसु मनिरस च्या सामुग्रीत अष्मवेल च स्वरूप वाचलं होतं, त्यानुसार अष्मवेल ला शोधन जास्त कठीण गेलं नाही,

काही घटिका झाल्या आणि एका उंच झाडावर ती वेळ नजरेत पडलीच, ती वेल नजरेत पडताच काही वानर रुपी सैनिक झटपट त्या झाडावर चढले, त्या वेलीवर इथून तिथून अनेक सर्प चिटकून होते, तसा अशा सापांशी त्या सैनिकांचा अनेकदा सामना झाला होता, अनेक विषारी नाग तर रोजच त्यांच्या नजरेत पडायचे म्हणून त्याची त्यांना चिंता नव्हती.

त्या सैनिकांना त्यांच्या सोबतच असलेले काही बाबूंच्या सहाय्याने ते नाग, साप बाजूला केले आणि त्या वेलीचे काही तुकडे जमा केले, तुकडे हातात घेताच ते जरा विचित्रच भासले, अत्यन्त थंड, सोबत एक मनमोहक सुगन्ध, आणि त्या वेलींतून हळूहळू एक तांबडा रस ओघळत होता... काळजी पूर्वक बऱ्यापैकी तुकडे जमा झाले आणि ते

श्रवण ला समर्पित केले गेले. आता सध्या तरी त्या मुख्य पाच वनस्पती पैकी दोन तरी  मिळालेच होते, उर्वरित तीन सुद्धा मिळतील अशी अपेक्षा होती.

या वेली जमा करता करता दुपार होऊन गेली होती आणि ही आता भोजन वेळ झाली होती, महाल अजून बराच दूर होता, तिथे पोहचायला एक घटका अजून लागला असता, म्हणून मग  वानर सैनिकांनी त्या दोघानाही तिथेच वनमेवा खाण्यास आग्रह केला

आणि त्यांच्या अग्रहानुसार तिथेच जेवायला बसले, श्रवण सोबत सहदेव म्हणजेच त्यांचा म्होरक्या बसला होता,

"युवराज, त्यावेळी मी जे तुमच्या सोबत वागलो त्याबद्दल क्षमा असावी"

"क्षमा कसली मागताय सहदेव, तुम्ही तुमच काम बजावलं, आणि स्वतःच कर्तव्य बजावण्यात काही चूक आहे असं मला वाटत नाही"

"हा तुमच्या मनाचा मोठेपणा, आज तुमच्याशी भेटलो आणि मलुक वासीयांबद्दल माझं मतच बदललं"

"आणि ते कसं?"

"लहान असतांना च ऐकत आलोय, कि मलुक चे रहिवासी दृष्ट, अधर्मी, कपटाचे पूजक, पण आता ते चूक वाटत, कदाचित मलुक मध्ये सुद्धा आमच्या सारखेच लोक रहात असतील, देव करो आणि पुन्हा मलुकवासी आणि आम्ही पुन्हा एकत्र होवो"

"काय!!पुन्हा एकत्र होवो म्हणजे? तुम्ही आधी एकत्र होता?"

"आम्ही नाही, मात्र आमचे पूर्वज, मी लहान असताना माझ्या बाबांनी मला सांगितलं होतं की आमचे पूर्वज सुद्धा कधीकाळी या मलुक चे रहिवासी होते, ते सर्व मलुक वासीयांप्रमाणे रहायचे, पण आम्ही एका विशिष्ट जातीचे होतो जी इतर मलुक वासीयांपेक्षा श्रेष्ठ होती, सम्पत्ती, विद्ववत्ता, या सर्वच गोष्टीत आम्ही पुढे होतो, पण काहीतरी घटना घडली आणि याच मलुक वासीयांनी कपटाने आम्हाला मलुक मधून हद्दपार केलं, मलुकच नाही तर आसपासच्या गावांतून सुद्धा आम्हला बाहेर काढलं गेलं, "

"याबद्दल मला काहीच माहिती नव्हती सहदेव"

"खूप कमी मलुक च्या लोकाना हे माहिती आहे, ज्यावेळी आम्हाला हद्दपार केलं गेलं तेव्हा सर्व लोक विखुरले गेले, काही जण दक्षिणे कडे गेले तर काही लोक समुद्र किनारपट्टीवर, पण आमचा स्वीकार तिथे पण केला गेला नाही, प्रत्येकच राज्यातून आम्हाला दूर ढकललं जायचं, जिथे तिथे आमचा अपमान केला गेला, कधीकाळी पूर्ण आर्यवर्तात सन्मान असलेल्या आमच्या या कुळावर देशोधडीला लागण्याची वेळ आली, शेवटी पर्याय नाही म्हणून मग आमचे पूर्वज या सह्याद्रीतल्याच जंगलात राहू लागले... मग वनांत राहिल्याने आमच्या सवयी बदलल्या, मांसाहारी बनलो, वस्त्र बदलले, रूप बदलले आणि कुठल्याही इतर आदिवासींत आणि आमच्यात काही फरक राहिला नाही.

विरसेन चे आजोबा त्यावेळी आमच्यातल्या एका टोळीचे प्रमुख होते, त्यांनी मग या सर्व विखुरलेल्या लोकांना एकत्र केलं आणि सगळ्यांना पुन्हा मलुक ला जाण्याचा

प्रस्ताव दिला... त्यांच्या त्या प्रभावशाली व्यक्तिमत्वामुळे मग आम्ही सर्व कधी नव्हे ते एकत्र झालो आणि मलुक कडे प्रस्थान केल. सर्वांना अपेक्षा होती की मलुक आमचा स्वीकार करेल, भूतकाळात काही गैरसमज झाले असतील ते दूर होतील आणि आम्ही पून्हा व्यवस्थित राहू शकू, पण नाही, ज्यावेळी ते सर्व इथे आले तेव्हा त्यावेळेच्या सामंतानी मलुक मध्ये प्रवेशबंदी केली. त्यांनी बऱ्याच विनवण्या केल्या, पण काहीच फरक पडला नाही.

मग त्याचमुळे आम्हाला या पर्वतावर स्थायिक व्हावं लागलं. याच कारणावरून मलुक शी आमच्या अनेक लढाई झाल्या, बरेच लोक मारले गेले, अजून हि मारले जातात, एकमेकांच्या प्रदेशात प्रवेशबंदी केली आहे, कधीकाळी एकाच व्यवस्थेचे भाग असनारे आम्ही आता एकमेकांचे शत्रू बनलोय, तशी मलुक ची शक्ती अफाट, पण ती शक्ती या पर्वतावर चालत नाही... म्हणून सध्या तरी आमचा जीवनदायी म्हणजे हा पर्वतच आहे, पण इथेही राहणं सोपं

नाही, जुन्या काळात तर मुसळधार पावसात आमची पूर्ण घर वाहून जायची, मग तसल्या पावसात कित्येक लोक रोगांना बळी पडायचे, पण गोविंद पंतांमुळे आम्हाला घर बांधण्याची परियोजना कळाली

रानटी श्वापदांचा त्रास असायचा, आता आम्ही त्यांपासून रक्षा करतो... तरीसुद्धा अजूनही अनेक समस्या आहेतच.

गोविंद पंतानंतर तुम्ही पहिलेच जे मलुक हुन इथे शांततेत आले, खरं सांगायचं तर तुम्ही इथे आल्याने विरसेनच नव्हे तर आमच्या पूर्ण जमातीलाच आनंद झालाय. सगळ्यांना वाटत कि तुम्हीच मलुक आणि आमच्यातले सम्बन्ध चांगले करू शकतात आणि आम्ही पून्हा आमच्या मातृभूमीकडे परतु... मला क्षमा करा कारण मी लहान तोंडी मोठा घास घेत आहे, पण जर का तुमची मलुक मधील समस्या सुटली तर तुम्ही आम्हाला मदत कराल?"

सहदेव ने त्याच्या मनातील हे सगळं एकाच दमात बोलून टाकलं, श्रवण तर चकितच झाला होता, अशा परिस्थितीत असलं काही ऐकायला मिळेल असं त्याला वाटलंच नव्हतं.

समोर सहदेव च्या चेहऱ्यावर एक आशा दिसत होती, काय माहित पण त्याची मलुक ला जाण्याची ओढ पण त्याला जाणवत होती

"सहदेव, या आधी कधी मलुक ला गेले आहात का?"

"नाही युवराज"

"तरीही इतकी ओढ?"

"हो, ती तर आहेच, शेवटी आमची मातृभूमी म्हणजे मलुकच ना"

"ठीक आहे सहदेव, ज्या वेळी रमण चा प्रश्न मार्गी लागेल त्याच वेळी मी मलुक मध्ये तुमचा येण्याचा मार्ग सुखर करेल, आमचे पिताश्री जे प्रतिष्ठान चे महाराज आहेत त्यांना सुद्धा हे पूर्ण प्रकरण सांगेल, त्यांच्या आज्ञेच्या बाहेर कुणीच नाही"

"धन्यवाद युवराज, मला अशीच अपेक्षा होती तुमच्याकडून, देव करो आणि मलुक वरील सध्याचं संकट लवकर टळो आणि आपण सर्वच तिथे योग्य रित्या राहू शकू"

श्रवण च्या त्या काहीच शब्दांनी सहदेव आणि तिथलच्या सर्वच लोकांचा चेहरा खुलला होता, श्रवण ला हि

वाटत होतं की फक्त परिस्थिती मुळे यांची कुप्रसिद्धी झाली आहे, जर का इतिहास खरंच असा असेल तर याना न्याय तर मिळालंच पाहिजे.

असा विचार करत असतानाच वाढेकरी आले, त्यांनी श्रवण सहदेव आणि सेनापतीं समोर पान ठेवली आणि त्यावर एकेक करून त्याच ठिकाणी तयार झालेले पक्वान्न वाढले जात होते, समोर असलेलं ते पक्वान्न खरंतर श्रवण आणि सेनापती यांनी याआधी खाल्ले तर नव्हतेच पण याआधी कधी बघितले सुद्धा नव्हते... पूर्ण पान जेव्हा भरलं तेव्हढ्यात वाढेकऱ्यांनी एक कंदमूळ घेतलं आणि त्याला पिळून त्याचा जो रस होता तो तिघांच्या भोवती गोलाकार रित्या शिंपडला.

"हा रस का शिंपडला जातोय?", श्रवण ने प्रश्न केला,

"अहो युवराज या वनांत अनेक प्रकारचे जीव जमिनीत असतात, साप विंचू तर नित्याचेच पण एक विशिष्ट प्रकारच्या मुंग्या पण आहेत इथे, जर का त्यानी चावा घेतला तर मात्र जीवाला सुद्धा मुकू शकतो आपण, हा रस त्यांना दूर ठेवतो, म्हणून कधीही इथे खाली बसल्यावर तो रस आम्ही शिंपडतो"

"विक्षिप्त आहे हे जंगल"

"हो, ते तर आहेच, पण तेव्हढाच उपकारी सुद्धा आहे, कारण याप्रकारचे औषधी सुद्धा हे वनच देत आम्हाला"

"हा रस कोणत्या औषधींचा?"

"या वनांत एक कंद मिळतो, त्याला सेरफल असं म्हणतात, दिसायला तर सामान्य आहे पण याचा लाल रस खूप उपयोगी, अनेक व्याधी सुद्धा बऱ्या होतात"

"सेरफल??, अहो हा कंद तर आम्हाला सुद्धा हवा होता"

"तुम्हाला हवा होता!!!"

"हो, चला म्हणजे अजून एक काम झालं तर, तुमचे मानावे तेव्हढं आभार कमीच आहे सहदेव"

"आभार कशाचं, तुमची पुन्हा मदत करण्याचा अवसर मिळालं यातच माझी धन्यता"

....

त्यांनी पटापट जेवण आटोपले, आज ज्या अपेक्षेने ते इथे आले होते त्याहून अधिक गवसलं होतं. आता दुपार झाली होती, पुन्हा आभाळ झाकोळल गेलं होतं, इतर दोन वनस्पती सुद्धा जमा करावयाचे होते. श्रवण आणि सेनापतींनी सहदेव चे आभार मानले आणि ते इतर वनस्पतींच्या शोधात निघाले... आता त्यांना जायचं होतं पर्वताच्या दक्षिण भागांत, श्रवण सोबत जे सैनिक विरसेन ने पाठवले होते त्यांच्याशी श्रवण ने हळुवार काहीतरी सांगितलं, त्या सैनिकांनी मन डोलावली आणि ते परत महालाच्या दिशेने रवाना झाले, तर श्रवण आणि सेनापती दोघेच दक्षिण भागाकडे कूच करू लागले.

हा भाग तसा चढणीच्या मानाने फार अवघड होता, अनेक ठिकाणी उंच उतरण होती, पण इथे पश्चिम भाग प्रमाणे दाट झाडी नव्हती, उलट अनेक झुडुपे, माणसाच्या उंची एव्हढे गवत यांनी तो प्रदेश भरला होता.

या ठिकाणी त्यांना इंद्रनील कमळ हवा होता, त्या अनुषंगाने एका दलदलीच्या भागात ते गेले... कदाचित तीक्ष्ण उतरनी वरून येणार जोरदार पाणी अचानक इथे साचून आणि झाड नसल्याने उघडी असलेली माती यांच्या मिश्रणाने अनेक दलदली तयार झाल्या असाव्यात.

त्या दलदलीत अनेक कमळ दिसत होते, त्यात किनाऱ्या वरच एक निळ्या रंगाच, जवळ जवळ हातभार घेर असलेलं कमळ होतं,

"सेनापती, तो बघा, तोच कमळ आपल्याला हवा आहे. "

"तर तो आहे इंद्रनील कमळ, चला कुठलाही अडथळा न येता ते कमळ हाती लागलं!!!, युवराज तुम्ही

इथेच थांबा, मी जाऊन ती सर्व फुल घेऊन येतो, दोघेही जर का दलदलीत अडकलो तर बाहेर येन कठीण होईल"

श्रवण ने मान डोलावली, सेनापतींनी त्यांची तलवार काढून श्रवण कडे दिली, आणि हातातल्या कट्यारीने ते लहान लहान झुडूप कापत कापत समोर जाऊ लागले, श्रवण च त्यांच्यावरच लक्ष होतं... अत्यन्त शांतता होती तिथे, अगदी सेनापतींच्या चालीचा आवाज सुद्धा फिरत होता. आणि अचानक त्या दलदलीत कीटक शोधत असणारे दहा बारा पक्षी एकाएकी उडाले.

सेनापतींना याची काहीतरी कल्पना आली, त्यांनी एकवार श्रवण कडे नजर टाकली, आजूबाजूला बघितलं आणि पुन्हा ते कमळाकडे जाऊ लागले, श्रवण अल्हाद पने स्वतःची तलवार बाहेर काढली, कसला तरी धोका त्याला जाणवत होता, आणि तेव्हढ्यात त्या दलदलीत

काहीतरी हालचाल जाणवली, ती हालचाल बघून दोघेही सतर्क झाले, एव्हाना सेनापती कमळाकडे पोहीचले होते सुद्धा, त्यांनी लगबगीने तो सबंध गुच्छ हातात घेतला.. आणि पुन्हा एकदा तेथील पाण्यात हालचाल जाणवली, आता मात्र याना खात्री पटली होती की काहीतरी त्या दलदलीत आहे

श्रवण दुरूनच सेनापतींना बोलला,

"सेनापती, कदाचित या दलदलीत मगरी असू शकतात, मला वाटत आपण लवकरात लवकर परतावं"

"हो युवराज, मलाही काहीतरी जाणवतंय, "

आणि असं म्हणून ते माघारी फिरले. आणि ज्या क्षणी ते माघारी फिरले तेव्हढ्यात त्या दलदलीतुन अचानक पणे काहीतरी बाहेर आल. जवळ जवळ सेनापतींच्याच उंचीच, एक लंबूळक्या आकाराचा कदाचित एक साप असावा तो,

"सेनापती, सावधान, मागे वळून बघा!!!"

तसे सेनापती एक महान सेनानी होते, त्यांना लगेच कळलं मागे काहीतरी आहे, त्यांनी त्यांच्याकडे जी कट्यार होती ती एका क्षणात मागे भिरकावली, ती कट्यार भिरकावण्याचा वेग इतका होता की पापणी सुद्धा लवली नव्हती तितक्यात त्या लंबूळक्या गोष्टीचा वरचा भाग वेगळा झाला, निशाण इतका अचूक होता आणि त्यात त्यांनी मागे वळून पाहिलं सुद्धा नव्हतं, एकाएकी रक्ताच्या पिचकाऱ्या उडाल्या, तो नजारा बघून श्रवण ने एक सुस्कारा सोडला.

आणि तितक्यात सेनापती ओरडले,

"युवराज, सावधान!!! मागे बघा"

ते ऐकताच श्रवण ने क्षणार्धात मागे बघितलं, आणि बघतो तर काय त्याला स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता, अजस्त्र असं रूप होतं ते, कोळसा हि नसेल इतका कृष्ण वर्ण, आठ ते दहा हात लांब इतका मोठा तो फणा, त्याच्या तोंडातून बाहेर येणारी तो द्विभाजीत जीभ, आणि डोळ्यात प्रचंड क्रोध दिसत होता, आता श्रवण ला कळून चुकलं होतं, खरं तर काही क्षणापूर्वी जे काही सेनापतींच्या मागे होतं ती याच अजस्त्र नागाची शेपूट मात्र होती, चंद्रकोरीचा आकार असणाऱ्या ती दलदल सेनापतीं च्या इथून सुरु होतं होती आणि श्रवण कडे सम्पली होती आणि त्या दलदलीला पूर्ण व्यापला होतं त्या नागाने, पृथ्वी भूतलावर अशी गोष्ट अस्तित्वात असनच त्याच्या बुद्धीला पटत नव्हतं, पण ती वेळ चकित होण्याची नव्हती . लढावं लागणार होतं,

श्रवण एक नजर त्या नागा वर टाकली आणि आपली तलवार हातात घेत शतायु ची अवस्था धारण केली, त्याचा

एक पाय समोर होता जो त्याने घुडघ्यातून जरासा वाकवला होता, मागचा पाय एका कोणाने मागे होता पण तो होता मात्र एकादम सरळ, ज्या हातात तलवार होती तो शरीरा जवळ तर दुसरा हात नागाच्या दिशेने रोख केलेला. नजर त्याने नागाच्या डोळ्यात न ठेवता त्याच्या शरीराच्या त्या भागावर ठेवली जिथून त्याचा उर्वरित भाग हवेत गेला होता कारण कि आता त्याला जी काही हालचाल करायची होती ती तो इथूनच करणार होता.

तो नाग जरासा मागे झुकला, आणि क्षणार्धात त्याने श्रवण वर झडप मारली. अत्यन्त शिताफीने उडी घेत तो वार टाळला. सेनापती तिथून बरेच दूर होते, आणि युवराजांना संकटात बघून त्यांनी तिथून त्या नागकडे धाव घेण्यास सुरुवात केली. पण इतकं सोपं नव्हतं ते, त्या नागाची तीच शेपूट जीचा काहीसा भाग त्यांनी छाटला होता तिने एका एकी सेनापतींना विळखा घातला आणि एखाद्या लाकडाचा ओंडका फेकावा तस दलदलीत फेकून दिलं, ते बघताच

श्रवनच्या तोंडून आपसूक त्यांचं नाव निघाला, त्यांची कम्बर सुद्धा त्या दलदलीत रुतली होती, आणि हळूहळू ते पूर्णतः त्या दलदलीत बुडू लागले.. त्यांची मदत करायला धावणार तितक्यात या नागाने पुन्हा फुत्कार मारला, जणू असं सांगत होता की तुला माझ्याशी लढायचं आहे, म्हणून सेनापतींची मदत करायला धावन त्यामुळे व्यर्थ होतं,

तो नाग पुन्हा उभा ठाकला, यावेळी सुद्धा परत तो तसाच मागे झुकला, आणि आता परत त्याच प्रमाणे तो झडप घालेल हे श्रवण ला कळालं होतं. त्याने झडप घालताच आपण एक उंच उडी घेऊ आणि ह्या तलवारीचा वार करत तसच त्याला कपाळमोक्ष करू असा त्याने मानस केला.

पण यावेळी झालं उलटंच, जसा तो नाग मागे वळला, त्याने झडप घालण्या ऐवजी त्याच्या तोंडातून एक पिचकारीचा मारा केला, ते निळ्या रंगाच अमाप विष

आपल्या कडे येत आहे असं कळताच त्याने दोन पाऊल मागे उडी घेतली, पण हे इतकं जलद आणि अनपेक्षित रित्या घडलं ना कि श्रवण ची ती उडी कदाचित कमी पडली, आणि काही विष त्याच्या दंडावर पडलं, नशीब बलवत्तर होतं की त्याने मोठ्या आकाराचे लोखंडी बाजूबंद घातले होते, आणि जस ते विष त्याच्यावर पडलं तसे ते बाजूबंद वितळू लागले, श्रवण ने लागलीच ते काढून फेकले...

आता मात्र पंचायत झाली होती, तो प्रचंड नाग जलद गतीने झडप हि घालत होता आणि तितक्याच गतीने विष सुद्धा सोडत होता. श्रवण ने पुन्हा एकदा नजर त्याच्यावर टाकली, त्याच्या चेहऱ्यावर रक्त ओघळताना दिसत होतं, कडाचीत मागची झडप जी चुकली होती त्यात त्याला ती जखम झाली असावी,

आता मात्र त्यापासून थोडंफार तरी अंतर ठेवणं गरजेचं होतं. कारण ते विष जर का चुकून जरी अंगावर पडलं तर मृत्यू अटळ . श्रवण ने कम्बरे कडे हात केला

आणि एक खंजीर हाती घेतला, आणि तो ज्या जागी उभा होता तिथूनच त्याने त्या नागा कडे भिरकावला, नेम जरी अचूक होता तरी त्या नागाची गती बघता हा खंजीर त्याला लागणार नाही असं वाटत होतं, पण त्याच कारणाने त्याचं लक्ष विचलित करत विजेच्या वेगाने तलवारीने वार करावा असा मानस बांधला.

श्रवण ने खंजीर भिरकावला आणि त्याने पण चाल सुरु केली, पण अहो आश्चर्यम, तो खंजीर जाऊन सरळ त्या नागाच्या एका फण्यात लागला, आणि त्यातून रक्त ओघळू लागलं, श्रवण चकित तर झालाच पण त्याने हि संधी गमावली नाही आणि पुन्हा एक जबरी वार त्याच्या शरीरावर केला आणि तो वार करून लगेचच अफाट वेगाने पुन्हा स्वतःच्या जागी आला... तो नाग जखमी तर झाला होता, पण त्याने त्यावर काही प्रतिक्रिया पण दिली नव्हती. कदाचित त्याने विष सोडल्या नन्तर थोडा मंद पणा त्याला आला असणार.

रक्तबम्बाल नागाने पुन्हा एकदा मागे झुकावे घेतला आणि तोंड उघडलं. यावेळी मात्र श्रवण त्याच्या पल्ल्याबाहेर होता. त्याने पुन्हा पिचकारी उडवली, पब यावेळी तिचा रंग मात्र लाल आणि तिचा पल्ला पण एव्हढा दूर कि ते विष येऊन सरळ श्रवण च्या पायावर पडलं.

हे सगळं अनपेक्षित होतं, आतापर्यंत स्थिर होऊन तो नाग हेच विष बनवत असावा, ज्यावेळी ते विष पायावर पडलं, असं वाटायला लागलं की जणू एखादा बर्फच पायावर आदळला, आणि काहीच क्षणात श्रवण मटकन खाली बसला, असं वाटत होतं जणू पायात काही जीवच नाही राहिला, पाय पूर्णतः अशक्त बनले, आणि समोर बघतो तर तो अजस्त्र नाग हळुवार पुढे सरकु लागला, त्याच्या सर्पटण्याचा त्रास सरळ दिसत होता, श्रवण ने केलेला वार जिव्हारी लागला, पण आता मात्र सगळंच सम्पल्यात जमा होतं, तो जखमी नाग आता श्रवण जवळ आलाच होता, त्याच्या हालचालीत असंख्य वेदना पण डोळ्यात तितकाच

क्रोध सुद्धा दिसून येत होता, कदाचित त्याला सम्पूर्ण आयुष्यात प्रथमच कुणीतरी आव्हान केलं असणार.

तो नाग आता श्रवण च्या बरोबर वर आला, त्याच्या फण्यातलं रक्त श्रवनच्या चेहऱ्यावर टपटप पडू लागल, एक फुस्कारा त्याने मारला, तो जणू असं सांगत होता की हे तुझे शेवटचे क्षण आहेत, आता तुला माझ्यापासून कुणीच वाचवू शकणार नाही,

श्रवनच्या पायांत अजूनही काहीच जोर नव्हता, आता सगळं सम्पणार होतं, रमण, मलुक, यांचा निकाल लावण्याआधीच सगळं सम्पणार होतं, त्या नागाने पुन्हा एकदा मागे झुकाव घेतला आणि तो आता श्रवनचा लचका तोडेल असं वाटत असतानाच अचानक एक तलवार त्या अजस्त्र नागाच्या कपाळातून आरपार झाली.... आणि त्याच क्षणी तो अजस्त्र जीव खाली श्रवनच्या अंगावर पडला.

श्रवनचा स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास नव्हता बसत,

हे कसं झालं? कुणी केलं होतं ते?

त्याने आजूबाजूला बघितलं तर तिथे सेनापती उभे होते, अजूनही तसेच पर्वताप्रमाणे अचल. अंगावर दलदलीचा चिखल होता. पन तरीही त्यांचं तेज झळकत होतं. त्यांनी जवळ येऊन तो अजस्त्र नाग दूर केला, दोन हातात सुद्धा त्याचा घेर मावत नव्हता, जसा तो नाग दूर केला, तसंच त्यांनी बसलेल्या श्रवण ला मिठी मारली, डोळ्यात अश्रू होते, कित्येक वर्षानंतर ते अश्रू आले असावेत.

लहान पासूनच त्यांनी श्रवण ला बघितलं होतं, प्रतिष्ठान बद्दल त्यांची जेवढी निष्ठा होती तितकंच प्रेम त्यांना श्रवण आणि महाराजांवर होतं. आणि तोच युवराज जर का मरणाच्या दारात असेल तर ते वाचवायला येणार नाही हे कसं होईल?

"सेनापतिजी"

"बस युवराज, काहीच नका बोलू, या अश्रूंचा अर्थ विचारू नका, याना फक्त येऊ द्या बाहेर"

आणि त्यांनी श्रवनला आधार देत उठवण्याचा प्रयत्न केला, पण पाय अजूनही तसेच अशक्त होते.

"युवराज, हे काय?"

"त्याच अजस्त्र नागाच्या विषाचा हा परिणाम आहे, मला तर संवेदना सुद्धा जाणवत नाहीये"

सेनापतींनी एकदा नागकडे बघितलं, त्याचं तोंड उघड होतं आणि त्यातून ते लाल/तांबडं विष अजूनही ओघळत होतं.

श्रवण ने सुद्धा ते विष बघितलं आणि तो सेनापतींना बोलला

"सेनापतिजी, वाटत नाही की या विषाचा प्रभाव मिटवता येईल, असं विष तर माझ्या ऐकण्यात सुद्धा नाहीये"

"मग आता काय करायचं?"

"माझ्याकडे एक कल्पना आहे पँ त्यासाठी आपल्याला ते विष जमा करावं लागेल, तुम्ही त्याच्या दातातून ओघळणार विष जमा करू शकतात का!"

"हो, का नाही"

आणि त्यांनी ते विष जमा केल.

शक्तीहीन असणाऱ्या श्रवण ला खांद्यावर उचललं आणि ते दोघेही तशाच अवस्थेत  पूर्वेकडे निघाले, जिथे त्यांना पुश्नपतिक मिळणार होती.

.......

पूर्वेकडे कृष्णा नदीच्या विशाल पात्राने एक मोठा भाग व्यापला होता. पर्वतावरूनच अनेक उपनद्या मिळून ती खाली तयार झाली होती. अशाच एका उपनदीच्या बाजूला विरसेन चे तेच सैनिक बसलेले होते. दुरूनच त्यांना एक व्यक्ती नजरेत पडला, त्या व्यक्तीच्या खांद्यावर कुणीतरी

होतं. जवळ आल्यावर कळलं की ते सेनापती आहेत. त्यांची ती अवस्था बघताच ते सैनिक पळत पळत गेले, खांद्यावर असलेल्या श्रवण ला अल्हाद उतरवलं.

"सेनापतिजी हे काय झालंय युवराजांना"

"आम्ही दक्षिणेत इंद्रनील कमल सापडायला गेलो असता तिथे एका अजस्त्र नागाशी आमचा सामना झाला"

"नाग?"

"होय, तुम्ही आम्हाला सांगितलं नाही की या जंगलात असे जीव पN आढळतात, प्रचंड असा नाग होता तो, त्याचा फणा सुद्धा पाच ते सहा हात लांब होता"

"काय?? असा नाग आणि तो पण या वनांत!आम्ही या आधी बघितला नाहीये"

"हे कसं शक्य आहे?"

तितक्यात दुसरा एक सैनिक बोलला,

"तुम्ही कंधक बद्दल तर नाही बोलत ना?"

"कंधक?"

"हो, असं म्हणतात की तो दूर अजाण बनात तो राहतो, त्याची लांबी तर इतकी की दहा पंधरा मनुष्य एकामागे एक झोपले तरी तो त्यांच्यापेक्षा सुद्धा लांब  असेल, आणि असं म्हणतात की त्याचं विष एव्हढं भयानक आहे की कुठलाही सजीव जिवन्त राहू शकत नाही"

ते ऐकताच श्रवण बोलला

"हो, कदाचित तोच असावा हा, कारण असं विष सामान्य सर्पांमध्ये असूच शकत नाही"

"तुम्ही त्याच्याशी सामना केला?"

"हो, त्याचा विनाश तर झाला पण त्याच विषाने मात्र माझे पाय अधू झालेत, आता तर माझे पाय कम्बरे पर्यंत अधू वाटत आहेत"

"युवराज तुम्ही काळजी करू नका, आपण असच मलुक ला जाऊ, रजनी काहीही करून वाचवेल तुम्हाला"

"नाही सेनापती, तितका वेळा आपल्याकडे नाहीये"

"असं नका म्हणू युवराज, हरण तुमच्या स्वभावात नाही, आपण घाई केली तर मलुक दूर नाहीये"

"त्याची आवश्यकता नाहीये सेनापती, त्यापेक्षा माझ्याकडेच एक उपाय आहे"

"उपाय!!!आणि तो कोणता"

असं विचारताच श्रवण ने त्या सैनिकांकडे रोख केला,

"मी तुम्हाला पुश्नपतिकेच वर्णन सांगितलं होतं, त्यानुसार तुम्ही ती वनस्पती सापडली का?"

"हो युवराज, बराच वेळ गेला पण आम्ही ती वनस्पती सापडून आणली आहे, आणि तुम्ही सांगितल्या नुसार मोठे

पात्र सुद्धा आणले आहेत ज्यामध्ये कृष्णेच पाणी भरता येईल"

"उत्तम, चला, मनिरस ची परीक्षा घेण्याची हीच वेळ आहे, प्रत्येक व्याधिला दूर करणार हे मनीरस आता या विषाचा नायनाट करेल का बघुयात"

आणि मग त्याच्या आज्ञे नुसार एका लहान पात्रात कृष्णेच थोडं पाणी घेतलं गेलं, त्यात एक एक करून संजीवनी च्या फुलांचा चुरा, अष्मवेल चे काही तुकडे, सेरफल चा रस, इंद्रनील कमळ आणि पुश्नपतिक टाकली गेली. हलकस् तापवल्या नन्तर त्यातून एक सुगन्ध येऊ लागला... आता ते मिश्रण तयार झालं होतं

"सेनापती, ते जमा केलेलं विष द्या बघू"

असं म्हणताच सेनापतींनी त्या विषाची डब्बी श्रवण कडे दिली, श्रवण ने एकवार नजर मनिरस कडे टाकली, आणि हळुवार पणे ते विष त्यात टाकलं. आणि जस त्यात टाकलं तसे त्यातून बुडबुडे येऊ लागले, आणि काही वेळ झाल्यानंतर द्रव्यांचे दोन थर तयार झाले, वर एक बिनरंगी द्रव्य तर खाली त्याच विषाच्या रंगाच द्रव्य होतं

श्रवण ने हलक्याने वरील द्रव्य काढून घेतलं, आणि खबरदारी घेतली की खालच्या द्रव्याला धक्का सुद्धा लागणार नाही.

त्या द्रव्याकडे नजर टाकली आणि एक नजर सेनापतीं कडे टाकली

आणि बघता बघता ते द्रव्य पिऊन घेतलं. अत्यन्त कडू अशी त्याची चव होती, गळ्यात एक जळण झाली होती.

त्याला त्या द्रव्याची उष्णता पोटा पर्यंत जाणवत होती, हळूहळू डोकं जड झालं होतं. डोळ्यांसमोर अंधारी आली, काहीच दिसत नव्हतं, आणि आता तर पोटात पण असंख्य वेदना होऊ लागल्या. त्याला हळुवार पणे भोवळ आली आणि त्याने अलगद डोळे मिटले.

त्याची ती अवस्था बघून सेनापती जोराने त्याला आवाज देत होते, पाणी शिंपडल जात होतं चेहऱ्यावर, पण तो काही उठत नव्हता, सेनापतींनी त्याच्या छातीला कान लावला, हृदयाची धडधड सुद्धा आता बंद झाली, छातीची हालचाल बंद पडली, तळहात एकदम थंड पडला... जिवन्त असण्याचे कुठलेही चिन्ह त्यांना दिसत नव्हते, सेनापतींनी त्या मनीरसकडे बघितलं, कदाचित चुकीकज द्रव्य तर प्राशन नव्हतं मा केलं!!!

पण आता त्याचा फायदा नव्हता, श्रवण ची नाडी सुद्धा बंद पडली होती, असं वाटत होतं की त्याने प्राणच सोडले आहेत. आपल्या मूला प्रमाणे असणाऱ्या श्रवण ला

बघून सेनापतींच्या डोळ्यात पुन्हा अश्रू आले, आणि आलेले अश्रू अलगद त्याच्या चेहऱ्यावर पडले.

आणि तेव्हढ्यात श्रवनने डोळे उघडले

त्याचे उघडलेले डोळे बघून तिथल्या प्रत्येकाच्या जीवात जीव  आला

"युवराज!!!!"

सेनापती किंचाळलेच!!!

श्रवण ने अलगद स्मित हास्य केलं, आणि एका एकी तो उठून उभा राहिला

"सेनापतिजी, चला अजून बरच काम बाकी आहे, मी एव्हढयात तर मरण शक्य नाही, शेवटी पंत तर बोललेच होते ना, त्या परमात्म्याच्या मनात जे असत तेच होतं!!!!"

आणि एव्हढं बोलून तो जोरजोरात हसू लागला, त्याच्या हसण्यात गगन विजयाची प्राप्ती कळत होती, आणि अफाट असं काहीतरी मिळवल्याचा आंनद, डोळ्यात भविष्याची सोनेरी किरणे झळकत होती ती वेगळीच

************************************

*यह तो बस शुरुवात थी, पुरी पीक्चर तो अभी बाकी है!!*

*तर वाचकहो कसा वाटला हा ' नश्वर' चा पूर्वार्ध??, माहिती आहे तुम्हाला अनेक प्रश्न पडली असावीत, रमन ला श्रवण कस अडवणार?? मलूक आणि दंडकारण्य ला तो वाचवणार का? आणि हो एवढच काय तर तो पुतळा तोडणारा नेमका आहे कोण? पृथ्वी वरील कुठलीच भौतिक वस्तू त्या पुतळ्याला तोडू शकत नाही तर तो तुटलाच कसा? उमा राणीला मिळालेला तो ' वर ' कुठला? मनीरस जरी मिळाला तरी फक्त मनीरस हे सर्व थांबवू शकतो का?*

*या आणि इतर सर्वच प्रश्नांची उत्तर तुम्हाला नक्कीच मिळतील, शिवाय एकापेक्षा एक अशे भन्नाट रहस्य तुमची वाट बघत आहेत,*

*आणि शेवटी फक्त एक ' हे सर्व काल्पनिक आहे ना? की यात पण कुठेतरी सत्याचा गंध आहेच!!!'*

*हे सगळ जाणून घ्यायचं असेल तर नश्वर चा पुढील भाग नक्की वाचा, धन्यवाद*

ई साहित्य प्रतिष्ठानचं हे तेरावं वर्ष.

अभिजीत पैठणपगारे यांचं ई साहित्यवरचं हे दुसरं पुस्तक.

अभिजीत पैठणपगारे हे मेडिकलचे विद्यार्थी. खरं तर मेडिकलच्या विद्यार्थ्यांना अवांतर लिहायवाचायला वेळ कुठला? पण त्यांची प्रतिभा काही त्यांना स्वस्थ बसू देईना. हॉस्पितलमध्ये काम करून थकल्यानंतर विश्रांतीच्या वेळात त्यांनी कादंबऱ्या लिहील्या. त्यांची पहिली लघुकादंबरी अशीही एक लव्हस्टोरी खूप गाजली. त्या प्रतिसादाने बळ येऊन त्यांनी “नश्वर” या महाकादंबरीच्या निर्मितीची सुरुवात केली. अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. नामवंत लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता

अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव,

मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे, सुरूची नाईक, शुभम पाटील, आशिष कर्ले, सौरभ कोरगांवकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, निरंजन कुलकर्णी, विनायक पोतदार, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, प्रिती बांदल असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com